


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार १३ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




# भारत गरजेच्या 60% एलपीजी आयात करतो




- 90% होर्मुझ सामुद्रधुनीतून येते
- रोज 50 लाख सिलिंडरची डिलिव्हरी
- बुकिंग अनेक पटींनी वाढली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारत सरकारच्या परराष्ट्र, जहाजबांधणी, पेट्रोलियम, माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने गुरुवारी देशातील कच्च्या तेलाच्या आणि वायूच्या तुटवड्याबाबत संयुक्त पत्रकार परिषद घेतली. सरकारने सांगितले की, भारत आपल्या गरजेच्या सुमारे ६०% एलपीजी आयात करतो, ज्यापैकी जवळपास ९०% पुरवठा स्ट्रेट ऑफ होर्मुझमधून येतो. सरकारने म्हटले देशातील परिस्थिती आव्हानात्मक आहे, परंतु सरकार गॅस पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. देशात दररोज सुमारे ५० लाख एलपीजी सिलेंडरची डिलिव्हरी केली जाते. अलीकडेच, घबराटीमुळे सिलेंडर बुकिंगमध्ये अनेक पटींनी वाढ दिसून आली आहे. लोकांना पॅनिक बुकिंग टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्याचबरोबर राज्य सरकारांना गरजू लाभार्थ्यांची यादी तयार करण्यास सांगितले आहे, जेणेकरून घरगुती आणि व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा प्राधान्याने सुनिश्चित केला जाउ शकेल.

## नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता संयम राखावा -सुजाता शर्मा

पेट्रोलियम मंत्रालयाच्या जाइंट सेक्रेटरी (मार्केटिंग आणि ऑइल रिफायनरी) सुजाता शर्मा म्हणाल्या- देशात पेट्रोल-डिझेल आणि एलपीजीच्या उपलब्धतेबाबतची स्थिती खूपच सोपी आणि समाधानकारक आहे. भारत दररोज सुमारे ५५ लाख बॅरल कच्च्या तेलाचा वापर करतो आणि जगातील चौथा सर्वात मोठा रिफायनर असल्यामुळे पेट्रोल-डिझेलसारख्या उत्पादनांच्या उपलब्धतेबाबत विश्वास कायम आहे.९ मार्च रोजी पेट्रोलियम मंत्रालयाने अत्यावश्यक वस्तू कायद्यांतर्गत (Essential Commodities Act) सर्व रिफायनरीजना एलपीजी उत्पादन वाढवण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर घरगुती उत्पादनात वाढ झाली आहे आणि आता ते २५% वरून २८% झाले आहे.देशभरात सुमारे १ लाख रिटेल आउटलेट म्हणजेच पेट्रोल पंप कार्यरत आहेत, त्यापैकी बहुतेक सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांचे आहेत. या आउटलेट्सवर कुठेही इंधनाची कमतरता किंवा ड्राय-आउट स्थिती समोर आलेली नाही.भारत सरकार प्रत्येक तिमाहीत राज्यांना केरोसिनचे वाटप करते. दर तीन महिन्यांनी सुमारे १ लाख किलोलीटर केरोसिन राज्यांना दिले जाते. आज जारी केलेल्या ➪(पान २ वर)


## पुरवठा संकटाची 2 कारणे

**होर्मुझ सामुद्रधुनी जवळजवळ बंद होणे-** भारतासाठी सर्वात मोठे आव्हान म्हणजे स्ट्रेट ऑफ होर्मुझ बंद होणे. हा सुमारे १६७ किमी लांबीचा जलमार्ग आहे, जो पर्शियन गल्फला अरबी समुद्राशी जोडतो. इराणमधील युद्धामुळे हा मार्ग आता सुरक्षित राहिलेला नाही. धोका लक्षात घेता, कोणताही तेल टँकर तिथून जात नाहीये. जगातील एकूण पेट्रोलियमपैकी २०% हिस्सा येथूनच जातो. सौदी अरेबिया, इराक आणि कुवेतसारखे देशही त्यांच्या निर्यातीसाठी यावर अवलंबून आहेत. भारत आपल्या गरजेच्या ५०% कच्चे तेल आणि ५४% एलएनजी याच मार्गाने आयात करतो. इराण स्वतः याच मार्गाने निर्यात करतो.

**प्लांटवर ड्रोन हल्ल्यामुळे LNG चे उत्पादन थांबले-** गेल्या आठवड्यात अमेरिका-इस्रायलने इराणवर हल्ला केला होता. याला प्रत्युत्तर म्हणून इराणने यूएई, कतार, कुवेत आणि सौदीसारख्या देशांमधील अमेरिकन तळांना लक्ष्य केले आहे.इराणच्या ड्रोन हल्ल्यानंतर भारताला गॅस पुरवठा करणारा सर्वात मोठा देश कतारने आपल्या एलएनजी प्लांटचे उत्पादन थांबवले आहे. यामुळे भारतात गॅसचा पुरवठा कमी झाला आहे. भारत आपल्या गरजेच्या ४०% एलएनजी (सुमारे २.७ कोटी टन वार्षिक) कतारमधूनच आयात करतो.

# शहिदांच्या बलिदानाचा बदला घेणार

## 'होर्मुझ' बंदच राहणार'-'सुप्रीम लीडर'मोजताबा खामेनीचा इशारा




**तेल अवीव/तेहरान//वृत्तसंस्था :** इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांच्या निधनानंतर, त्यांचे पुत्र मोजताबा खामेनी यांनी इराणची सूत्रे अधिकृतपणे हाती घेतली आहेत. सर्वोच्च नेते म्हणून नियुक्त झाल्यानंतर मोजताबा यांनी गुरुवारी पहिली प्रतिक्रिया दिली. या संदेशात त्यांनी अमेरिका आणि इस्रायलवर आगपाखड करत, मध्यपूर्वेतील अमेरिकन लष्करी तळांना लक्ष्य करण्याची थेट धमकी दिली आहे.

***अमेरिकन तळे तात्काळ बंद करा, अन्यथा...*** आपल्या पहिल्याच भाषणात मोजताबा खामेनी यांनी आक्रमक पवित्रा घेतला. 'या भागातील अमेरिकेचे सर्व लष्करी तळ तात्काळ बंद केले पाहिजेत, अन्यथा त्यांच्यावर भीषण हल्ले केले जातील,' असा इशारा त्यांनी दिला. महत्त्वाचे म्हणजे, नियुक्तीनंतर मोजताबा अद्याप सार्वजनिकरीत्या लोकांसमोर आलेले नाहीत, मात्र त्यांच्या या लेखी संदेशाने पाश्चिमात्य देशांमध्ये खळबळ उडाली आहे.

***'शहीदांसाठी बदला घेणारच'-*** आपले वडील अली खामेनी यांच्या मृत्यूचा उल्लेख करत मोजताबा म्हणाले, 'आम्ही आमच्या शहीदांच्या रक्ताचा बदला घेण्यास विसरलेलो नाही. शेजारील देशांशी मैत्री करण्यावर आमचा विश्वास आहे, पण अमेरिकन तळांवरील आमचे हल्ले सुरूच राहतील. आम्ही शत्रूकडून भरपाई घेउ आणि त्यांनी नकार दिला तर त्यांच्या मालमत्ता जप्त करू. गरज पडल्यास शत्रुच्या मालमत्तेचा विध्वंसही करू.'

***होर्मुझची सामुद्रधुनी बंद ठेवणार!-*** जगातील व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी होर्मुझची सामुद्रधुनी बंद ठेवण्यावर मोजताबा यांनी भर दिला आहे. 'होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचे अस्त्र आम्ही आमच्याकडेच ठेवणार आहोत आणि वेळ पडल्यास युद्धाच्या इतर आघाड्याही उघडल्या जातील,' असे त्यांनी स्पष्ट केले.

***कसा झाला अली खामेनींचा अंत?-*** अमेरिकन आणि इस्रायली हवाई दलाने तेहरानमधील राष्ट्राध्यक्ष निवासावर केलेल्या भीषण हल्ल्यात आयतुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला. रमझानच्या १० व्या दिवशी हा हल्ला झाला, ज्यावेळी खामेनी आपल्या कुटुंबासोबत होते. या हल्ल्यात त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यही मारले गेले. सायप्रस मधील इराणच्या राजदूतांनी दिलेल्या माहितीनुसार, या हल्ल्यात मोजताबा खामेनी स्वतःदेखील जखमी झाले होते. पदभार स्वीकारल्यानंतरच्या त्यांच्या पहिल्याच वक्तव्यात अमेरिकेला इशारा दिला आहे. त्यांनी म्हटले आहे की, मध्य पूर्वेतील अमेरिकेचे लष्करी तळ बंद करावे लागतील, अन्यथा त्या तळांवर हल्ले सुरूच राहतील.

# शहरात 25 तर ग्रामीण भागात 45 दिवसांनी बुकिंग

**मुंबई/प्रतिनिधी :** इराण युद्धामुळे इंधन वाहतुकीमधील महत्त्वाचा मार्ग असलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये मोठा अडथळा निर्माण झाला आहे. याचा परिणाम जगभरातील इंधन पुरवठ्यासोबत भारतातील गॅसच्या पुरवठ्यावर झाला आहे. केंद्रीय पेट्रोलियम आणि



नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी याला दुजोरा दिला आहे. तसेच साठेबाजी टाळण्यासाठी सरकारने गॅस बुकिंगबाबतच्या नियमांमध्येही केंद्र सरकारने मोठे फेरबदल केले आहेत. त्यानुसार आता शहरी भागामध्ये गॅस बुकिंगची मुदत २१ दिवसांवरून वाढवून २५ दिवस करण्यात आली आहे. तर ग्रामीण भागात आता ४५ दिवसांमध्ये एकदाच गॅसचं बुकिंग करता येणार आहे.

केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी यावेळी देशात एलपीजीची कुठलीही टंचाई नसल्याचे स्पष्टपणे सांगितले आहे. तसेच देशात कुठेही एलपीजीचा साठा संपल्याचे वृत्त आले नसल्याचेही स्पष्ट केले आहे. कुठल्याही टंचाईमुळे नाही तर लोक घाबरून गॅस बुक करत असल्यामुळे बुकिंगच्या संख्येत वाढ झाली आहे. सध्याच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्यांना व्यावसायिक वापराचे गॅस सिलेंडर आणि ४८ हजार लिटर रॉकेलही पुरवण्यात येणार आहे. तसेच कोळशाच्या पुरवठ्यामध्येही वाढ करण्यात येणार आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

# देशातील सिलिंडर संकटाच्या मुद्यावरून संसदेबाहेर घोषणाबाजी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशातील सिलिंडर संकटाच्या मुद्द्यावरून गुरुवारी लोकसभेत विरोधी पक्षाच्या खासदारांनी गोंधळ घातला. त्यांनी संसदेबाहेर घोषणाबाजी केली आणि 'नरेंदर बेपत्ता आहेत, सिलिंडरही बेपत्ता आहेत' असे म्हटले. राहुल गांधींनी सरकारला एलपीजी टंचाईला तोंड देण्यासाठी तयार राहण्याचे आवाहन केले. पंतप्रधान मोदींनी उर्जा सुरक्षेशी तडजोड केली, ज्यामुळे मोठी समस्या निर्माण झाली, असे ते म्हणाले. राहुल गांधींच्या सूचनेनंतर संसद गॅस संकटावर चर्चा करण्यास तयार आहे. पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी आज संसदेत या प्रकरणावर उत्तर देतील. राहुल गांधी चर्चेला सुरुवात करतील.तत्पूर्वी, १० फेब्रुवारीनंतर पहिल्यांदाच लोकसभेत सभापती ओम बिर्ला यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. बुधवारी विरोधी पक्षाचा अविश्वास प्रस्ताव फेटाळण्यात आला. संसदेचे कामकाज शुक्रवारी सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

### संसदेचे कामकाज तहकूब




लोकसभेत पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री म्हणाले की, सध्याचा काळ अफवा पसरवण्याचा किंवा खोट्या बातम्या पसरवण्याचा नाही. देश एका मोठ्या जागतिक उर्जा संकटाचा सामना करत आहे.ते म्हणाले, 'ही अफवा पसरवण्याचा किंवा खोट्या बातम्या पसरवण्याची वेळ नाही. भारताला इतिहासातील सर्वात गंभीर जागतिक उर्जा व्यत्यय येत आहे. इंधन पुरवठा सुरूच आहे, घरे आणि शेतीसाठी गॅसला प्राधान्य दिले जात आहे आणि एलपीजी उत्पादनात २८% वाढ झाली आहे. भारताने उर्जा क्षेत्रात काम करणा-यांसोबत, संकटाचे व्यवस्थापन करणा-या संस्थांसोबत आणि राष्ट्रीय हितासाठी एकजूट दाखवली पाहिजे.'पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री पुरी यांनी सांगितले की, सरकारने एलपीजीची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी उत्पादन वाढवले आहे. गेल्या पाच दिवसांत रिफायनरीजना दिलेल्या सूचनांनुसार, एलपीजी उत्पादन २८% ने वाढले आहे. अतिरिक्त खरेदीची प्रक्रिया देखील सुरू आहे. त्यांनी सांगितले की, मोदी सरकारची सर्वोच्च प्राथमिकता भारतातील ३३० दशलक्ष कुटुंबांच्या, विशेषतः गरीब आणि वंचितांच्या स्वयंपाकघरात कोणतीही कमतरता भासू नये याची खात्री करणे आहे. घरगुती पुरवठा पूर्णपणे सुरक्षित आहे आणि वितरण चक्रात कोणताही बदल झालेला नाही.




# सिलिंडरचा काळाबाजार : घरगुती १८०० तर व्यावसायीक ४ हजाराला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिका-इस्त्रायलच्या इराणसोबतच्या युद्धामुळे देशभरात एलपीजीची टंचाई वाढत आहे. गॅस सिलिंडर एजन्सींबाहेर लांबच लांब रांगा लागल्या आहेत. याशिवाय गॅस सिलिंडर काळाबाजारीही सुरू झाली आहे.बिहारमध्ये घरगुती गॅस सिलिंडर १८०० रुपयांपर्यंत विकले जात आहेत. तर मध्य प्रदेशात व्यावसायिक सिलिंडर काळ्या बाजारात ४००० रुपयांना विकला जात आहे. इतकेच नाही, व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यावर बंदी आल्याने हाटेल्स आणि रेस्टारंट्समध्ये इंडक्शनवर स्वयंपाक करणे सुरू झाले आहे.



**मध्य प्रदेश:** काळ्या बाजारात व्यावसायिक सिलिंडर ४००० रुपयांना विकला जात आहे. १,९१८ रुपयांचा व्यावसायिक सिलिंडर भोपाळमध्ये काळ्या बाजारात ४००० रुपयांना विकला जात आहे. भोपाळमधील बरखेडा पठानी येथील भारत गॅस एजन्सीमध्ये उघडपणे ४ हजार रुपयांना सिलिंडर विकला जात आहे. सरकारने काळाबाजार रोखण्यासाठी आवश्यक वस्तू अधिनियम लागू केला आहे, पण काळाबाजार करणा-यांवर याचा परिणाम झालेला नाही. या प्रकारात एक खाजगी गॅस एजन्सी चालक, कर्मचारी आणि दलालही सामील आहेत. याशिवाय गॅसची अवैध रिफिलिंग करणारेही संधीचा फायदा घेत आहेत.

**बिहार:** ब्लॅक मध्ये १८०० रुपयांना मिळत आहे घरगुती गॅस सिलिंडर-गॅस सिलेंडरच्या तुटवड्यामुळे त्याची काळाबाजार वाढली आहे. ९१८ रुपयांना मिळणा-या गॅस सिलिंडरठी ब्लॅक मध्ये विकणारे १७०० ते १८०० रुपये घेत आहेत.

# व्यावसायिक सिलिंडरसाठी नवीन नियमावली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यातील संघर्षाचा परिणाम भारताच्या इंधन पुरवठ्यावर झाल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे. मात्र, पेट्रोलियम मंत्रालयाने यावर स्पष्टीकरण देत भारतीयांना दिलासा दिला आहे. 'देशात कच्च्या तेलाचा भरपूर साठा असून कोणत्याही पेट्रोल पंपावर इंधनाची टंचाई नाही,' अशी माहिती पेट्रोलियम मंत्रालयाच्या




संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी दिली आहे. गॅसचा काळाबाजार किंवा साठेबाजी रोखण्यासाठी सरकारने राज्य सरकारांना महत्त्वाचे अधिकार दिले आहेत. व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा करण्यासाठी ➪(पान २ वर)

## युद्धादरम्यान इराणला मोठा धक्का

# अमेरिका-इस्त्राइलच्या हल्ल्यात आणखी एका मोठ्या नेत्याचा मृत्यू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराणविरोधातअमेरिका आणि इस्त्राइलने इराणविरोधात पुकारलेल्या युद्धाला आता १२ दिवस लोटले आहेत. या संघर्षात इराण अमेरिका आणि इस्त्राइलच्या बलाढ्य शक्तीला जोरदार आव्हान देत असले तरी इराणचीही या युद्धात मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्तहानी होत आहे. या युद्धाच्या सुरुवातीलाच अमेरिका आणि इस्त्राइलने केलेल्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनेई यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर आता इराणच्या आणखी एका बड्या नेत्याचा हल्ल्यामध्ये मृत्यू झाला आहे. इराणचे उप गुप्तचर मंत्री अकबर गफफारी यांचा अमेरिका आणि इस्त्राइलने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. अकबर गफफारी यांच्या मृत्यूची माहिती इराणी प्रसारमाध्यमांनी दिली आहे. इराणी वृत्तसंस्था आयएलएनएने सांगितले की, इराणचे उप गुप्तचर मंत्री अकबर गफफारी हे तेहरानवर अमेरिका आणि इस्त्राइलने केलेल्या संयुक्त हल्ल्यात मारले गेले आहेत. अकबर गफफारी यांनी आधी ईस्ट



अझरबैजान प्रांताचे प?लिटिकल सिक्युरिटी डेप्युटी गव्हर्नर म्हणून काम पाहिले होते. अकबर गफफारी यांच्यावर तबरीज शहरात अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. दरम्यान, मागच्या ११ दिवसांपासून सुरू असलेल्या संघर्षामध्ये अमेरिकन सैन्याने इराणची लष्करी शक्ती जवळपास संपुष्टात आणली आहे, असा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. अमेरिकन सैन्याने केलेली कारवाई एवढी वेगवान आणि अचूक होती की, ज्यामुळे इराणची महत्त्वपूर्ण संरक्षण क्षमता काही तासांतच उद्ध्वस्त झाली, असा दावाही डोनाल्ड ट्रम्प यांनी केला. इराण एक प्रबळ देश आहे. मात्र त्यांच्या मुख्य लष्करी ताकदीचं आम्ही जबर नुकसान केलं आहे, असेही डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले.



जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# सिलेंडर दरवाढीची तीर्डी तहसीलदारांच्या दालनात

## युवक काँग्रेस प्रदेश सचिव उत्कर्ष देशमुख यांच्या नेतृत्वात आंदोलन



**चांदुर बाजार/प्रतिनिधीः-** काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलु देशमुख यांच्या आदेशावरून चांदुर बाजार येथे युवा काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव उत्कर्ष देशमुख यांच्या नेतृत्वात गॅस दरवाढी विरोधात चांदूरबाजार तालुका काँग्रेसच्या वतीने अच्छे दिन ' चे स्वप्न दाखविणाऱ्या सरकारने मोठ्या प्रमाणात गॅस सिलेंडरच्या दरात वाढ करून जनतेचा विश्वासघात केला असल्याने चांदुर बाजार येथील तहसील कार्यालयात १२मार्चला दुपारी १वाजता महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचिव उत्कर्ष देशमुख व काँग्रेस कार्यकर्त्यांनी सिलेंडरची तिरडी तहसीलदारांच्या दालनात नेवून मोदी सरकारचा निषेध व्यक्त केला. दरवाढ तात्काळ कमी करण्याचे निवेदन नायब तहसीलदार मनोज सोनारकर यांना दिले.

केंद्र शासनाने गॅस सिलेंडरच्या दरामध्ये अचानकपणे फार मोठी वाढ केलेली असून गॅस सिलेंडरच्या नोंदणीचा कालावधी सुध्दा वाढविला आहे . याचा विपरित परिणाम राज्यातील सर्व शेतकरी व सर्वसामान्य प्रत्येक कुटूंबावर होणार असून मोदी सरकारने घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात अचानक ६० रुपये अशी वाढ करून सर्वसामान्य जनतेकडून पठाणी लूट सुरु केली आहे . केंद्रात सत्तेत आल्यापासून मोदी सरकारने आजवर किमान ५० वेळा गॅस सिलेंडरच्या दरात वाढ केली आहे . काँग्रेसच्या काळात ४०० रूपयांवर असलेला गॅस सिलेंडर आता ९०० रूपयांवर पोहोचला आहे . तसेच व्यावसायिक सिलेंडरही गेल्या आठवडाभरात १५० रूपयांनी महाग झाल्याने त्याची किंमतही १ हजार ९०० च्या जवळपास पोहोचली आहे .

गॅस सिलेंडरच्या दरात झालेल्या वाढीच्या निषेधार्थ चांदुर बाजार तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने गुरुवार , १२ मार्च रोजी दुपारी १ दरम्यान चांदुर बाजार येथे मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्यात आले. तालुका पातळीवर हे आंदोलन लक्षावेधी ठरले असून काँग्रेस प्रदेश सचिव उत्कर्ष देशमुख व तालुका अध्यक्ष किशोर देशमुख यांनी सिलेंडरची दरवाढ झालेली तिरडी खांद्यावर घेत थेट तहसिल कार्यालय दालनात प्रवेश करून मोदी सरकारचा निषेध व्यक्त केला. काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी , नागरिकांनी , व्यावसायिकांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभाग दर्शविला . सिलेंडरची दरवाढ तत्काळ कमी करावी अन्यथा काँग्रेस तर्फे उग्र आंदोलन करण्यात येण्याचा इशाराही त्यांनी आपल्या निवेदनातून दिला आहे.

सदर आंदोलनात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचिव उत्कर्ष देशमुख, तालुका काँग्रेस अध्यक्ष किशोर देशमुख, बाबुभाई इनामदार ,डॉ. प्रताप कीटूकले, श्रेयश बर्वे, ज्ञानेश्वर काळकर, उमेश गवई,नंदू भोयर, राजाभाऊ बंड, प्रीतम मानापुरे, भोला मदने ,किशोर किटूकले, योगेश वीघे ,अवधूत मातकर, योगेश ईसळ, मंगेश देशमुख, नंदू पुंडकर, अंकुश देशमुख ,शैलेश टेकाळे,गजानन महल्ले,उमेश तायडे,रोशन शेकार ,विशाल बेले,भास्कर हिरडे, अमोल देशमुख, सचिन हिवराळे ,गजानन देशमुख, दिग्विजय देशमुख, निखिल काटोलकर, गौरव वैद्य ,अभिषेक बोंडे ,अंकुश धाकडे ,वेदांत काळे, रवींद्र धाकडे, मनीष डाखोरे ,शिवाजी काळे, श्रीकृष्ण वानखडे, संविधान मोहोळ, विजय राऊत ,संकेत राऊत, मनोज देशमुख,राजेंद्र भुयार, प्रल्हाद अमझरे, अभिजीत सावरकर, मोहम्मद अरिफभाई ,पंकज नेहारे, अब्दुल सलीम, मनीष बंड, भूषण देशमुख, नरेंद्र हिवे,आदित्य मानकर,आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# आरोग्य विभागाच्या तत्परतेमुळे अतिजोखमीच्या मातेचे वाचले प्राण

## अचलपूरच्या मडकी येथील आरोग्य चमूची कामगिरी


**अमरावती/प्रतिनिधीः-** कर्तव्यदक्षता आणि वेळेवर घेतलेला अचूक निर्णयामुळे अचलपूर तालुक्यातील मडकी येथे जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या चमूने केलेल्या अथक परिश्रमामुळे एका अतिजोखमीच्या मातेचे आणि तिच्या नवजात बालकाचे प्राण वाचविण्यात यश आले आहे. 'मिशन २८०' अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या गृहभेटी दरम्यान गरोदर मातेच्या आरोग्याचा धोका लक्षात आल्याने ही तत्परता दाखवण्यात आली, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिली.


मडकी येथील रहिवासी मीनाक्षी अमोल धांडे या गरोदर मातेच्या घरी आशा स्वयंसेविका आणि अंगणवाडी सेविका भेटीसाठी गेल्या असता, मातेच्या पायावर सूज असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. सुरुवातीला कुटुंबाने माहिती देण्यास टाळाटाळ केली, मात्र आरोग्य सेविकांनी तत्परतेने वैद्यकीय अधिकाऱ्यांना याची सूचना दिली. डॉ. नीता निगोळे, डॉ. प्रशांत ढोके आणि प्रविणा धाकडे यांनी मातेची तपासणी केली असता, त्यांचा रक्तदाब अत्यंत धोकादायक पातळीवर असल्याचे आढळले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आरोग्य पथकाने कुटुंबाचे सविस्तर समुपदेशन केले आणि गरोदरपणात रक्तदाब वाढल्याने उद्भवणाऱ्या जीवघेण्या धोक्यांची जाणीव करून दिली.

यावेळी मातेला तातडीने अचलपूर आणि त्यानंतर अमरावती येथील डफरिन रुग्णालयात हलविण्यात आले. डफरिन रुग्णालयात वेळेवर उपचार मिळाल्याने मातेने एका गोंडस कन्येला सुखरूप जन्म दिला. सध्या माता आणि बाळ दोन्ही सुरक्षित असून, जिल्हा प्रशासनाच्या 'सुरक्षित मातृत्व अभियाना'चे हे यश मानले जात आहे.

# २४ मार्चला नागपूर येथे विभागीय हातमाग कापड स्पर्धा

## वस्त्रोद्योग प्रादेशिक उपआयुक्त कार्यालयात होणार स्पर्धा





अमरावती : हातमाग विणकरांनी विणलेल्या उत्कृष्ठ हातमाग कापड नमून्यांना प्रोत्साहन देण्यासाठी २४ मार्च रोजी नागपूर येथे विभागीय हातमाग कापड स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अमरावती व नागपूर विभागांतर्गत असलेल्या जिल्ह्यांतील हातमाग विणकरांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रादेशिक उपआयुक्त, (वस्त्रोद्योग) अंजू बालपांडे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी हातमाग विणकरांनी तयार केलेले कापड नमूने दि. २० मार्च रोजी, सायं ५ वाजेपर्यंत नागपूरच्या प्रादेशिक उपआयुक्त (वस्त्रोद्योग) कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

यानुसार विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली या हातमाग कापड स्पर्धेचे आयोजन २४ मार्च २०२६ रोजी दुपारी ३.३० ला प्रादेशिक उपआयुक्त, (वस्त्रोद्योग) कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत क्र. २, आठवा माळा, 'बी' विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे होणार आहे. विदर्भातील सर्व हातमाग कापड विणकरांनी याची नोंद घ्यावी.

अधिक माहितीसाठी प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर कार्यालयाशी ०७१२-२५३७९२७ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन विभागाद्वारे करण्यात आले आहे.

# १ व १० वरिल उर्वरित

## भारत गरजेच्या ६०ऽ एलपीजी

नवीन आदेशानुसार राज्य सरकारांना अतिरिक्त४८ हजार किलोलीटर केरोसिन आणखी जारी केले जाईल.

शिपिंग मंत्रालयाचे अधिकारी राजेश कुमार सिन्हा यांनी सांगितले-

पर्शियन गल्फ क्षेत्रात भारतीय जहाजांची संख्या सध्या २८ आहे आणि ही संख्या पूर्वीसारखीच कायम आहे. या जहाजांवर एकूण ७७८ भारतीय खलाशी आहेत. या २८ जहाजांपैकी २४ होर्मुज सामुद्रधुनीच्या पश्चिम भागात आहेत, ज्यांवर ६७७ भारतीय खलाशी आहेत. तर चार जहाजे होर्मुझच्या पूर्व भागात आहेत, ज्यांवर १०१ भारतीय खलाशी आहेत. सरकार या सर्व जहाजांवर आणि त्यांच्या कर्मचा-यांच्या (क्रू) सुरक्षिततेवर सतत लक्ष ठेवून आहे.

अलीकडेच परदेशी ध्वज असलेल्या काही जहाजांवर भारतीय खलाशांशी संबंधित सागरी अपघात झाले आहेत. या जहाजांवर एकूण ७८ भारतीय खलाशी होते. यापैकी ७० खलाशी सुरक्षित बाहेर आले आहेत, तर चार खलाशी जखमी झाले आहेत आणि त्यांची प्रकृती स्थिर आहे. या घटनांमध्ये तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला आहे, तर एक खलाशी अजूनही बेपत्ता असल्याचे सांगितले जात आहे.

**परिस्थिती कधीपर्यंत सुधारेल?**

इंडियन ऑइलचे मुख्य महाव्यवस्थापक (एलपीजी) के.एम. ठाकूर यांचे म्हणणे आहे की, ग्राहकांनी घाबरण्याची गरज नाही आणि घाईघाईने सिलेंडर बुक करू नये. सरकार आता अमेरिकेसारख्या देशांकडून पर्यायी कार्गो मागवण्याचा विचार करत आहे.त्याचबरोबर, आंतरराष्ट्रीय स्तरावर क्र७ देश आपल्या आपत्कालीन तेल साठ्यातून पुरवठा सुरू करण्यावर चर्चा करत आहेत, जेणेकरून जागतिक बाजारातील उर्जा संकट कमी करता येईल. रशिया आणि अल्जेरियाकडूनही अतिरिक्त कच्च्या तेलाची आवक होण्याची अपेक्षा आहे.

## व्यावसायिक सिलिंडरसाठी

आता राज्य सरकारांना लाभार्थीची यादी तयार करावी लागेल. रु ग्णालय आणि शैक्षणिक संस्थांना प्राधान्य दिले जाणार असून, इतर व्यावसायिकांना राज्य सरकारच्या शिफारसीनंतरच मर्यादित स्वरूपात सिलिंडर मिळतील.भारत हा जगातील चौथा सर्वात मोठा तेल शुद्धीकरण करणारा देश आहे. देशात दररोज सुमारे ५५ लाख बॅरल कच्च्या तेलाचा वापर होतो. पेट्रोलियम मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, देशभरातील सुमारे १ लाख पेट्रोल पंपांवर इंधनाचा पुरेसा साठा आहे. कुठेही ड्राय आउट सारखी स्थिती उद्भवलेली नाही. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाउन पेट्रोल पंपांवर गर्दी करण्याची गरज नाही. घरगुती गॅसबाबत सरकारने मोठी पावले उचलली आहेत. ९ मार्च रोजी अत्यावश्यक वस्तू कायद्याअंतर्गत आदेश जारी करून सर्व रिफायनरींना एलपीजी उत्पादन वाढवण्याचे निर्देश देण्यात आले होते. यामुळे देशांतर्गत गॅस उत्पादन २५ टक्क्यांवरून २८ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. यामुळे घरगुती गॅसची उपलब्धता अधिक सुलभ होणार आहे.

भारताला लागणा-या एकूण एलपीजीपैकी ६० टक्के आयात करावी लागते आणि त्यातील ९० टक्के पुरवठा होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होतो. सध्या ही सामुद्रधुनी व्यापारी जहाजांसाठी बंद असल्याने आव्हानात्मक स्थिती आहे. मात्र, भारताने आता आपला मोर्चा आखाती देशांकडून वळवून अमेरिका, नार्वे, कॅनडा, अल्जेरिया आणि रशियाकडे वळवला आहे. या देशांकडून गॅसचा पुरवठा करण्यात येत आहे.

युद्धामुळे गॅस मिळणार नाही, या भीतीने नागरिक मोठ्या प्रमाणावर बुकिंग करत आहेत. 'पुरवठा विस्कळीत झाल्यामुळे नाही, तर भीतीपोटी बुकिंगमध्ये मोठी वाढ झाली आहे,' असे सुजाता शर्मा यांनी नमूद केले. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता संयम राखावा आणि इंधनाची बचत करावी, असे आवाहनही सरकारने केले आहे.

## अचलपूर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी

, भौगोलिक विस्तार, जिल्हा मुख्यालयापासूनचे अंतर, आदिवासी व दुर्गम भागातील गरज, महसूल मंडळांची संख्या यांसारखे निकष विचारात घेण्यात आले. अचलपूर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयाला मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे प्रशासन अधिक लोकाभिमुख होणार असून नवीन पदनिर्मितीमुळे रोजगाराच्या संधीही वाढणार आहेत. अचलपूर परिसरातील नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले असून महसूल सेवा आता अधिक जलद व सुलभ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## दर्यापूर आगाराच्या हिरकणी बसने

दर्यापूर नगरपरिषद अग्निशम बंब आल्याने लगेच आग आटोक्यात आली. विशेष म्हणजे यावेळी हिरकणी बस मध्ये चालक,वाहक व एकच प्रवाशी असल्याने मोठी घटना टळली.

यावेळी दर्यापूर-अकोट मार्गावर काही वेळ वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली होती. दरम्यान वाहतूक पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली. हिरकणी बसने नेमका कोणत्या कारणाने पेट घेतला याची चौकशी करण्यात येणार आहे तसेच बसमध्ये इंजिन मध्ये प्रथम आग लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. बस मधिल आग आटोक्यात आणल्यानंतर बस दर्यापूर आगारात नेण्यात आली. यावेळी बस मध्ये चालक संतोष बगाडे, वाहक बाळू तायडे तसेच एक प्रवाशी होते, ते सुखरूप असून सुदैवाने त्यांना कोणतीही इजा झाली नाही.

## नगरसेवकाच्या भावाने केली

शिवीगाळ केली. वाद वाढत असताना बँकेचे मॅनेजर मध्यस्थी करण्यासाठी आले. मात्र, आरोपीचा राग शांत झाला नाही. बोडखे यांनी त्याला रोखण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने त्यांच्या उजव्या कानावर व डोक्यावर जोरात थापड मारली. बँकेतील कर्मचारी आणि नागरिकांनी मध्यस्थी करून भांडण सोडवले, तरीही आरोपीने बँकेबाहेर जाऊन पुन्हा जीवे मारण्याची धमकी दिली.उषा बोडखे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अंजनगाव सुर्जी पोलिसांनी आरोपी मोहम्मद इकबाल मोहम्मद साबीर याच्यावर भारतीय न्याय संहितेच्या (BNS) कलम ११५(२), ३५१(२) आणि २९६अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## मेळघाटातील ३६ आदिवासी

तालुक्यात ३५ किलोमीटरपर्यंत उच्च शिक्षणाचा कोणताही पर्याय उपलब्ध नव्हता. त्यामुळे उच्च शिक्षणाची अवस्था फार दयनीय होती. ही गरज लक्षात घेऊन चिखलदरा येथे महाविद्यालय सुरू करण्यात आले. महाविद्यालयात केवळ विद्यादानच होत नाही, तर येथील प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी निरंतर प्रयत्न केले जातात.

त्याचाच एक भाग म्हणजे, विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), नवी दिल्ली यांच्या १० व्या योजनेअंतर्गत महाविद्यालयात ९० लाख रुपये खर्चून 'जिजाऊ मुलींचे वसतिगृह' ही इमारत बांधण्यात आली. आतापर्यंत २०० हून अधिक विद्यार्थिनींनी या वसतिगृहाचा लाभ घेतला आहे.

परंतु, कोरोना महामारीने सर्व काही उद्ध्वस्त केले. मेळघाटातील गरिबी आणि दारिद्र्यामुळे वसतिगृहात राहण्यासाठी विद्यार्थ्यांकडे पैशांचा अभाव होता. कारण ६०-७०% विद्यार्थी हे आदिवासी असून अतिदुर्गम भागातून येतात. त्यांच्या घरात शिक्षणाचे वातावरण नाही, गावापर्यंत पक्के रस्ते नाहीत, वीज नाही आणि शिक्षण ही त्यांची प्राथमिकता नाही. यामुळे मेळघाटातील शिक्षणाची अवस्था फारच बिकट आहे.

त्यामुळे विद्यार्थ्यांनी, विशेषतः मुलींनी महाविद्यालयात शिकण्यासाठी यावे, कारण मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व अधिक आहे. जर घरातील एक मुलगी शिकली, तर ती स्वतः स्वावलंबी होण्यासोबतच इतरांनाही स्वावलंबी बनवते, ज्यामुळे कुटुंबाचा विकास होतो, समाजात समानतेची भावना वाढते आणि कुटुंब व देशाची आर्थिक प्रगती होते. तसेच, एक मुलगी शिकली तर सामाजिक समस्यांमध्ये घट होते.

'श्री दत्ताजी डिडोळकर विद्यार्थी विकास निधी सेवा सहयोग' ही संघटना श्री दत्तात्रेय डिडोळकर यांच्या अनुयायांनी त्यांच्या नावाने सुरू केली, जी विद्यार्थ्यांच्या विकासाचे व्रत घेऊन कार्य करते. दत्ताजी डिडोळकर हे महाराष्ट्रात जन्मलेले एक राष्ट्रवादी विचारवंत आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कुशल संघटक होते. त्यांनी संपूर्ण भारतात संघाचे विचार पोहोचवण्याचे कार्य केले. संघ प्रचारादरम्यान त्यांनी युवकांमध्ये राष्ट्रप्रेम, शिस्त, समर्पणाची भावना आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव जागृत केली. त्यांनी आपल्या आयुष्यात शहरी आणि ग्रामीण युवकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. एक कुशल संघटक म्हणून ही त्यांची ख्याती आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, हे ध्येय समोर ठेवून तरुणांना नेहमीच प्रेरित केले. १९४९ मध्ये त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची (ABVP) स्थापना केली. आज त्यांचे अनुयायी या संस्थेच्या माध्यमातून तरुणांचा शैक्षणिक विकास करण्याचे कार्य करत आहेत.

दुसरीकडे, अमरावती जिल्ह्याचे तत्कालीन महसूल, वनमंत्री आणि पालकमंत्री जगदीश गुप्ता मेळघाटातील समस्यांशी चांगल्या प्रकारे परिचित होते. कुपोषण, रोजगारासाठी स्थलांतर, पाण्याची समस्या, गरिबी-अज्ञान आणि आरोग्य सुविधांच्या अभावामुळे वाढलेला मृत्यूदर या समस्यांचे निराकरण करण्यासाठी त्यांनी १९९६ मध्ये 'सिपना शिक्षण प्रसारक मंडळ'ची स्थापना केली.

## पेपरफुटी प्रकरणातील मुख्य आरोपी

प्रकरणाला २७ फेब्रुवारीपासून आज १५ दिवस पुर्ण होत आहे.तरीही या प्रकरणातील मुख्य आरोपी सुशील अभ्यंकर याच्यावर पोलीसांची विशेष मेहर असल्याची चर्चा तालूक्यात होत आहे.

या प्रकरणात दि.१ मार्चला अटक झालेले गटशिक्षणाधीकारी सुधीर खोडे ,सह आरोपी अनील हाडोळे आणि दोन पालक यांची ११ मार्चला न्यालयाने जमानत केली असून पोलीस ज्याला मुख्य सुत्रधार म्हणत आहे तो अजुनही फरार का ? आजच्या आधुनीक तंत्रज्ञानाच्या काळात पोलीस प्रशासनाला आरोपी सापडू नये हा यक्ष प्रश्न पोलीसांबाबात निर्माण होत आहे.

## शिक्षक आमदार निवडणुकीत पुन्हा

असा प्रचार केला की त्याची चर्चा येणा-या पन्नास वर्षातही विसरली जाणार नाही आणि ते तंत्र म्हणजे 'पैठणी साडी.' या तंत्राने संबाधित उमेदवाराने साध्य करुन दाखवले. परंतू प्रचार कसा केला आणि पैठणी केव्हा दिली हे निवडणुक निकाल लागल्यानंतरच चर्चेत आले. आता निवडणुकीला सहा वर्षे होत आहे. काही महिण्यात निवाडणुकीचा कार्यक्रम पून्हा सुरु होईल. परंतू या महाशयांनी आपल्या पैठणी साडीचा प्रयोग पुन्हा सुरु केला असुन ज्यांना अजूनही लोकशाही आणि आपले मत यावर विश्वास आहे. त्यांच्यामध्ये प्रचंड संतापाची लाट निर्माण झाली असून मकर संक्रांतीला वाटलेल्या पैठणी साड्यांचा ऊत्तरायण व्हायच्या ऐवजी दक्षिणायन तर होणार नाही ना अशी चर्चा संपुर्ण शिक्षक मतदारांमध्ये आहे.तर येणाऱ्या काही दिवसातच रणधुमाळीला सुरवात होऊन पैठणीचे वजन चालेल की शिक्षकांचे प्रश्न सोडवणा-याचे हे येणारा काळच सांगेल.

## होस्टेलमधील लैंगिक अत्याचार

शिवाजी शिक्षण संस्थेच्या तत्कालीन पदाधिकारी यांच्याकडे गेले आणि त्यानंतर पोलिसापर्यंत पोहोचले. याप्रकरणात पोलिसांनी तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. न्यायालयात दोन्ही पक्षाच्या युक्तीवादानंतर आरोपीचा दोष सिध्द झाला. न्यायालयाने गणेश इंगोले व अल्का डिके यांना शिक्षा ठोठावली, तर इतर आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. याप्रकरणात सरकारी अभियोक्ता ॲड. पंकज इंगळे व ॲड. सोनाली क्षीरसागर यांनी यशस्वी युक्तीवाद केला, तर कोर्ट पैरवीस अरुण हटवार व विनोद कनोजिया यांनी सहकार्य केले. हा प्रकार होस्टेल व्यवस्थापनातील दुर्लक्षाचे गंभीर उदाहरण आहे. दोषींना फक्त शिक्षा न ठोकता, पिडितेला आर्थिक मदत देखील दिली गेली आहे.

**शिक्षा व नुकसान भरपाई-** -आरोपी चौकीदार गणेश इंगोले : पोक्सो कायद्याअंतर्गत दहा वर्षांची कठोर शिक्षा, २५,००० रुपये दंड (दंड न भरल्यास सहा महिने कारावास); भा.दं.वि. कलम ५०६-ब अंतर्गत तीन वर्षांची कठोर शिक्षा, ५,००० रुपये दंड (दंड न भरल्यास सहा महिने कारावास).-आरोपी अधिक्षिका अल्का डीके – सहा महिने साधा कारावास, २,००० रुपये दंड (दंड न भरल्यास पंधरा दिवस कारावास). दोन्ही आरोपींना मिळून पिडितेला २०,००० रुपये नुकसान भरपाई द्यावी लागेल.

## १५ व १६ मार्चला विभागात अवकाळी

कृषी अधिक्षक अधिकारी डॉ. प्रशांत नाईक यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी पिकांची कापणी, खत व कीटकनाशक फवारणी यांसारखी कामे करताना हवामान अंदाजाचा विचार करून नियोजन करावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. परिपक्व झालेल्या पिकांची कापणी तात्काळ करावी तसेच कापणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत, असेही सूचित करण्यात आले आहे. तसेच वादळी वाऱ्यामुळे काम करताना शेतकऱ्यांनी सुरक्षिततेची काळजी घ्यावी. शक्य असल्यास शेतातील कामे टाळावीत व शेतातील पाळीव प्राण्यांनाही सुरक्षित ठिकाणी ठेवण्याचे आवाहन कृषी विभागाद्वारे करण्यात आले आहे.

## गॅस दरवाढीविरोधात काँग्रेसचे

परतवाडा शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल गवई, अनु. जाती विभागाचे अध्यक्ष राहुल गाठे, ओबीसी विभागाचे अध्यक्ष दिनेश वानखडे, राजेश हिवराळे, प्रतीक्षा डोंगरे, येतेशम नबील, असलम बंजारा गटनेता काँग्रेस, शहाजद पठाण, शेख कदीर पहेलवान, ओम घोरे, अजय दकरे, जी .एम खान, अरविंद नेतनराव, मो. शब्बीर,सुनील दौलतानी, सरफराज खान, मो. रजिक भाई , विशाल खानझोडे, कलीम शहा, प्रमोद कांबळे, संजय समुंद, गुड्डू भाई,सचिन गाठे, जय घोरे, ,रमेश रावेकर, विजय सिरसुड्डे,अकबर सर, मो. नाजीम, राजेंद्र वानखडे, सुखदेव गाठे, प्रदीप गाठे, अमोल जवंजाळ, रोशन गाठे, धीरज आपले, रितेश दामले,संजय गाठे, जॉन अली रिजवी, मंदुराजा, रितेश दामले, अजय डोंगरे,अशोकराव दाणे, नान्या शेळके,भारत वर्धे, प्रमोद पांडे, अन्सार भाई, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## मनपात अस्वच्छता निर्मूलन

अविनाश मार्डीकर ,गटनेता चेतन गावंडे, विरोधी पक्ष नेता विलास इंगोले, गटनेता नाना आमले, स्वीकृत सदस्य मिलिंद चिमोटे, दिनेश बूब, एमआयएमचे गटनेता अब्दुल शेख हमीद, सय्यद राशिक अली, स्वीकृत नगरसेवक प्रशांत देशपांडे, गटनेता राजेंद्र तायडे, प्रशांत वानखडे यांचा समावेश आहे. शहरातील स्वच्छतेसाठी हे समिति कार्य करणार आहे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीच्या कामावर समिती नजर ठेवणार आहे. समितीमुळे शहरातून घाण हद्पार होईल असे वाटत आहे.

## देवगाव जलशुद्धीकरण केंद्राला

जलशुद्धीकरण केंद्रावर नियुक्त करण्यात आलेले आवश्यक कर्मचारी अनुपस्थित असल्याचे निदर्शनास आले. तसेच जलशुद्धीकरणासाठी वापरली जाणारी गॅस यंत्रणा पूर्णपणे बंद अवस्थेत आढळली. पाणी शुद्धीकरणासाठी वापरली जाणारी तुरटी निकृष्ट दर्जाची असल्याचेही आढळून आले. याशिवाय केंद्रावर वापरात असलेली ब्लिचिंग पावडर मुदतबाह्य असल्याचे उघडकीस आले. जलशुद्धीकरण केंद्राची योग्य देखभाल होत नसल्याचे स्पष्ट दिसून आले. पाणीपुरवठ्यासारख्या महत्त्वाच्या विषयासाठी अचलपूर नगर परिषद पाणीपुरवठा विभागाकडून कोट्यवधी रुपयांची तरतूद केली जात असताना संबंधित यंत्रणा व कंत्राटदारांकडून निष्काळजीपणा होत असल्याचे यावेळी उपाध्यक्ष खुर्शीदा बानो यांनी नमूद केले. उपाध्यक्ष खुर्शिदा बानो यांनी संपूर्ण कामकाजाचा आढावा घेत लवकरच प्रशासकीय पातळीवर तपासणी करण्यात येईल तसेच नागरिकांना स्वच्छ व नियमित पाणीपुरवठा होण्यासाठी आवश्यक ती कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, अशी भूमिका त्यांनी यावेळी व्यक्त केली.

## इलेक्ट्रिक केबल चोरणारे

आणखी बंडल गायब असल्याचे आढळले. यावरून पोलिसांनी त्वरित गुन्हा नोंदवून तपास सुरु केला. याप्रकरणात पोलिसांनी गोपनीय माहिती व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी उपेंद्र महेंद्र पवार (वय २५) व विरेंद्र महेंद्र पवार (वय१९) यांना ताब्यात घेतले. तर त्यांचा साथीदार वसीम खान रफीक खान (वय३६) यांच्याकडे चोरी केलेला माल मिळून आला. त्यांच्याकडूनही केबल जप्त करण्यात आले. असा एकुण २,६५,००० रुपये किमतीचे केबल, जळलेल्या तारांच्या स्वरूपात मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे व सहा. पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट, निलेश गावंडे, पोलिस उपनिरीक्षक राहुल महाजन, एएसआय योगेश श्रीवास, पोलिस हवालदार सुभाष पाटील, शशिकांत गवई, हरीष चौधरी, सागर चव्हान, जावेद पटेल व जयेश परिवाले यांनी तपास व कारवाई केली.

## सण-उत्सव काळात पाणी व

प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी विविध मुद्दे मांडले. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी नमूद केले की अमरावती शहर अत्यंत शांतताप्रिय असून येथे हिंदू आणि मुस्लिम नागरीकांनी नेहमीच शहरातील शांतता कायम ठेवण्यासाठी सहकार्य केले आहे, त्यामुळे आगामी काळातही शहरवासियांकडून अशाच सहकार्याची अपेक्षा आहे. त्यांनी सर्वांनी आपसामध्ये भाईचारा राखावा आणि कोणताही अनुचित प्रकार होऊ नये, यासाठी एकजुटीने काम करण्याची गरज असल्याचे सांगितले. याशिवाय शहरातील साफसफाईला प्राधान्य देणे, सण-उत्सव काळात पाणी व विजपुरवठा खंडित होऊ नये याबाबत संबंधित विभागांना सूचित करण्याचे निर्देशही बैठकात देण्यात आले. शहरातील सण-उत्सवानिमित्त लावलेले शुभेच्छा फलक सण संपताच काढून घेण्याचेही आदेश मनपा अधिकाऱ्यांना देण्यात आले. पोलीस आयुक्तांनी उपस्थितांना सोशल मीडियावर अफवांवर विश्वास ठेवू नये, सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या माहितीची खात्री करावी आणि समाजात तेढ निर्माण करणाऱ्या पोस्टची माहिती पोलिसांना द्यावी असे आवाहन केले. सोशल मीडियावर पोस्ट करणाऱ्यांवर सायबर पोलीसकडून लक्ष ठेवले जाईल, तसेच शहरातील शांतता भंग करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई केली जाईल. कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुद्धही कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. पोलीसांनी तरुण मंडळींना अफवांमुळे अनुचित प्रकार होऊ नयेत, यासाठी समुपदेशन करावे, तसेच योग्य सूचना द्याव्यात, असेही बैठकदरम्यान सुचवण्यात आले. यामुळे रमजान मास व ईदच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता राखणे व नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे हे मुख्य उद्दिष्ट ठरले आहे.

जनमाध्यम
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ शुक्रवार, १३ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
एक प्रतिष्ठित सवय
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# स्थानिक गुन्हे शाखेचे धाडसत्र सुरु

## मोहगव्हाणसह विविध ठिकाणी अवैध दारू व जुगार अड्ड्यांवर छापे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**जिल्ह्यातील गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा बसविण्यासाठी पोलिस विभागाने धडक कारवाई सुरू केली असून स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम यांनी जिल्ह्यातील विविध ठिकाणी अवैध दारू निर्मिती व जुगार अड्ड्यांवर छापे टाकत मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.**



पोलीस विभागाकडून कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी वेळोवेळी अवैध दारू, जुगार, गुटखा तसेच शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्ह्यांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी यांना वाशिम जिल्ह्यातील पोलीस स्टेशन अनसिंग हद्दीतील ग्राम मोहगव्हाण येथे धरणाच्या काठावर काही व्यक्ती गावठी हातभट्टीची दारू गाळत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारे दिनांक ११ मार्च २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक तयार करून पहाटे ५ वाजता मोहगव्हाण येथे रवाना करण्यात आले. पथकाने धरण परिसराला चोहोबाजूंनी वेढा घालून छापा टाकला. मात्र पोलिसांची चाहूल लागताच संशयित आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

घटनास्थळाची पाहणी केली असता झाडाझुडपांमध्ये लपवून ठेवलेले तसेच जमिनीत खड्डा करून पुरून ठेवलेले मोहाच्या सडव्याचे २० ड्रम, ४ प्लास्टिकच्या टाक्या व २० पिपे आढळून आले. त्यामध्ये सुमारे ४,७०० लिटर मोहामाच गावठी हातभट्टी दारू साठवून ठेवण्यात आली होती. या दारूची अंदाजे किंमत सुमारे ७ लाख १० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. पंचासमक्ष संपूर्ण दारूचा साठा नष्ट करण्यात आला.

या प्रकरणी फरार आरोपी म्हणून जमिल रहेमान नौरंगाबादी (रा. मोहगव्हाण) याच्यासह अन्य संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पोलीस स्टेशन कारंजा ग्रामीण हद्दीत प्रमोद गंगाराम चव्हाण याच्या ठिकाणी छापा टाकून त्याच्या ताब्यातून ७ हजार ३५० रुपयांची देशी-विदेशी दारू जप्त करण्यात आली. अशाप्रकारे एकूण ७ लाख १७ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला असून आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) (फ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याशिवाय पोलीस स्टेशन वाशिम शहर व कारंजा शहर परिसरात जुगार अड्ड्यांवरही धाड टाकून १० हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अपर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी मंगरुळपीर विशाल क्षीरसागर, पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, पोउपनि शेखर मास्कर, बुद्ध रेघीवाले तसेच स्थानिक गुन्हे शाखा वाशिमच्या पथकाने या कारवाईसाठी विशेष मेहनत घेतली.

जिल्ह्यातील अवैध दारू निर्मिती, जुगार आणि इतर बेकायदेशीर कृत्यांविरोधात अशीच कठोर कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

# मृत्यू दाखल्यासाठी २ हजारांची लाच घेताना ग्रामपंचायत परिचर जाळ्यात

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शेतजमिनीची हिस्सेवाटणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या आईच्या मृत्यू दाखल्यासाठी दोन हजार रुपयांची लाच स्वीकारताना डोंगरकिन्ही ग्रामपंचायतीतील परिचराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडल्याची खळबळजनक घटना ११ मार्च रोजी घडली.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांच्या आईचे निधन झाले असून शेतजमिनीची हिस्सेवाटणी करण्यासाठी त्यांना मृत्यू दाखल्याची आवश्यकता होती. त्यासाठी त्यांनी ग्रामपंचायत डोंगरकिन्ही येथील शिपाई/परिचर राजेश बळीराम बाविस्कर (वय ५४, रा. डोंगरकिन्ही ता. मालेगाव जि. वाशिम) यांच्याकडे मृत्यू दाखला मागितला.

यावेळी बाविस्कर यांनी 'दाखला मी तयार करून देतो, मात्र त्यासाठी २५०० रुपये द्यावे लागतील, अन्यथा दाखला मिळणार नाही,' अशी मागणी केल्याचा आरोप आहे. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदारांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांच्याकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीनंतर ११ मार्च २०२६ रोजी पंचांसमक्ष पडताळणी करण्यात आली. त्यात बाविस्कर यांनी लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर सापळा रचण्यात आला. सापळा कारवाईदरम्यान बाविस्कर यांनी तडजोडीअंती तक्रारदाराकडून २ हजार रुपये स्वीकारून ते आपल्या शर्टाच्या वरच्या खिशात ठेवले. तक्रारदारांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्यांना



जागीच ताब्यात घेतले. अंगझडतीदरम्यान आरोपीकडून २ हजार रुपयांची लाच रक्कम व मोबाईल फोन जप्त करण्यात आला. तसेच आरोपीच्या घराची झडतीही रात्री उशिरापर्यंत सुरू होती. या प्रकरणी मालेगाव पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ मधील कलम ७ व ७-अ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून गुन्हा दाखल होताच अटक करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

ही कारवाई पोलीस निरीक्षक अल्का गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. यावेळी पर्यवेक्षण अधिकारी जगदीश परदेशी (पोलीस उपअधीक्षक), तपास अधिकारी बालाजी तिप्पलवाड, तसेच पो.हवा. विनोद मारकंडे, योगेश खोटे, पो.शि. महेश परमेश्वरे, चा.पो.शि. नाविद शेख आदी पथकातील कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. ही कारवाई बापू बांगर (पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती) व सचीन्द्र शिंदे (अप्पर पोलीस अधीक्षक) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बाजार समितीत पाणी सुविधा - विजय भुतडा यांचा स्तुत्य उपक्रम

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

कृषी उत्पन्न बाजार समिती मालेगाव येथे शेतकरी, व्यापारी तसेच कर्मचारी बांधवांसाठी पिण्याच्या पाण्याची उत्तम सुविधा उपलब्ध व्हावी या उद्देशाने विजय भुतडा यांनी आपल्या वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुमारे २० हजार रुपये किंमतीचा फिल्टर प्लांट उपलब्ध करून दिला. त्यांच्या या समाजोपयोगी उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

यावेळी शेतकऱ्यांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे यासाठी रवि भुतडा आणि महेश जाजू यांनी शेतकऱ्यांसाठी बोअर उपलब्ध करून दिला. तर मोटार पंप, पाईपलाईन आदी साहित्य संचालक मंडळाच्या सहकार्याने उपलब्ध करून देण्यात आले. याशिवाय कर्मचारी बांधवांनी थंड पाण्याचा फिल्टर उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेतला.

या सर्व कामासाठी अंदाजे १ लाख ५० हजार रुपये खर्च करण्यात आला असून तो दान स्वरूपात कृषी उत्पन्न बाजार समितीला देण्यात आला आहे. या सुविधेमुळे बाजार समितीत येणाऱ्या शेतकरी, व्यापारी तसेच कर्मचाऱ्यांना पिण्याच्या पाण्याची चांगली सोय झाली आहे. तसेच जनावरांसाठी हौदामध्येही पाणी सोडण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

या उपक्रमामुळे बाजार समिती परिसरात समाधान व्यक्त करण्यात येत असून विजय भुतडा, रवि भुतडा, महेश जाजू, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती , उपसभापती , सर्व संचालक मंडळ तसेच कर्मचारी बांधवांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# कृषी अधिकाऱ्यांच्या वेळ काढू धोरणामुळे शेतकऱ्यावर आली फळबाग उपटून टाकण्याची वेळ

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील भुर येथील अल्पभूधारक शेतकरी विकास गजानन देवळे यांनी सन २०२३-२४ या वर्षी कृषी विभागाच्या कृषी सहायक यांचेकडे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतून सीताफळ फळबाग लागवड करन्यासाठी आवश्यक कागदपत्रे दिलीत.

देवळे यांचे प्रकरण मंजूर करण्यात आले, त्यांनी सीताफळ कलमांची लागवडही केली पण वर्षभर त्यांना अनुदान मिळालेच नाही.

याबाबत सबंधीत कृषी सहायक कु. विजयता सुर्वे व कृषी पर्यवेक्षक कैलास महाले यांना वारंवार विचारणा केली असता अनुदान मिळते असेच सांगितले, दिड वर्ष झाल्यावर त्यांनी मला सीताफळ उपटून टाका व तुम्ही आता संत्रा या पिकाची लागवड करा असा सल्ला दिला, देवळे या शेतकऱ्यांनी सन २०२४-२५ या वर्षी संत्रा या पिकाची लागवड करण्यासाठी सीताफळ उपटून टाकले व संत्रा या पिकाची लागवड केली आहे.

संत्रा पिकाची लागवड करून आज तीन वर्षे होत आले असताना एक छदामही अनुदान अद्याप मिळालेले नाही. आता कैलास महाले, उप करूनही अधिकारी व विजयता सुर्वे सहायक कृषि अधिकारी म्हणतात की, यावर्षी मंजुरी मिळाली नाही तरी भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेत लाभ देणार आहोत. आणि तिसऱ्यांदा त्यांनी माझ्या प्रकरणासाठी माझी कागदपत्रे घेतलीत, संबंधित शेतकरी हे अल्पभूधारक असून, शेतीसोडून उदरनिर्वाहाचे इतर कुठलेही साधन त्यांचेकडे नाही. या शेतकऱ्याच्या महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना फळबाग लागवड प्रकरणाची वस्तीस्थिती तपासली असता धक्कादायक माहिती आली. विकास गजानन देवळे यांचे सीताफळ या पिकाचा प्रस्ताव सन २०२३-२४ मध्ये ऑनलाईन मंजूर करण्यात आला ज्याची अनुदानाची प्रशासकीय मंजूर रक्कम रुपये ११८७५९ एवढी होती शेतकऱ्याने सीताफळ कलमांची लागवडही केली पण कृषी सहायक , कृषी पर्यवेक्षक यांनी शेतकऱ्यांवर अन्याय करून त्यांना एक रुपयाचेही बिल दिलेले नाही उलट त्यांचे प्रकरण ऑनलाईन प्रणालीवरून डिलिट केल्याचे दिसते. याच शेतकऱ्याचे सन २०२४



-२५ या वर्षात पुन्हा नव्याने सीताफळ पिकाचे प्रकरण कृषी विभागाने ऑनलाईन मंजुर केले ज्याची अनुदानाची Secretary मंजूर रक्कम रुपये १३९१५६ आहे, यानंतर मात्र या सहायक कृषि अधिकारी कु सुर्वे व उप कृषी अधिकारी कैलास महाले यांनी त्यांना सिताफळ झाडे उपटून संत्रा पिकाची लागवड करण्याचा सल्ला दिला व त्यांनी देवळे यांचे प्रकरण पुन्हा डिलिट केले, त्यानंतर माञ शेतकऱ्याला वेगवेगळे कारणं सांगून झुलवत ठेवले, आता त्यांना भाऊसाहेब फुंडकर योजनेत लाभ देण्याचे गाजर दाखविण्यात येत आहे.

# अडोळी येथे महीला समता सैनिक दलाची स्थापना

■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथे भारतीय बौद्ध महासभा प्रेणीत महीला समता सैनिक दलाची स्थापना जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि.८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आली.

सर्व प्रथम तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केले.नंतर समता सैनिक दलाचे केंद्रीय शिक्षक अश्विन खिल्लारे, विभागीय शिक्षक रनपालसावळे, केंद्रीय महीला शिक्षीका कविता डोंगरदिवे,आणि समाजसेवक राजकुमार पडघान, ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन , आदिशक्ती महीला अभियान समिती अध्यक्षा केशरबाई खिल्लारे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख



उपस्थित असलेले समाजसेवक राजकुमार पडघान व ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, आदिशक्ती महीला अभियान समिती अध्यक्षा केशरबाई खिल्लारे,यांनी महीला समता सैनिक दलाच्या युनिटला शुभेच्छा देताना सांगितले की अडोळी येथे ९९ वर्षानंतल समता सैनिक दलाची स्थापना होत आहे.त्यामुळे येथील महीलांनी सामाजिक चळवळीत उचललेले पाऊल म्हणजे कौतुकास्पद आहे.त्यामुळे नवनिर्वाचित महीला समता सैनिक दलाच्या युनिटला हार्दिक शुभेच्छा.

तर याच वेळी केंद्रीय शिक्षक अश्विन खिल्लारे यांनी आपल्या भाषणात सांगितले की भारतीय बौद्ध महासभा प्रेणीत असलेली समता सैनिक दल हे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन करून अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम करण्यासाठी केली आहे.म्हणून आपण समता सैनिक दलाच्या राष्ट्रीय अध्यक्षा मिराताई आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली चालणारी समता सैनिक दल असून त्या नियमानुसार व ध्येयाने चालवणारे आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज पडघान यांनी केले तर आभार प्रदर्शन अर्चना तायडे यांनी केले.नंतर महीला समता सैनिक दलाच्या नामफलकाचे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अर्चना तायडे, शितल पडघान, रत्नमाला पडघान, सुनिता पडघान,अन्नपूर्णा तायडे, द्वारकाबाई खंडारे, आम्रपाली पडघान, शकुंतला पडघान, अजंली पडघान, पवित्राबाई सरकटे, आशाबाई मोगले, रमाबाई शेजूळ, विमलबाई पडघान,यांची निवड केंद्रीय शिक्षक अश्विन खिल्लारे, विभागीय शिक्षक रनपालसावळे व महीला केंद्रीय शिक्षीका कविता डोंगरदिवे यांनी घोषित केली आहे.

# अफवांवर विश्वास ठेऊ नये –प्र. जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मध्यपूर्व आशिया, अमेरिका आणि युरोपमध्ये सध्या सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात इंधनाचा तुटवडा भासणार नाही. जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत राहील, याबाबत जिल्हा प्रशासन सतर्क आहे.अशी माहिती प्र जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांनी दिली आहे.

भारत पेट्रोलियम, हिंदुस्थान पेट्रोलियम आणि इंडियन ऑईल या तिन्ही प्रमुख कंपन्यांकडे पेट्रोल, डिझेल, सीएनजी आणि एलपीजी गॅस सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

# जिल्हा स्त्री रुग्णालयात शौचालयाची गैरसोय; कृत्रिम शौचालय उभारण्याची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

नालंदा परिसरातील जिल्हा स्त्री रुग्णालय असलेल्या रूग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांसोबत येणाऱ्या नातेवाईकांना शौचालयाची मोठी गैरसोय होत असल्याची बाब समोर आली आहे. या समस्येमुळे रुग्णांच्या नातेवाईकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित ठिकाणी तातडीने कृत्रिम शौचालयाची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात उपजिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करून समस्या मांडण्यात आली. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, रुग्णालयात दररोज मोठ्या संख्येने रुग्ण उपचारासाठी येत असतात. त्यांच्यासोबत आलेल्या नातेवाईकांचीही मोठी वर्दळ असते. मात्र, त्यांच्या सोयीसाठी



शौचालयाची पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांच्या मूलभूत गरजांचा विचार करून प्रशासनाने तातडीने कृत्रिम शौचालय उभारण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी वज्रादेही महिला महिला संघटनेच्या अध्यक्षा आरती ठोके यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी सदस्यांनी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

# विद्याभारती शाळेत यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात

**वाशीम :** येथील विद्याभारती शाळेत महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री तथा आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांची ११४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक नितेश मिटकरी तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे संचालक सुमित सुरेशराव मिटकरी तसेच शाळेचे पर्यवेक्षक विजय गोटे यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या विषयी आपले मनोगत भाषणातून व्यक्त केले. तसेच शाळेचे पर्यवेक्षक विजय गोटे यांनी थोर व्यक्तिमत्व असलेल्या यशवंतराव चव्हाण यांच्या जीवन कार्याची माहिती विद्यार्थ्यांना पटवून दिली.

**Change In Name**

MY OLD NAME IS
**MOHAMMAD IBRAHEEM KHAN MAHMOOD ALI KHAN**
Which now I am Changing as new name
**MOHD IBRAHIM KHAN MAHMOOD ALI KHAN**
hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same
Sing by
**MOHD IBRAHIM KHAN MAHMOOD ALI KHAN**
R/O Pathan pura Ward No.32 Washim Dist Washim Pin 444505 Maharashtra mob.9527486155

# फळबाग लाभार्थ्यांचे अनुदान अधांतरीच

## कृषी विभागाची भूमिका संशयास्पद; महिनाभरात उर्वरित रक्कम मिळेलच कशी

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील गोगरी या गावातील रोजगार हमी योजना फळबाग लाभार्थी ऋषिकेश भिकाजी पवार यांनी जानेवारी महिन्यात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वाशीम यांचेकडे मागील चार महिन्यापासून नियुक्त कृषी सहायक यांचेकडून फळबाग उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर मानसिक व प्रशासकीय त्रास सहन करावा लागत असल्याबाबत, पदभार स्वीकारल्यापासून प्रत्यक्ष गावात येऊन कामकाज न केल्याबाबत, फळबागेच्या मजुरीचे मस्टर न काढून लाभार्थी शेतकऱ्यांना लाभापासून वंचित ठेवणे व याबाबत दूरध्वनीवर वारंवार संपर्क साधला असता उडवा उडवीची उत्तरे देणे कोणतीही ठोस कार्यवाही न करणे याबाबत तक्रारीचें निवेदन देऊन न्याय देण्याची मागणी केली.

त्यानंतर दुसऱ्याच दिवशी दिनांक १३ जानेवारी रोजी तालुका कृषी अधिकारी, सचिन कांबळे, मंडळ कृषी अधिकारी प्रदीप गुट्टे व महिला सहायक कृषि अधिकारी कु. विजयता सुर्वे हे तिघे फळबागेच्या तपासणीसाठी गावात गेले असता



शोभा सुभाष साखरे या शेतकऱ्याच्या शेतात ऋषीकेश पवार , मंगेश मोतीराम खंडारे व तालुका कृषि अधिकारी यांची शाब्दिक बाचाबाची झाल्याचा व्हिडीओ व चित्रफित सोशल मीडियात प्रचंड वायरल होऊन शेतकरी, समाजातून तीव्र प्रतिक्रिया आल्याने शासनाने तालुका कृषी अधिकारी सचिन कांबळे यांनां निलंबित केले आहे. त्यानंतर प्रश्न उरतो की ऋषिकेश पवार यांनी गोगरी गावातील एकूण १५ लाभार्थ्यांच्या अडकलेल्या अनुदानाबाबत तक्रारीचें निवेदनावर कुठली कार्यवाही झाली व शेतकऱ्यांना अनुदान मिळाले का, किंवा मिळणार आहे का?

तर याठिकाणी धक्कादायक माहिती हाती आलेली आहे. ऋषिकेश पवार यांचे निवेदनाची सखोल चौकशी करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी वाशीम यांची नेमणूक झाल्यानंतर अनिल तुकाराम राठोड या उपविभागीय कृषी अधिकारी यांना तात्काळ आपला सखोल चौकशीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या, अनिल राठोड यांनी सादर केलेला अहवाल व वास्तवातील परिस्थितीत भरपूर तफावत असल्याचे दिसून येते. अनिल राठोड यांनी घेतलेल्या सहायक कृषी अधिकारी यांचे जबाबात त्यांनी म्हटले की फळबागेच्या तिसऱ्या वर्षातील दुसऱ्या सहमाहितील खते देने, व पाणी देणे एवढेच अनुदान देणे बाकी आहे. व ते जानेवारी महिन्यानंतर देन्यात येईल, असाच लेखी अहवाल प्रभारी तालुका कृषी अधिकारी, मंगरूळपीर यांनीही दिल्याचे दिसून येते, व या जबाबाचे आधारे कुठलीही शहानिशा न करता किंवा कुठल्याही शेतपरिस्थितीची तपासणी न करता केवळ ऋषिकेश पवार या शेतकऱ्याचे फळबाग प्रकरणाबाबत अनिल राठोड यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वाशीम यांना आपला चौकशी अहवाल घाईत सादर केल्याचे दिसून येते. पवार यांनी आपल्या गोगरी गावातील उर्वरित १५ लाभार्थी शेतकऱ्यांनाही हाच जाच असल्याचे आपले निवेदनात म्हटलेले असताना अनिल राठोड यांचे अहवालात फक्त ऋषिकेश पवार यांचे बाबतीत विवेचन असून, उर्वरित १४ शेतकरी वाऱ्यावर सोडल्याचे दिसून येते महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना फळबाग लागवड योजना ही ऑनलाईन प्रणालीवर चालत असून संपूर्ण माहिती जनतेसाठी खुली असताना अनिल राठोड चुकीचा अहवाल कसा देऊ शकतात हा खरा प्रश्न या शेतकऱ्यापुढे उभा राहिलेला आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १०५ ■ शुक्रवार, १३ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## डोक्यावर सिलेंडर, रस्त्यावर चूल; वर्ध्यात काँग्रेसच्या महिला पोहोचल्या जिल्हा कार्यालयावर

### -महिला काँग्रेसचा मोदी सरकारविरोधात एल्गार'

**वर्धा जनमाध्यम :** घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात करण्यात आलेल्या वाढीविरोधात वर्धा जिल्हा महिला काँग्रेसने गुरुवारी (१२ मार्च) जोरदार आणि अनोखे आंदोलन उभारून मोदी सरकारविरोधात संतापाचा ज्वालामुखी उफाळून दिला. महात्मा गांधी पुतळ्याजवळ, सिव्हिल लाईन्स येथे काँग्रेसच्या महिला कार्यकर्त्यांनी रस्त्यावरच चूल पेटवून स्वयंपाक करत निषेध नोंदविला.

या आंदोलनाचे सर्वात लक्षवेधी दृश्य म्हणजे महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष सौ. अरुणाताई धोटे या डोक्यावर गॅस सिलेंडर घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचल्या. वाढत्या गॅसदरामुळे महिलांच्या चुली विझत असल्याचा संताप व्यक्त करत त्यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर जोरदार हल्लाबोल केला.

मोदी सरकारने घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात अचानक ६० रुपयांची वाढ करून सर्वसामान्य जनतेची 'पठाणी लूट' सुरू केल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. काँग्रेसच्या काळात सुमारे ४०० रुपयांत मिळणारा गॅस सिलेंडर आज ९७० रुपयांवर



पोहोचल्याने सामान्य कुटुंबांचे बजेट कोलमडल्याची टीकाही करण्यात आली. याशिवाय व्यावसायिक सिलेंडरच्या दरातही गेल्या आठवड्यात १५० रुपयांची वाढ होऊन तो दोन हजार रुपयांवर पोहोचल्याने हॉटेलमधील जेवणही महागण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

प्रदेशाध्यक्ष संध्याताई सव्वालाखे यांच्या आदेशानुसार वर्धा जिल्हा महिला काँग्रेसने हे आंदोलन उभारले. जिल्ह्यात अशा प्रकारे रस्त्यावर चूल पेटवून आणि सिलेंडर घेऊन आंदोलन करण्याचा हा पहिलाच प्रयोग असल्याचे काँग्रेस कार्यकर्त्यांनी सांगितले. अनेक सामाजिक प्रश्नांवर काँग्रेसकडे लढण्यासाठी मुद्दे असून हे आंदोलन पूर्णपणे यशस्वी झाल्याची प्रतिक्रिया नेत्यांनी दिली.

या आंदोलनात काँग्रेस जिल्हाध्यक्ष मनोज चांदुरकर, महाराष्ट्र काँग्रेस कमिटी सचिव अभ्युदय मेघे, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, ज्येष्ठ नेते राजेंद्र शर्मा, माजी जिल्हा परिषद सदस्य तथा गटनेते संजय शिंदे, धर्मपाल ताकसांडे, बाळा जगताप, राष्ट्रीय महिला काँग्रेस सहसचिव अर्चना भोमले, व्हीजेएनटी जिल्हाध्यक्ष सोनाली कोपुलवार, मनीषा मेघे, सपना शेंडे, पायल चांदेकर, मोणाली वंजारी यांच्यासह महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

## चुलीवरचा धूर झाला आता महाग :
# दरवाढीविरोधात संसदेत उठला अमर काळेंचा राग

### खा.अमर काळे यांचा सरकारवर हल्लाबोल; संसदेच्या पायऱ्यांवर ठिय्या आंदोलन

**वर्धा । नवी दिल्ली जनमाध्यम :** महागाईच्या आगीत होरपळणाऱ्या जनतेवर पुन्हा एकदा सरकारने गॅस दरवाढीचा घाव घातल्याचा आरोप करत वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांनी संसदेत जोरदार हल्लाबोल चढविला. स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरच्या दरात झालेल्या वाढीचा निषेध नोंदवत त्यांनी इतर विरोधी पक्षाच्या खासदारांसह संसदेच्या पायऱ्यांवर ठिय्या देत धरणे आंदोलन केले. या आंदोलनामुळे संसद परिसरात काही काळ राजकीय वातावरण चांगलेच तापले.

ईराणमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे देशात पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसच्या तुटवड्याबाबत लोकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असताना सरकारने कोणतेही ठोस स्पष्टीकरण न देता घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात तब्बल ६० रुपये तर व्यावसायिक सिलेंडरच्या दरात १०० रुपयांची वाढ केल्याने संतापाची लाट उसळली आहे. आधीच महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांची नापिकी आणि शेतमालाला मिळणाऱ्या कमी भावामुळे सामान्य




जनता आर्थिक कोंडीत सापडली असताना ही दरवाढ म्हणजे जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार असल्याची टीका खासदार काळे यांनी केली.

काँग्रेसच्या काळात केवळ पाच-दहा रुपयांची वाढ झाली तरी रस्त्यावर उतरून आंदोलन करणारे आज सत्तेत असताना मात्र जनतेला कसलीही कल्पना न देता थेट मोठी दरवाढ करत असल्याचा टोला त्यांनी लगावला. या निर्णयामुळे महिलांचे स्वयंपाकघराचे बजेट कोलमडले असून कुटुंबांच्या आर्थिक नियोजनावर मोठा परिणाम झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, व्यावसायिक गॅस सिलेंडर महागल्याने लग्नसमारंभातील जेवणावळींचे दर वाढले असून अनेक हॉटेल, खानावळी आणि छोटे व्यवसाय अडचणीत आले आहेत. त्यामुळे या दरवाढीचा फटका सर्वसामान्य नागरिकांपासून ते छोट्या व्यावसायिकांपर्यंत सर्वांनाच बसत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

यावेळी खासदार डॉ, प्रशांत पडोळे यांच्यासह विरोधी पक्षाच्या अनेक खासदारांनी संसदेच्या पायऱ्यांवर बसून सरकारच्या निर्णयाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. वर्धा लोकसभा मतदारसंघाच्या वतीने या दरवाढीचा तीव्र निषेध नोंदविण्यात आला असून सरकारने तात्काळ हा निर्णय मागे घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

## ज्ञानाची पंढरी वर्ध्यात सजणार
# दोन दिवशीय 'वर्धा ग्रंथोत्सव' १४-१५ मार्चला; साहित्यिक मेजवानीची पर्वणी

**वर्धा जनमाध्यम :** पुस्तकप्रेमी आणि साहित्यरसिकांसाठी वर्धा शहरात ज्ञानाचा उत्सव रंगणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सत्यनारायण बजाज सार्वजनिक जिल्हा वाचनालय येथे १४ व १५ मार्च रोजी दोन दिवशीय 'वर्धा ग्रंथोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. या ग्रंथोत्सवात कवी संमेलन, मुशायरा, परिसंवाद तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी लाभणार असल्याने जिल्ह्यातील साहित्यप्रेमींसाठी हा उत्सव विशेष आकर्षण ठरणार आहे.




ग्रंथोत्सवाचे उद्घाटन १४ मार्च रोजी सकाळी ११ वाजता पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून खासदार अमर काळे, आमदार दादाराव केचे, अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, समीर कुणावार, राजेश बकाने, सुमित वानखेडे, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, जिल्हाधिकारी वान्मथी सी, शिक्षणाधिकारी डॉ. जयश्री घारफळकर, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. उद्घाटनापूर्वी सकाळी ८ वाजता लोक विद्यालय येथून ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता कवी संमेलन आयोजित करण्यात आले असून जिल्ह्यातील नामवंत कवी यात सहभागी होणार आहेत. तसेच सायंकाळी ७ वाजता गझल मुशायरा रंगणार आहे. १५ मार्च रोजी सकाळी ११ वाजता 'मराठी भाषेच्या संवर्धनाच्या दिशा' या विषयावर परिसंवाद होणार असून डॉ. वंदना पळसापुरे, डॉ. संदीप सपकाळे, डॉ. प्रमोद नारायणे आणि डॉ. मेघा चुटे सहभागी होणार आहेत. दुपारी ३ वाजता कवी व अभिनेते किशोर बळी यांचा 'सारं गाव मामाचं' हा एकपात्री प्रयोग सादर केला जाणार आहे. सायंकाळी ५ वाजता उत्कृष्ट वाचक सन्मान व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे.ग्रंथोत्सवात ग्रंथप्रदर्शन व विक्री देखील होणार असून जिल्ह्यातील साहित्यप्रेमी, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या साहित्यिक पर्वाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी नितीन सोनवणे यांनी केले आहे.

## नागपाल हत्या प्रकरणाची सीआयडी चौकशी करा

### आमदार अभिजित वंजारी यांची सभागृहात मागणी

**वर्धा । मुंबई जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील पुलगाव येथील तरुण व्यावसायिक भरत नागपाल यांच्या हत्याकांड प्रकरणाची सखोल चौकशी सीआयडीमार्फत करण्यात यावी, अशी मागणी आमदार अभिजित वंजारी यांनी राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली. पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून त्यांनी हा गंभीर विषय सभागृहाच्या निदर्शनास आणून दिला.

आमदार वंजारी यांनी सांगितले की, चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील नदीपात्राजवळ तसेच वर्धा जिल्ह्यातील वडनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीत वर्धा नदीपात्रातील रेती उत्खननाच्या सीमांकनाच्या वादातून दोन गटांमध्ये हिंसक संघर्ष झाला. या संघर्षात पुलगाव येथील तरुण व्यावसायिक भरत नागपाल



यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. नागपाल हे भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.वरोरा तालुक्यातील बामर्डा वाळू घाटावर सुमारे दहा ते बारा जणांनी नागपाल यांच्यावर हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेत त्यांचे काही सहकारी जखमी झाले होते. पोलिसांनी या प्रकरणात काही आरोपींना अटक केली आहे. या घटनेनंतर नागपाल यांच्या मित्रपरिवार, व्यापारी वर्ग तसेच पंजाबी सेवा समितीच्या वतीने मूक मोर्चा काढून प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. राज्यात वाळू उत्खननाच्या वादातून हिंसक घटनांचे प्रमाण वाढत असल्याची बाब गांभीर्याने घेण्याची गरज असल्याचे आमदार वंजारी यांनी सांगितले.

## कार्यालय नगर पंचायत सेलू
## ता.सेलू, जि.वर्धा-४४२१०४

दुरध्वनी - ०७१५५-२२०१

### ई-लिलाव सूचना

**सर्व नागरिकांना व आठवडी बाजार फी वसुली ठेकेदार यांना सुचित करण्यात येते की, नगर पंचायत सेलू क्षेत्रात भरविण्यात येणाऱ्या आठवडी बाजार व दैनिक गुजरी येथील फी वसूली करणे कामी ई-लिलाव प्रकिया आयोजित करण्यात आलेली आहे. सदर कामाचा कालावधी १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ असून लिलावात सहभागी होण्यास २०००/- रु. बोली फी (ना-परतावा) बोली अनामत १०,०००/- (परत मिळणारी) भरुन लिलावात सहभाग घेता येईल. यासंबंधी सविस्तर माहिती तसेच ई-लिलाव अटी व शर्ती शासनाचे https://mahatenders.gov.in पोर्टलवर उपलब्ध करण्यात आले आहेत.**

| | |
|---|---|
| ऑनलाईन ई-लिलाव प्रसिध्दी | दि.१३.०३.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता |
| ई-लिलाव करीता ऑनलाईन कागदपत्रे सादर करणे | दि.१३.०३.२०२६ ते १९.०३.२०२६ सायं.६ पर्यत |
| कागदपत्र तपासणी व मंजूरी | दि.२०.०३.२०२६ रोजी |
| प्रत्यक्ष ऑनलाईन ई-लिलाव | दि.२३.०३.२०२६ रोजी दुपारी १२ वाजेपासून |
| ऑनलाईन ई-लिलाव समाप्ती | दि.२३.०३.२०२६ रोजी दुपारी ०५ वाजेपर्यत |

**अधिक माहितीसाठी नगर पंचायत सेलू कार्यालयाशी संपर्क साधावा.**

स्वा/-
(कु.स्नेहल अनिल देवतारे)
मा.अध्यक्षा,
नगर पंचायत सेलू

शिक्का

स्वा/-
(अनुप अग्रवाल)
मुख्याधिकारी,
नगर पंचायत सेलू

## स्त्रीशक्तीचा सन्मान... कर्तृत्ववान कन्यांचा गौरव

**वर्धा जनमाध्यम :** स्त्रीच्या कर्तृत्वाला सलाम करत वर्धा पोलीस दलातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मंगळवार, ११ मार्च रोजी पोलीस मुख्यालयातील आशीर्वाद लॉन येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान कन्या आणि महिला पोलीस अंमलदारांचा सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पोलीस अधीक्षक यांच्या पत्नी डॉ. नंदिनी अग्रवाल तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. वंदना कारखेले उपस्थित होत्या. यावेळी बोलताना डॉ. नंदिनी अग्रवाल यांनी महिलांच्या आरोग्य आणि सामाजिक सक्षमतेवर भर देत स्त्री ही कुटुंबाचा कणा असल्याचे सांगितले. स्त्रीने स्वतःच्या आरोग्याची आणि प्रगतीची काळजी घेतली तर समाज अधिक सक्षम व सुदृढ बनेल, असे त्यांनी नमूद केले. डॉ. वंदना कारखेले यांनी महिलांना कायदे व सुरक्षा विषयक मार्गदर्शन करताना संकटाच्या प्रसंगी खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले. महिलांच्या सुरक्षेसाठी पोलीस दल सदैव तत्पर असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कु. आर्या पंकज टाकोने (मैदानी स्पर्धा उत्कृष्ट धावक), कु. ईश्वरी काळमेघ (मैदानी स्पर्धा व स्विमिंग राज्यस्तरीय पदक विजेती), कु. राही कोरडे (वॉटर पोलो राज्यस्तरीय पदक), कु. आर्या कांबळे (नृत्य) आणि कु. तन्वी आमले (सौंदर्य स्पर्धा) यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच महिला पोलीस अंमलदार आशा जनकवार यांनी विविध प्लॅटफॉर्मवर आयोजित सौंदर्य स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवल्याबद्दल त्यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला पोलीस दलातील वरिष्ठ महिला अधिकारी व महिला अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करणारा हा सोहळा उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.


### NAME IN CHANGE

**My Old Name as per Passport is Makbulbhai AnwaRhai Chini and My New Name as per Aadhar and PAN is Makbool Haji Anwar Chini, Address: Wardha-442001**

### NAME IN CHANGE

**My Old Name as per Passport is Hasinaben Makbulbhai Chini and My New Name as per Aadhar and PAN is Hasina Makbool Chini, Address: Wardha-442001**


### जाहीरनामा

ज्याअर्थी, विधि व न्याय विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची दिनांक ११/०८/२०२३ ची अधिसूचना अन्वये जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, ज्या जन्म व मृत्यूच्या नोंदणीबाबत १ वर्षापेक्षा अधिक कालावधीने सूचना प्राप्त होते, अशा प्रकरणात नोंदी घेण्यासाठी कार्यकारी दंडाधिकारी, ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे, अशा कार्यक्षेत्रासाठी ज्या ठिकाणी अशा व्यक्तीचा जन्म व मृत्यू झाला आहे, त्याबाबतच्या अचूकतेबाबत खात्री करुन विलंब शुल्क आकारुन अशा नोंदी घेण्याबाबत आदेशित करण्याची सुधारीत तरतूद करण्यात आली आहे. जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम १३ (३) नुसार जन्म-मृत्यू घटना नोंदणी संदर्भातील निबंधक, जन्म व मृत्यू यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक २५२५/ई.ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दिनांक १२ मार्च, २०२५ मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ व सुधारणा अधिनियम, २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यु नोंदीबाबतची कार्यपध्दती निश्चित केली आहे. : जमृनों

ज्याअर्थी, पंचफुला नारायण फरतोडे, रा. शिवाजी वार्ड, आर्वी ता.आर्वी जि. वर्धा यांच्या मृत्युची नोंद नगर परीषद कार्यालय, आर्वी येथे उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र , रहीवासाचे पुरावे, मालमत्तेचे पुरावे, ओळखीबाबतचे पुरावे व कौटुंबिक पुराव्यासह मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक, नगर परिषद कार्यालय, आर्वी ता. आर्वी जि. वर्धा यांनी या कार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे.

त्याअर्थी, पंचफुला नारायण फरतोडे, रा. शिवाजी वार्ड, आर्वी ता.आर्वी जि. वर्धा यांच्या विलंबाने मृत्युच्या नोंदीबाबत कोणाचे काही आक्षेप / हरकती असल्यास त्या सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत (विहीत मुदतीत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळी लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. विहीत मुदतीनंतर आक्षेप / हरकतींचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**हरीश काळे**
**तहसिलदार, आर्वी**

### जाहीर सूचना

सदरहू सर्वांना कळविण्यात येते की, श्री. जुलेखान शमीमखान पठाण हे मौजा इंझापूर, तहसील व जिल्हा वर्धा, मौजा क्रमांक ३५, पी.एच. क्रमांक २१, येथील फिल्ड सर्व्हे नं. १३३ मधील प्लॉट नं. ६४ क्षेत्रफळ ९२.००चौ.मी. (९८९. ९२ चौ.फुट) असलेल्या मालमत्तेचे मालक आहेत.

**सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत, –**

पूर्व : प्लॉट नं. ६३,
पश्चिम : प्लॉट नं. ६५,
उत्तर : प्लॉट नं. ७१,
दक्षिण : लेआउट रोड

पुढे असे की, श्री. प्रवीण मारोतराव मांडाडे व श्री. मारोती रामरावजी मांडाडे यांनी वरील नमूद प्लॉट नं. ६४ हा दिनांक २८/०८/२०२४ रोजी दस्त नोंदणी क्र. ३५६५/२०२४ अन्वये श्री. जुलेखान शमीमखान पठाण यांच्या नावे विक्रीखत करून दिले आहे.

पुढे असे की, माझ्या अशिलाकडून दुवा विक्रीखत (Link Sale Deed) दिनांक २९/०६/२०१८ दस्त नोंदणी क्र. २२५५/२०१८ याचे मूळ कागदपत्र हरवले आहे. तसेच माझ्या अशिलाने Piramal Finance Limited येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

म्हणून ही जाहीर सूचना सर्वसामान्य जनतेस देण्यात येत आहे की, वरील नमूद व्यवहाराबाबत कोणास काही हरकत / आक्षेप असल्यास किंवा सदर हरवलेले मूळ Link Sale Deed कोणास आढळल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खाली नमूद पत्त्यावर संपर्क साधावा.

**अ‍ॅड.आर.आर.तिवारी,**
**रामनगर, वर्धा.मो ९९२२४२६१६८**

## परिशिष्ट-१
## महाराष्ट्र शासन
## कृषी विभाग
## कार्यालय - उपविभागीय कृषी अधिकारी, जोगे बिल्डींग, बॅचलर रोड, कृष्ण नगर, वर्धा-४४२००१
## ई-मेल Address : sdaowardha1@gmail.com

**उपविभागीय कृषि अधिकारी, वर्धा महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाकडून गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम सन २०२५-२६ अंतर्गत खालील कामाच्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत.**

| अ क्र | तालुका | गावाचे नांव | निविदा सुचना क्र. | कामाचा प्रकार | गटाचे नांव | एकुण कामे संख्या | एकुण कामाची रक्कम | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | वर्धा | पालोती | सु.क्र.३ | सिनाबा | २/१ | १ | १४९१३८०/- | वर्धा जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार |
| २. | सेलू | कान्हापूर | सु.क्र.४ | सिनाबा | ७/५ | १ | १६९०३१०/- | वर्धा जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार |
| | | | | | | | ३१८१६९०/- | |

**वरील दिलेल्या कामाचे नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उपविभागीय कृषि अधिकारी, वर्धा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.**

**निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक १३.०३.२०२६ ते दिनांक २३.०३.२०२६**
**ई-निविदा उघडणे - दिनांक २४.०३.२०२६**
**ठिकाण - उपविभागीय कृषि अधिकारी, वर्धा**
**वेळ - दुपारी २.०० वाजता**

**खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.**
**१)**
**(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)**
**२) उपविभागीय कृषि अधिकारी, वर्धा कार्यालयातील सूचना फलक.**

स्वा/-
(वैष्णवी एम.शिंदे)
उपविभागीय कृषि अधिकारी,
वर्धा

(जिमाका-वर्धा/२३५/२०२५-२०२६)

# राज्यात ३० लाख घरकुलांना मंजुरी!

## घरकुलांसाठी 2.10 लाखांचे अनुदान; मंत्री गोरे यांची घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी :** पंतप्रधान आवास योजनेंतर्गत राज्यात गतवर्षात ३० लाख घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी चार लाख घरे पूर्ण झाली आहेत, तर दहा लाख घरकुलांचे बांधकाम सुरू आहे. गत चौदा वर्षांत राज्यात एकूण २६ लाख घरकुले बांधली आहेत, अशी माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.सतिश चव्हाण, शिवाजीराव गर्जे, प्रवीण दरेकर, भाई जगताप आदींनी या बाबत प्रश्न विचारला होता.



राज्यात गत काही महिन्यांत सुमारे ३० लाख घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. त्यापैकी चार लाख घरांचे काम पूर्ण झाले आहे, तर दहा लाख घरकुलांना तिसरा हप्ता देण्यात आला असून, त्यांचे काम गतीने सुरू आहे. घरकुलांना एकत्रित २ लाख १० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. केंद्र सरकार १.२० लाख, २८ हजार मनरेगा योजनेतून, १२ हजार स्वच्छ भारत मिशन योजनेतून दिले जाते. राज्य सरकार ५० हजार अनुदान देते. त्यात ३५ घरकुलासाठी आणि १५ हजार सौरउर्जेसाठी दिले जातात, असे एकूण २.१० लाख रुपयांचे अनुदान मिळते.

**बेघरांना जमिनीसह घरकुल-**राज्यातील ज्या बेघरांकडे जमीन नाही, अशांना घरकुल देण्यात येते. गायरान, गावठाणातील जागा दिली जाते. जागा उपलब्ध नसेल तर जागा खरेदीसाठी एक लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. काही लाभार्थींनी एकत्र येउन जमीन खरेदी केली तर बहुमजली इमारत बांधता येईल, तशी परवानगी दिली जाते. घरकुलांना पाच ब्रास वाळू मोफत दिली जाते. केंद्र सरकारने अनुदानात वाढ करावी, अशी मागणीही राज्य सरकारने केंद्र सरकारकडे केली आहे. सरकारने घरकुलांचे १६ हजार ४२६ अतिक्रमणे नियमित केली आहेत. १.१३ लाख लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यात आले आहे. पण, काही जणांनी गायरान, सरकारी जमिनीत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केले आहे. घरकुलांसाठीची जागा वगळता अन्य अतिक्रमणे नियमित करणे शक्य होणार नाही, असेही गोरे म्हणाले.

## गाव तिथे स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या सूचना

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील ज्या गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध नाही, त्या गावांमध्ये विशेष मोहीम राबवून स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या सूचना जिल्हाधिका-यांना दिल्या आहेत, असे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानपरिषदेत सांगितले.

सदस्य रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी सोलापूर जिल्ह्यातील स्मशानभूमी संदर्भातील प्रश्न लक्षवेधीद्वारे उपस्थित केला होता. त्यास उत्तर देताना ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे बोलत होते. या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य अमित गोरखे, किशोर दराडे आणि योगेश टिळेकर यांनी सहभाग घेतला.ग्रामविकास मंत्री गोरे म्हणाले की, ज्या गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जमीन उपलब्ध नाही, त्या गावांची स्वतंत्र यादी तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांच्या माध्यमातून शासकीय किंवा ग्रामपंचायतीची जमीन उपलब्ध असल्याचा आढावा घेतला जात आहे. ज्या गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जमीन उपलब्ध नाही, त्या ठिकाणी जमीन उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिका-यांकडे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, गावांमध्ये विकासकामांना मंजुरी देताना संबंधित गावात स्मशानभूमीची सोय आहे, याचा दाखला देणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. ज्या गावांमध्ये स्मशानभूमी नाही, त्या ठिकाणी प्रथम स्मशानभूमीची व्यवस्था करण्यात येईल आणि त्यानंतरच इतर विकासकामांना मंजुरी दिली जाईल असेही त्यांनी या लक्षवेधीच्या उत्तरात सांगितले. स्मशानभूमी संदर्भातील विविध अडचणी, सामाजिक प्रश्न, रस्ते व इतर मूलभूत सुविधांचा अभ्यास करण्यासाठी राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे, असे ग्रामविकास मंत्री गोरे यांनी सांगितले.अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या स्मशानभूमींचे सर्वेक्षण करण्यात आले असून त्यासंबंधीचे प्रस्ताव शासनाकडे आले आहेत. त्या प्रस्तावांना मान्यता देउन संबंधित स्मशानभूमींची दुरुस्ती करण्यात येईल. तसेच नदीकाठ किंवा वन विभागाच्या जमिनीवरील स्मशानभूमींच्या संदर्भातील अडचणी सोडवण्यासाठी संबंधित विभागांशी समन्वय साधून येउन मार्ग काढला जाईल, असेही ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

## प्रधानमंत्री आवासची प्रभावी अंमलबजाणी; 4 लाख घरांची बांधकामे पूर्ण

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून घरकुल योजनेचे काम वेगाने सुरु आहे. राज्यात मागील सात ते आठ महिन्यात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत चार लाख घरांचे बांधकाम पूर्ण झाले असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानपरिषदेत दिली. सदस्य शिवाजीराव गर्जे यांनी याविषयी प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य प्रवीण दरेकर, भाई जगताप, चंद्रकांत रघुवंशी यांनी सहभाग घेतला. ग्रामविकास मंत्री गोरे म्हणाले की, राज्यातील पात्र कुटुंबांना केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घर उपलब्ध करून देण्यास राज्य शासन कटिबद्ध आहे. बेघरांना घर मिळावे यासाठी शासनाने विविध पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. शासकीय जमीन, गायरान किंवा गावठाणातील जमीन उपलब्ध असल्यास ती देण्याची तरतूद आहे. जमीन उपलब्ध नसल्यास जागा खरेदीसाठी एक लाख रुपयांचे अनुदान देण्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे. ग्रामविकास मंत्री गोरे म्हणाले, या घरकुलासाठी केंद्राकडून मिळणा-या अनुदानात राज्य शासनाने अतिरिक्त ५० हजार रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे राज्यात एका घरकुलासाठी २ लाख १० हजार रुपयांचे अनुदान उपलब्ध होत आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलांना अनुदान वाढवून मिळण्याबाबत केंद्र शासनाकडे मागणी करण्यात आली असल्याचेही ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी सांगितले.

## पेसा क्षेत्रातील पदभरती तातडीने पूर्ण करू-मंत्री शेलार

**मुंबई/प्रतिनिधी :** पेसा क्षेत्रातील पदभरती गुणवत्तेच्या आधारे केली जाणार असून उमेदवारांच्या सेवा जेष्ठतेवर कोणताही अन्याय होणार नाही. संबंधित उमेदवारांना कायमस्वरूपी नियुक्ती देण्याची प्रक्रिया सुरू असून ती शक्य तितक्या लवकर पूर्ण केली जाईल, असे सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत सांगितले.पेसा क्षेत्रातील १३ जिल्ह्यांमध्ये १७ संवर्गांच्या पदभरतीबाबत सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश असूनही भरती प्रलंबित असल्याचा मुद्दा सदस्य राजू तोडसाम यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे उपस्थित केला. या चर्चेत सदस्य सुधीर मुनगंटीवार, नितीन राउत व किरण लहामटे यांनी सहभाग घेतला.मंत्री आशिष शेलार यांनी सांगितले की, ११ फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णयामध्ये बिंदुनामावलीबाबत स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे दिली असून त्यात दुरुस्तीची आवश्यकता नसल्याचे प्रशासनाचे मत आहे. तरीही सदस्यांनी



मांडलेल्या बाबींची दखल घेउन संबंधित जिल्हाधिका-यांसोबत बैठक घेउन आवश्यक स्पष्टता करण्यात येईल.

पेसा क्षेत्रातील १७ पैकी ११ संवर्गांमध्ये पदभरतीची प्रक्रिया सुरू असून काही ठिकाणी नियुक्त्याही पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित काही संवर्गांमध्ये जाहिरात निघाली नसल्याने भरती प्रलंबित आहे. आदिवासी विकास निरीक्षक, कोतवाल, वन अन्वेषक, स्वयंपाकी, प्रयोगशाळा परिचर आदी पदांसाठी नव्या शासन निर्णयानुसार जाहिराती काढून पदभरतीची प्रक्रिया सुरू करण्यात येईल, असेही मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले. तसेच या भरती प्रक्रियेचा दर तीन महिन्यांनी आढावा घेण्यात येईल, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी रोखण्याचा प्रयत्न कोणत्याही स्तरावर होउ दिला जाणार नाही. आदिवासी बांधवांच्या हक्काच्या पदभरतीत अडथळा आणणा-या अधिका-यांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री अड. शेलार यांनी सांगितले.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात बाहेरून औषधे लिहून दिल्यास कडक कारवाई

**मुंबई/प्रतिनिधी :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असून रुग्णांना बाहेरून औषधे लिहून दिल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, असे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.सदस्य अमोल मिटकरी यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला येथील रुग्णांकरता औषधे उपलब्ध करून देणे या विषयी प्रश्न उपस्थित केला होता.वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, शासकीय रुग्णालयांमध्ये उपचारासाठी मोठ्या प्रमाणावर रुग्ण येतात. या रुग्णांना आवश्यक औषधे उपलब्ध व्हावीत यासाठी रुग्णालयात पुरेसा औषध साठा उपलब्ध करून ठेवला जात आहे. शासकीय महाविद्यालयांमध्ये औषध खरेदीची ठराविक प्रक्रिया आहे. औषध खरेदीसाठी मिळणा-या निधीपैकी सुमारे ७० टक्के खरेदी वस्तू प्राधिकरणामार्फत केली जाते, तर उर्वरित ३० टक्के रक्कम संबंधित संस्थांकडून खर्च केली जाते. याशिवाय जिल्हा नियोजन समिती मधून प्राप्त होणा-या निधीतूनही आवश्यक औषधांची खरेदी करण्यात येते. मंत्री मुश्रीफ म्हणाले, अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय संदर्भात सदस्यांनी उपस्थित केलेल्या बाबींची दखल घेतली जाईल. या संदर्भात वरिष्ठ अधिका-यांकडून तपासणी करून अहवाल घेतला जाईल. या रुग्णालयात सुमारे एमआरआय, सीटी स्कॅन तपासण्या केल्या जात असल्याचेही वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले. तसेच शासकीय रुग्णालयात पीपीपी तत्वावर नवीन यंत्रणा उभारण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

## शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी कडक नियमावली जारी

### शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील सर्व शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाय योजना राबविण्यास शालेय शिक्षण विभागाने प्राधान्य दिले आहे. यासाठी विभागाने कडक नियमावली जारी केली आहे. या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत असून नियमांचे उल्लंघन करणा-यावर करणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानपरिषदेत सांगितले.

सदस्य प्रसाद लाड यांनी याविषयी विधान परिषदेत लक्षवेधी सूचना मांडली. सदस्य डॉ. मनीषा कायंदे, सदस्य राजहंस सिंह, जगन्नाथ अभ्यंकर, चित्रा वाघ, अमित गोरखे आणि उमा खापरे यांनी चर्चेत सहभाग घेतला. शालेय शिक्षण मंत्री भुसे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, तक्रार पेटी ठेवणे, सखी-सावित्री समिती व विद्यार्थी सुरक्षा समिती स्थापन करणे, तसेच सर्व कर्मचा-यांची पोलिसांमार्फत चारित्र्य पडताळणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. लैंगिक अत्याचाराच्या घटनांबाबत प?क्सो कायद्यांतर्गत कारवाई केली जात असून अशा घटनांची माहिती २४ तासांच्या आत शिक्षण अधिकारी व पोलिसांना देणे अनिवार्य आहे. अशा घटना दडपण्याचा प्रयत्न झाल्यास संबंधितांवरही कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले. शाळांमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, विद्यार्थिनींच्या वाहतुकीसाठी शाळा बसमध्ये महिला अटेंडंट, तसेच विद्यार्थ्यांना गुड टच-बॅड टच, सायबर गुन्हे आणि स्वसंरक्षणाबाबत मार्गदर्शन करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सहावीच्या पुढील वर्ग असलेल्या मुलींच्या शाळांमध्ये पिंक रूम ची संकल्पनाही राबविण्याचे नियोजन आहे. प्री-प्रायमरी शिक्षणासाठी नवीन अधिनियम अंतिम टप्प्यात असून त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला विशेष प्राधान्य दिले जाईल, असेही मंत्री भुसे यांनी सांगितले.

## विधानभवनासह मुंबईतील चार ठिकाणांना मिसाईल-बॉम्बची धमकी

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबईतील विधानभवन परिसराला बॉम्बने उद्धवून देण्याची धमकी मिळाल्याने एकच खळबळ उडाली आहे. सध्या राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असतानाच हा प्रकार घडल्याने सुरक्षा यंत्रणांची चांगलीच तारांबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने पावले उचलत विधानभवनातील कर्मचारी आणि नागरिकांना सुरक्षितरित्या इमारतीबाहेर काढले. तसेच सुरक्षेचा उपाय म्हणून सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना आत येण्यास मनाई करण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, एकीकडे इराण, इस्त्रायल आणि अमेरिकेचा संघर्ष सुरु आहे. तर दुसरीकडे मुंबईतील विधानभवनात अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. हे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु असताना मुंबईतील विधानभवनाला बॉम्बने उद्धवून देउ, अशी धमकी ई-मेलद्वारे देण्यात आली आहे. मुंबईत विधानभवनासह मेट्रो, बॉम्बे स्टॉक एक्सचेंज यांना धमकी देणारा मेल आल्याचे बोललं जात आहे. हा मेल खलिस्तानी आंदोलकांशी संबंधित असल्याची माहिती समोर येत आहे. ही धमकी देणा-याने मिसाईल आणि बॉम्बने संबंधित ठिकाण उद्धवून देण्याचे मेलमध्ये नमूद करण्यात आले आहे. सकाळी ६ वाजून ५७ मिनिटांनी मेल आल्यानंतर तात्काळ सुरक्षेच्या गृह विभागाकडून सूचना देण्यात आल्या आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशन हे महत्त्वपूर्ण मानले जाते. कारण राज्याचा संपूर्ण अर्थसंकल्प या अधिवेशनात मांडला जातो. यावर चर्चाही होते. आता काही वेळात चर्चेला सुरुवात होणार होती. त्यापूर्वीच ई-मेलद्वारे विधानभवन उद्धवून देउ अशी धमकी भल्या पहाटे आल्याने एकच खळबळ उडाली आहे. यानंतर सुरक्षा यंत्रणा सक्रीय झाली आहे. तसेच पोलीसही सक्रीय झाले आहेत. या संपूर्ण परिसरातून नागरिक, इथे काम करणारे कर्मचारी त्यांना बाहेर काढले जात आहे. तसेच प्रत्येक केबिनची चेकींग केली जात आहे. कुठे काही संशयास्पद गोष्टी आढळतात का, याची झाडाझडती घेतली जात आहे. तसेच जे लोक बाहेरु न येतात, त्यांचेही पास बंद केले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विधानसभा अध्यक्ष यावर काय भूमिका घेतात हे पाहणं महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवा, असे आदेश



विधानसभा अध्यक्षांनी दिले आहेत.

त्यासोबत बॉम्ब शोधक पथकालाही पाचारण करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. तसेच डाग स्काड पथकालाही बोलवण्यात आले आहे. या संपूर्ण परिसराची सध्या तपासणी केली जात आहे. या ठिकाणी काही संशयास्पद वस्तू आढळतात का, याचीही पाहणी केली जाणार आहे. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात चिंतेचे वातावरण पाहायला मिळत आहे. दक्षता घेउन सध्या सुरक्षा वाढवण्यात आली आहे. आमदार राम शिंदे यांनी विधानभवनात आलेल्या धमकीच्या मेलबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. आज सकाळी ६:५७ मिनिटांनी सीपीएच्या (अधिकृत ईमेलवर ही धमकी प्राप्त झाली होती. सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून बाम्ब शोधक आणि नाशक पथक तसेच श्वान पथकाद्वारे संपूर्ण परिसराची कसून तपासणी करण्यात आली. या ईमेलमध्ये विधानभवनासह बाम्बे स्टाक एक्सचेंज, हायकोर्ट, मेट्रो आणि काही बँकांना उद्धवून देण्याचा उल्लेख होता. सुरक्षा अधिकारी आणि तपास यंत्रणांच्या सविस्तर चर्चेनंतरच विधानभवनात प्रवेश देण्यात आला आहे. विधानसभा ९:४५ वाजता तर विधान परिषद १० वाजता सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### नागरिकांनी घाबरण्याचे कारण नाही

पंकज भोयर

आमदार पंकज भोयर यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा ईमेल सकाळी ६.५७ ला प्राप्त झाला होता आणि पोलीस प्रशासनाने याची तातडीने दखल घेतली आहे. प्राथमिक तपासात हा ईमेल खोटी असल्याची शक्यता वर्तवण्यात येत असून नागरिकांनी घाबरण्याचे कारण नसल्याचे आवाहन करण्यात आले आहे. काही विकृत प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून अशा प्रकारचे कृत्य केले जाण्याची शक्यता असून हा ईमेल नेमक्या कोणाच्या आयडीवरून आला, याचा शोध सायबर सेल आणि पोलीस घेत आहेत. सध्या सर्व संबंधित ठिकाणी सुरक्षा तपासणी पूर्ण झाली असून घाबरण्यासारखी कोणतीही स्थिती नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## गुजरातच्या धर्तीवर राज्यात आधुनिक बसपोर्ट

**मुंबई/प्रतिनिधी :**गुजरातच्या धर्तीवर राज्यात आधुनिक बसपोर्ट उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून एसटी महामंडळाच्या डेपो आणि बसस्थानकांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी नवीन धोरण आखण्यात आले आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत दिली. नियम ९२ अन्वये विधान परिषद सदस्य प्रवीण दरेकर यांनी याविषयी विधान परिषदेत अर्धा तास चर्चा उपस्थित केली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात आधुनिक आणि प्रवासी सुविधांनी सुसज्ज एसटी बसस्थानके उभारण्यात येणार आहेत. राज्यातील एसटी बस स्थानक व डेपोंच्या व्यावसायिक तत्वावरील विकास प्रकल्पांसाठी प्रत्यक्ष भाडेकरार ४९अ४९ वर्षे म्हणजे ९८ वर्षे असा ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांना प्रकल्प राबविण्यास प्रोत्साहन मिळेल आणि एस.टी. महामंडळालाही दीर्घकालीन आर्थिक उत्पन्न मिळेल. प्रवाशांनाही स्वच्छ, सुरक्षित व आधुनिक सुविधा उपलब्ध होतील. तसेच या प्रकल्पांमधून स्थानिक युवकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार व व्यवसायाच्या संधी निर्माण होतील. या प्रकल्पांतर्गत केवळ शहरी भागांवर भर न देता संतुलित विकासावरही लक्ष देण्यात येणार आहे. त्यासाठी शहरी भागातील एक डेपो, तालुकास्तरावरील एक डेपो आणि ग्रामीण भागातील एक डेपो अशा तीन डेपोचे पॅकेज तयार करून निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील बसस्थानकांचाही विकास होणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

## मेळघाटात 102 रुग्णवाहिका सेवा अधिक प्रभावी करणार- आरोग्य मंत्री आबिटकर


**मुंबई/प्रतिनिधी :** मेळघाट परिसरातील आरोग्य सेवा अधिक बळकट करण्यासाठी तसेच नागरिकांना तातडीची वैद्यकीय मदत वेळेत मिळावी यासाठी १०२ रुग्णवाहिका सेवा अधिक प्रभावीपणे राबविण्यावर शासन भर देत असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य संजय खोडके यांनी प्रश्न उपस्थित केला. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, मेळघाटसारख्या दुर्गम भागात गर्भवती महिला, माता व बालकांना वेळेत आरोग्य सेवा मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी जननी शिशु सुरक्षा योजनेअंतर्गत १०२ रुग्णवाहिका सेवा कार्यरत असून या सेवेच्या माध्यमातून




गर्भवती महिलांना तपासणी, प्रसुती तसेच प्रसूतीनंतर घरी सोडण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. जननी शिशु सुरक्षा योजनेअंतर्गत मेळघाटमध्ये १०२ क्रमांकाच्या एकूण ६६ रुग्णवाहिका कार्यरत आहेत. त्यापैकी चिखलदरा तालुक्यात ३१ रुग्णवाहिका कार्यरत असून यात ७ रुग्णवाहिका ग्रामीण रुग्णालयात तर २४ रुग्णवाहिका प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांमध्ये कार्यरत आहेत. १०२ रुग्णवाहिका सेवा केवळ जननी सुरक्षा योजनेपुरती मर्यादित न ठेवता आपत्कालीन रुग्णांच्या वाहतुकीसाठीही वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे मंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले. या सेवेच्या कार्यक्षमतेत वाढ करून ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना अधिक जलद व प्रभावी वैद्यकीय मदत मिळावी यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## नागपूर जिल्ह्यातील धान्य पोती गहाळ प्रकरणी चौकशीत तफावत आढळली नाही

**मुंबई/प्रतिनिधी :**नागपूर जिल्ह्यातील धान्य पोती गहाळ प्रकरणाच्या चौकशीत धान्य वितरणात



कोणतीही तफावत आढळली नसल्याचे व चौकशी समितीने अहवालात अशा प्रकारची घटना घडली नसल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी विधानसभेत दिली. नागपूर जिल्ह्यातील शासकीय धान्य गोदामातून धान्याची पोती गहाळ झाल्याबाबत सदस्य विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ सांगितले की, नागपूर व अमरावती विभागातील वितरणाबाबत तपासणी करण्यात आली असता सार्वजनिक वितरण प्रणाली (पीडीएस) अंतर्गत सुमारे ९२.२७ टक्के धान्याचे वितरण झाले असल्याचे आढळले. तसेच ग्रामीण भागातही चौकशी केल्यानंतर सुमारे ९५.०५ टक्के धान्याचे वितरण झाल्याचे निदर्शनास आले आहे.नागपूर जिल्ह्यातील धान्य पोती गहाळ प्रकरणाबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिका-यांनी उपविभागीय अधिका-यांमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्यासाठी विशेष समितीही गठीत करण्यात आली. समितीने संबंधित बैठका घेउन सर्व बाबींची माहिती तपासली. चौकशीअंती धान्य वितरणामध्ये कोणतीही तफावत आढळली नाही. समितीने अहवालात अशा प्रकारचे कोणतेही घटना घडल्याचे दिसून येत नसल्याचे नमूद केले आहे.

## आपले सरकार सेवा केंद्रातील ब्लाक व्यवस्थापकांचे प्रश्न सोडविण्यास शासन सकारात्मक

**मुंबई/प्रतिनिधी** राज्यात आपले सरकार सेवा केंद्रच्या माध्यमातून तालुका व जिल्हा व्यवस्थापक विविध शासकीय अभियानांदरम्यान महत्वाची भूमिका बजावत आहेत. तसेच संगणक तज्ञ ब्लाक व्यवस्थापकांच्या माध्यमातूनही अनेक कामे प्रभावीपणे पार पडत आहेत. आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पांतर्गत कार्यरत तालुका, जिल्हा व ब्लाक व्यवस्थापकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत शासन सकारात्मक असून ते सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी माहिती ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली. मंत्रालयात आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पांतर्गत कार्यरत तालुका, जिल्हा व ब्ल?क व्यवस्थापक संघटनेसमवेत आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी ग्रामविकास विभागाचे कक्ष अधिकारी स्नेहल अडसूळ, सहायक कक्ष अधिकारी स्नेहा खोत तसेच आपले सरकार सेवा केंद्र ब्लाक व्यवस्थापक कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पाशी संबंधित कंत्राटी कंपनीने संबंधित कर्मचा-यांना नियुक्ती आदेश देणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यांच्या सेवेत सातत्य राहील आणि वेतनासंदर्भातील अडचणी निर्माण होणार नाहीत. तसेच संघटनेने मांडलेले विविध प्रश्न सकारात्मकतेने सोडविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याशी चर्चा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



## राज्यपालांनी घेतले सिद्धिविनायकाचे दर्शन

**मुंबई-**राज्याचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी पत्नी सुधा यांचेसह गुरुवारी (दि. १२) सिद्धिविनायक मंदिर येथे जाउन सिद्धिविनायकाचे दर्शन घेतले. तत्पूर्वी राज्यपालांनी श्री महालक्ष्मी मंदिर येथे जाउन महालक्ष्मीचे दर्शन घेतले व आरती केली.

## यशवंतराव चव्हाण जयंतीदिनी विधानभवनात अभिवादन

**मुंबई/प्रतिनिधी :**आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री व भारताचे माजी उप पंतप्रधान दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी विधान भवन, मुंबई येथे त्यांच्या प्रतिमेस महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उप सभापती डा. नीलम गोन्हे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व दोन्ही सभागृहातील सदस्य तसेच विधानमंडळ सचिवालयाचे सचिव



-१ जितेंद्र भोळे, सचिव ३ डा. विलास आठवले, सचिव ४ शिवदर्शन साठ्ये आणि विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी व कर्मचा-यांनीही दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस गुलाबपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## दाहकतेचे चटके

**तिर्हाईतांमध्ये दूरवर चाललेल्या युद्धाच्या कथा गप्पांमध्ये चघळायला फार रम्य असतात. पण, तेच युद्ध जेव्हा आपल्या उंबऱ्याशी येते, तेव्हा त्याच्या दाहकतेचे चटके अस्वस्थ करणारे असतात. इस्रायल, इराण आणि अमेरिकेतले युद्ध तसे अजून आपल्या दाराशी आलेले नाही. पण, त्याच्या परिणामांचे उष्ण वारे आपल्या घराघरात खेळणार, या भीतीनेच भारतीयांची पाचावर धारण बसली आहे. इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीमार्गे होणारी सगळीच वाहतूक रोखल्याने जगात इंधन टंचाईची प्रचंड भीती निर्माण झाली आहे. जे देश कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू या दोन्हींसाठी मुख्यतः आयातीवर अवलंबून आहेत, त्या देशांची विशेष घाबरगुंडी उडाली आहे. कारण, आधुनिक जगात प्रायः डिझेल-पेट्रोलवर अवलंबून असलेली वाहतूक ठप्प झाली आणि अन्य शिजवण्याकरिता वापरला जाणारा गॅस मिळेनासा झाला, तर 'जगायचे कसे?' हा प्रश्न घराघरांत निर्माण होतो. खत, प्लास्टिक उद्योग, जिथे धातू परस्परांना जोडण्याची गरज असते, अशी वेल्डिंगची कामे गॅस टंचाईने ठप्प होण्याची शक्यता आहे, ती वेगळीच. वाढत्या शहरीकरणाने, कामाच्या लांबच्या ठिकाणांमुळे, दळणवळणाची साधने सहज उपलब्ध असल्याने वाढलेल्या प्रवासाने किंवा अंगीकारलेल्या नव्या जीवनशैलीमुळे कुटुंब हल्ली घरी शिजवलेले अन्न जेवढे खातात, तेवढेच किंवा त्यापेक्षा अधिक बाहेर खातात तरी किंवा बाहेरून तयार मागवतात तरी. गॅस टंचाईच्या संभाव्य संकटाला तोंड देण्यासाठी सरकारने सर्वप्रथम व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या पुरवठ्याचे नियमन केल्याने खाद्य उद्योगातले विविध स्तरावरील घटक अक्षरशः हादरले आहेत. व्यावसायिक जेवढे हादरले आहेत, त्यापेक्षा अधिक त्यांचे ग्राहक! कोणी कितीही 'चुलीवरचे चव देतो अन् त्यंव देतो' असे बोर्ड लावले असले, तरी बहुतेक सगळी हॉटेल, धाबे, क्लब, खानावळी गॅस सिलिंडरवरच चालतात, हे सत्य आहे. गॅसचा संभाव्य तुटवडा लक्षात घेऊन सरकारने आधीच पुरवठा नियंत्रित केल्याने बहुतेक व्यावसायिक आस्थापनांनी आपल्या मेन्यूमध्ये निर्दयी काटछाट केली आहे. बऱ्याच मोठ्या हॉटेलमालकांनी हॉटेल बंद करण्याचा इरादा जाहीर केला आहे. छोट्या हॉटेलांना तर एव्हाना टाळे लागलेही आहेत! भारतात पसरलेली ही घबराट खरी आहे, की विनाकारण अतिरेक होतो आहे? या प्रश्नाचे उत्तर युद्ध किती काळ चालेल किंवा इराण हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतील वाहतूक किती काळ रोखून ठेवेल, यावर अवलंबून आहे. इंधनाच्या विविध प्रकारांची भारताची आयात एकूण गरजेच्या ८२ टक्के आहे, असे सांगितले जाते. स्वयंपाकासाठी वापरला जाणारा एलपीजी गॅस गरजेच्या ६० टक्के आखातातून आयात केला जातो. अन्य नैसर्गिक वायू गरजेच्या ५० टक्के कतार आणि अन्य पश्चिम आशियायी देशातून आयात केला जातो. प्रदूषणावर उपाय म्हणून गेली १५ २० वर्षे भारतात वाहनांसाठी इंधन म्हणून सीएनजी गॅसचा मोठ्या प्रमाणावर प्रचार सुरू आहे. पेट्रोल-डिझेलपेक्षा या गॅसची किमत किंचित कमी असल्याने तसेच प्रतिकिलो गॅसवर गाड्यांचे धावण्याचे प्रमाण पेट्रोल-डिझेलच्या तुलनेत जास्त असल्याने व्यावसायिक वाहनचालक आणि मध्यमवर्गीय मुख्यतः सीएनजीवरील गाड्या खरेदी करणे आणि वापरणे पसंत करतात. देशात सार्वजनिक प्रवासी वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या बसही सीएनजीवरच जास्त आहेत. विजेवर चालणारी वाहने आणि रिक्षा येण्यापूर्वी बहुतांश रिक्षा, मालवाहू छोटी वाहने सीएनजीवरच असल्याने गॅस टंचाईचा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम साहजिकच महागाई भडकण्यात होऊ शकतो. मुंबई आणि काही शहरांमध्ये घराघरात गॅसवाहिन्या पोहोचल्या आहेत. पाइपने केला जाणारा संपूर्ण गॅस पुरवठा हा मुंबई जवळील गॅस विहिरीतून होतो, असा सार्वत्रिक गैरसमज आहे. त्यामुळे, जे स्वयंपाकाच्या गॅससाठी सिलिंडरवर अवलंबून आहेत, त्यांची अडचण होईल; आमचा या टंचाईशी काही संबंध नसेल, असा 'पाइपधारकां'चा गोड गैरसमज आहे. वास्तवात 'सिलिंडर' जात्यात गेले असतील, तर 'पाइप' सुपात आहेत, एवढाच फरक देशात तेल आणि गॅसचा साठा अजिबातच नाही, अशी परिस्थिती नाही. आपत्कालीन परिस्थितीत आधाराला म्हणून एकूण इंधन मागणीच्या २६ टक्के साठा देशात नेहमीच राखीव ठेवला जातो. तो आहेही. पण जो आहे, तो मुख्यतः तेलाचा आहे. गॅसचा नाही, कारण गॅस साठवण्यासाठी कडकडीत थंडाव्याची गरज असते. एवढा थंडावा सतत ठेवणे खूपच खर्चिक असते. सावधगिरीचा उपाय म्हणून केंद्र सरकारने परवाच जीवनावश्यक वस्तू कायदा लागू केला आहे. गॅस पुरवठ्यात एलपीजीत सर्वाधिक प्राधान्य स्वयंपाकाच्या पाइप गॅसला, त्यानंतर घरगुती सिलिंडर आणि त्यानंतर व्यावसायिक सिलिंडरला देण्यात आले आहे. सीएनजी प्राधान्याने वाहतुकीसाठी आणि त्यानंतर खत कारखान्यांना देण्यात येणार आहे. खत कारखान्यांनी गेल्या सहा महिन्यांत सरासरी जेवढा गॅस वापरला असेल, त्याच्या ७० टक्के गॅस त्यांना मिळेल, असे सरकारने स्पष्ट केले आहे. उद्योगांमध्ये चहा, खाद्यान्न उद्योग, जीवनोपयोगी वस्तू बनवणारे कारखाने, औद्योगिक वापर असा प्राधान्यक्रम सुरुवातीलाच ठरवला गेल्याने संकटाची परिस्थिती निर्माण होणार नाही. सरकार सावध आहे, हा संदेश या सगळ्यांतून मिळाला आहे. त्यामुळे, साठवणुकीला मर्यादा पडतील. डोनाल्ड ट्रम्प यांनी परवाच 'युद्ध लवकर संपेल, आम्हाला जे साध्य करायचे होते, ते झाले आहे' असे वक्तव्य केले. सोमवारी ट्रम्प आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांच्यात तेल पुरवठ्याबाबत तासभर चर्चा झाली. कॅनडानेही कालच भारताला आपल्याकडचे तेल देऊ केले आहे. या सगळ्या खरंतर आशादायक घटना आहेत. खूप घाबरून जाण्याचे काही कारण नाही, हे यावरून दिसते. कोरोना काळासारखे सगळे जगणे ठप्प होईल, असे वाटत नाही. सरकारने ही वस्तुस्थिती जनतेपर्यंत नीट पोहोचायला हवी. अन्यथा, सर्वसामान्यांना विनाकारण टंचाई आणि महागाईला तोंड द्यावे लागेल.**

## उच्च शिक्षणातील बदलते वास्तव

**उच्च शिक्षणाच्या वाढत्या संधी, स्वायत्ततेचे प्रयोग आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यामुळे शिक्षण व्यवस्थेत नवे बदल घडत आहेत; मात्र शिक्षक भरतीतील अडथळे, विद्यार्थ्यांची घटती उपस्थिती आणि प्रशासकीय गुंतागुंत अशा अनेक आव्हानांनाही ही व्यवस्था सामोरी जात आहे.**



भारत हा महासत्ता बनू पाहताना या शिक्षण व्यवस्थेत असलेली बलस्थाने आणि दुर्बलस्थाने पाहावी लागतील. शाश्वत बदलांसाठी सकारात्मक आणि रचनात्मक वाटचाल शिक्षण व्यवस्थेत व्हायला हवी. या व्यवस्थेतील बलस्थानाचे महत्त्व ओळखून दुर्बल स्थानांवर मात करणारी यंत्रणा गरजेची आहे. नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, केंद्र व राज्य शासनाच्या विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणलेल्या योजना आणि त्यामागील उद्देशदेखील सकारात्मक दृष्टीने पाहणे आवश्यक वाटते. महाराष्ट्रात १ केंद्रीय विद्यापीठ, २३ राज्य विद्यापीठे, २१ अभिमत विद्यापीठे आहेत. ऑल इंडिया सर्व्हे ऑफ हायर एज्युकेशन आणि यूजीसीकडील उपलब्ध माहितीनुसार २०१९-२० मध्ये राज्यामध्ये मान्यताप्राप्त सर्व महाविद्यालयांची संख्या ४,४६८ होती. महाविद्यालयांमधून स्वावलंबी, कौशल्याधिष्ठित आणि रोजगाराभिमुख शिक्षणाची व्यवस्था व्हावी, ही सर्वांचीच अपेक्षा!

राज्यातील मोजकी संलग्नित तसेच प्रामुख्याने स्वायत्त महाविद्यालये (सायबर इन्स्टिट्यूट, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड आदी) स्वावलंबी आणि व्यवसाय-रोजगाराभिमुख शिक्षणक्रम प्रभावी अन् यशस्वीरीत्या राबवत आहेत. सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजला इम्पॉवर्ड ऑटोनॉमस म्हणजेच अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालय दर्जा आहे. कारण, विद्यार्थ्यांची मागणी, स्थानिक गरजा, बदलती सामाजिक आणि व्यावसायिक परिस्थिती विचारात घेऊन तत्काळ नवनवे अभ्यासक्रम, परीक्षा, त्यांचे निकाल आणि पदवी हे सर्व महाविद्यालय स्तरावर तत्काळ आणि प्रभावीपणे होऊ लागते. त्यामुळे दिरंगाई टाळून विद्यार्थ्यांना करिक्युलर आणि को-करिक्युलर ॲक्टिव्हिटीज मध्येदेखील मिळणाऱ्या संधी रुंदावतात. मोठ्या वृक्षाखाली लहान वृक्ष विस्तारू शकत नाही, असे म्हटले जाते. त्यानुसार दीडशे-दोनशे संलग्नित महाविद्यालय असलेल्या विद्यापीठापेक्षा स्वायत्त महाविद्यालय आणि स्वायत्त विद्यापीठामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षण आणि तत्सम संधीदेखील वाढतात.

कर्मवीर भाऊराव पाटील सातारा विद्यापीठाचा ओजस देवतळे हा विद्यार्थी तिरंदाजी स्पर्धेमध्ये अर्जुन पुरस्कार मिळवतो. तो राज्य, राष्ट्रीय ते जागतिक स्पर्धांमध्ये सुवर्णपदकापर्यंत झेप घेतो. हा विकेंद्रीकरणाचाच लाभ! दुसरीकडे अशा स्वायत्त आणि समूह विद्यापीठ धोरणानुसार शासनाला अनुदानित व्यवस्था आणि तशी पदे बंद करावयाची आहेत, असा नकारात्मक प्रवाह विनाकारण चर्चेला येतो; परंतु अशा ठिकाणी सर्व अनुदानित जागांना संरक्षण देण्याचे लेखी हमीपत्र राज्य शासन देते. मग, हे धोरण नकारात्मकतेकडे का न्यावे? उलट अशा ठिकाणी दिरंगाई टाळून पारदर्शकता आणि सातत्याने गुणवत्तेचा आग्रह धरला, तर स्वायत्ततेच्या संधीचे रूपांतर सोन्यात होऊ शकते. अर्थात, या यशस्वी संकल्पनेची तंतोतंत तशी अंमलबजावणी सर्रास महाविद्यालयांतून करता येण्याबद्दल मतभिन्नता असेल.

उच्च शिक्षण व्यवस्थेत गुणात्मक आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा दृष्टिकोन समोर ठेवताना या व्यवस्थेतील अंतरंगदेखील पाहायला हवेत. महाविद्यालयांमधून कोणत्याही जागा भरायच्या म्हटल्या, तर पदमान्यता, बिंदू नामावली, विद्यापीठ मान्यता, उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालय, शिक्षण संचालक कार्यालय ते मंत्रालय, मध्येच शासनाचे बदललेले नियम, निकष, नव्याने येणारे आरक्षण नियम, त्याचा बिंदू नामावलीवरील परिणाम असे अग्निदिव्य अनेक ठिकाणी वर्षानुवर्षे दिसते.

इकडे एका विषयासाठी शेकडोच्या संख्येने पात्र असलेले नेट-सेट उत्तीर्ण उमेदवार, जोडीला पीएच.डी. प्राप्त उमेदवार आणि अध्यापन अनुभव रिसर्च पेपर यासह कितीही उत्तम उमेदवार असला, तरी नेमणुकीवेळी वेगळा कथित महागडा हिडन क्रायटेरिया (?) पुढे येतो त्याचे काय? आधीच बहुतांश महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांच्या घटत्या हजेरीचा गंभीर प्रश्न पुढे येत आहे. पायाभूत सुविधा, शिक्षकांचे अध्यापन, विद्यार्थ्यांचे वैयक्तिक प्रश्न जसे की, आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक, तात्पुरती नोकरी, शेती, शिक्षण, अभ्यास याबद्दल उदासीनता, छोटासा व्यवसाय, नोकऱ्याच नसल्याने शिकून करायचे काय (आधीची वर्षानुवर्षे साचलेली बेरोजगारी) अशी अनेकविध कारणेदेखील यापुढे उच्च शिक्षणातील समस्या म्हणून केंद्रस्थानी राहतील. त्यातच आता होऊ घातलेली विद्यार्थ्यांच्या बायोमेट्रिक हजेरीची सक्ती! वर्षानुवर्षे तासिका तत्त्वावर असलेल्या प्राध्यापकांसमोर नोकरीची असुरक्षितता, तुटपुंजे मानधन, वेतनात विलंब, सामाजिक सुरक्षा लाभांचा अभाव, कामाचा अतिरिक्त ताण, सेवाज्येष्ठतेचा कमी विचार, भरती प्रक्रियेतील अनिश्चितता असा चक्रव्यूह दिसत आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनइपी) २०२० नुसार महाविद्यालयांमधून सर्वच शाखांमध्ये पर्यायी मेजर, मायनर आणि तत्सम अनेक विषयांची लांबलचक यादी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने आली आहे. त्यामुळे त्यातील काही विषयांना विद्यार्थी अत्यल्प, तर काही विषयांना विद्यार्थी संख्या वाढली आहे. कार्यभार वाढला, तरी त्यानुसार पदे मंजूर होणे, तासिका तत्त्वावर वाढलेल्या कार्यभाराप्रमाणे वाढीव पदांना वेतन मंजुरीची हमी दिसत नाही. कॉलेजकडे येणाऱ्या बहुतांश पत्रांमध्ये तत्काळ, अतितत्काळ, महत्त्वाचे, अतिशय महत्त्वाचे आणि संबंधित कार्यवाही न झाल्यास कॉलेज, प्राचार्य जबाबदार राहतील, असे वारंवार येणारे सक्त लेखी आदेशसुद्धा या शिक्षण व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनला आहे. अध्यापनाशिवाय इतर कामकाजाकरिता आवश्यक असणारा शिक्षकेतर कर्मचारीवर्ग, ग्रंथपाल तसेच शारीरिक शिक्षण संचालक यांची पदे अनेक वर्षांपासून रिक्त आहेत. या साऱ्या पार्श्वभूमीवर, जुनी-गंजलेली शस्त्रे अन् तुटपुंजे सैन्य बळ घेऊन सर्वार्थाने बलाढ्य असलेल्या शत्रूविरुद्धचे युद्ध जिंकण्यासारखे आव्हान या उच्च शिक्षण व्यवस्थेसमोर दिसत आहे. अर्थात, अशा स्वरूपाचे बहुआयामी बनलेले अन् अडथळ्यांच्या शर्यतीचे स्वरूप फक्त उच्च शिक्षणात नाही, तर प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावर देखील हे सारे चक्र आहेच. असे असले, तरी निगेटिव्ह प्रूव्ह करण्यापेक्षा स्वतः इम्प्रुव्ह होणे तितकंच गरजेचे! दृढ संकल्प ठेवून पुढील विकासात्मक, शाश्वत वाटचाल मात्र करावीच लागेल.

**प्रा. डॉ. अशोक शिंदे**

## ममताचा थयथयाट

केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार याद्यांची फेरतपासणी सुरू केल्यापासून पश्चिम बंगालमधल्या मुस्लीम अल्प संख्याकांच्या मतांच्या बँकेतली हक्काची शिल्लक कमी होण्याच्या भीतीने पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी या मतदार याद्यांच्या फेरतपासणीला कडाडून विरोध केला. केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर आरोपांची राळ उडवली. रस्त्यावर उतरून आंदोलनेही केली. सर्वोच्च न्यायालयात त्या धाव घेत दिग्गज वकिलांच्या समवेत फेरमतदार यादींची फेर तपासणी रद्द व्हावी, अशी याचिकाही करून काहीही उपयोग झाला नाही. सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारची, आपल्या तृणमूल पक्षाची बाजू मांडण्यासाठी त्यांनी स्वतःही भाग घेतला. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. निवडणूक आयोगावरचे पक्षपातीपणाचे सर्व आरोप फेटाळून लावत, सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगालमधल्या मतदार याद्यांची फेर तपासणी कडकपणे सुरू ठेवण्याचे आदेश देतानाच या मोहिमेत राज्य सरकारने कोणतेही अडथळे आणू नयेत, असे सक्त आदेशही दिले. एवढेच नव्हे तर मतदार याद्यातून वगळलेल्या मतदारांची कायदेशीर बाजू ऐकण्यासाठी एक हजार न्यायाधीशांची नियुक्ती करायचे आदेश निवडणूक आयोगाने दिले. परिणामी मतदार याद्यांची फेरतपासणी सुरूच राहिली आणि राज्यातल्या ६३ लाख मतदारांची नावे वगळली गेली तर ६० लाख मतदार संशयित यादीत असल्याने ममतांचा संतापाचा पारा अधिकच चढला आणि या मोहिमेच्या प्रत्यक्ष पाहणीसाठी राज्याच्या दौऱ्यावर येणाऱ्या मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या विरोधात त्यांनी राजधानी कोलकत्ता शहरात पक्षाच्या कार्यकर्त्यांसह धरणे आंदोलन सुरू केले. ज्ञानेशकुमार कोलकत्त्याला येताच ते ज्या हॉटेलमध्ये उतरणार होते त्या हॉटेलसमोरच तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी निदर्शनेही केली. राज्याच्या उंबरठ्यावर आलेल्या विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपण मतदारांचे त्राते आहोत, हे दाखवण्यासाठी त्यांचा सारा हा आटापिटा, आक्रस्ताळपणा आणि तमाशा सुरू आहे.




मतदार याद्यातून बनावट मतदारांची नावे वगळली गेल्याने निवडणुकीवर त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो अशा भीतीने पछाडलेल्या आणि त्यासाठी केंद्र सरकार निवडणूक आयोगावर सतत तोफा डागणाऱ्या ममतांना देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदावर असलेल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा उघड अपमान, अवमान करतानाही कसलीही शरम त्यांना वाटली नाही. चार दिवसांपूर्वी पश्चिम बंगालमधल्या सिलीगुडी जिल्ह्यातल्या बिधाननगरमध्ये होणाऱ्या संथाल आदिवासी मेळाव्याचे ठिकाणही त्यांनी परस्पर बदलून टाकले. बाग डोंगरा विमानतळाजवळच्या छोट्या जागेत हा मेळावा घ्यावा लागला. राज्य शिष्टाचारानुसार राष्ट्रपतींच्या स्वागताला त्या स्वतः तर गेल्या नाहीच पण एकाही मंत्र्याला राष्ट्रपतींच्या स्वागताला त्यांनी पाठवले नाही. बाग डोगराच्या महापौरांनी मुर्मू यांचे औपचारिक स्वागत केले. हा मेळावा कोणत्याही पक्षाचा नव्हता. तो आदिवासी समाजाचा होता. तरीही ममतांनी त्यात कोलदांडे तर घातलेच पण राज्य शिष्टाचाराचे सारे संकेत पायदळी तुडवले. खुद्द मुर्मू यांनी आपल्या भाषणात राज्य शिष्टाचारा भंग केल्याबद्दल ममतांचे नाव घेत, नाराजी व्यक्त करीत राज्य सरकारला आदिवासींचे कल्याण नको असल्याची टीकाही केली.पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ही घटना लाजिरवाणी असल्याची टीका ममतांवर केली. पण तरीही ममता मात्र आपल्या कृत्याचे निर्लज्जपणे समर्थन करीत आहेत. उध्दटपणा, बेमुर्वतखोरपणा आणि उद्दामपणा याच अवगुणांनी थयथयाट करणाऱ्या ममता आता अधिकच पिसाळल्या आहेत, त्या अशा.

**श्रीहरी**

## युद्धाची धग सर्वसामान्यांच्या स्वयंपाकगृहात

अमेरिका आणि इराण या देशांनी इराणवर केलेल्या हल्ल्याला बारा दिवस उलटले तरी हे युद्ध थांबायचे नाव घेत नाही. युद्धाच्या या धगीत देशातील सर्वसामान्य नागरिकांची ससेहोलपट होत आहे.आता भारतीयांच्या स्वयंपाक घरांमध्येही बसू लागली आहे. स्वयंपाकाचा गॅस ही जीवनावश्यक गरज आहे.सरकार सर्वसामान्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करीत असले तरी टीव्ही वरील बातम्या पाहून सर्वसामान्यांच्या चिंतेत भरच पडत आहे. त्यात सरकारने गॅसच्या दरात ६० रुपये इतकी घसघशीत दरवाढ केल्याने भविष्यात गॅसचे दर आणखी वाढेल अशीही भीती निर्माण झाली आहे.सर्वसामान्य नागरिक घरगुती गॅस मिळत नसल्याने हवालदिल झाले आहेत तर व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा सरकारने बंद केला असल्याने हॉटेल व्यावसायिकांवर हॉटेलला टाळे लावण्याची वेळ आली आहे. हॉटेल बंद झाल्यास त्यावर उपजीविका करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. घरगुती गॅस प्रमाणेच सिनजी गॅसचाही तुटवडा जाणवू लागल्याने सीएनजी पंपावर रिक्षा आणि वाहनांच्या देशखील रांगा पहायला मिळत आहे. गॅस तुटवड्यामुळे काही कंपन्यांनी आपले कामकाज बंद केले आहे एकूणच या युद्धाने देशातील नागरिक हैराण झाले आहेत. देशाच्या गरजेपैकी ६० टक्के एलपीजी गॅस आपण आयात करतो आणि त्यातील ८० टक्के एलपीजी हा आखाती देशातून हॉर्मुझमार्गे भारतात येतो. तो मार्ग बंद झाल्याने देशातील ३० टक्के गॅस पुरवठा बाधित झाला आहे. हे होणार होते याची कल्पना सरकारलाही होती मात्र सरकारने राखीव साठा किंवा पुरेशी पर्यायी व्यवस्था न केल्याचेच हे परिणाम आहेत.

**श्याम ठाणेदार**

## महाराष्ट्र साखर उत्पादनात अव्वल

गेल्या वर्षी राज्यात समाधानकारक पाऊस पडल्याने ऊसाचे उदंड पीक आले. परिणामी ग्रामीण महाराष्ट्रातील शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकासामध्ये हातभार लावणाऱ्या साखर उद्योगाला यंदा सुगीचे दिवस आले आहेत. इंडियन शुगर अँड बायो-एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (इस्मा) च्या अंदाजानुसार महाराष्ट्र २०२५-२६ च्या हंगामात साखर उत्पादनात देशात अव्वल ठरला असून महाराष्ट्रात अंदाजे ११८ लाख टन साखरेचे उत्पादन अपेक्षित आहे जे दुसऱ्या क्रमांकावरील उत्तर प्रदेशापेक्षा (९८.५ लाख टन) अधिक आहे. देशात यंदा एकूण ३२४ लाख टन साखरेचे उत्पादन अपेक्षित आहे. एकूण उत्पादनापैकी ३१ लाख टन साखर इथेनॉल उत्पादनासाठी वापरण्यात येणार असल्यामुळे निव्वळ साखर उत्पादन २९३ लाख टन इतके असणार आहे. विशेष म्हणजे उत्तर प्रदेशचे साखर उत्पादन घटले असून गेल्या हंगामात ते १०१.१६ लाख टन इतके होते. ते यंदा ९८.५ लाख टनावर आले आहे. तर तिसऱ्या स्थानावरील कर्नाटकचे साखर उत्पादन गेल्या हंगामात ५४.८८ लाख टन होते. त्यात वाढ होऊन यंदा ते ६१.०४ लाख टन राहण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. या निमित्ताने देशात सर्वाधिक ३६.४१ टक्के साखरेचे उत्पादन करणाऱ्या राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आणि सुमारे दोन लाख ऊस कामगारांच्या तोंडात आनंदाची आणि सुखाची साखर पडली आहे.

**संवाद**

**-प्रदीप मोरे**

## यंदा अल निनोचे सावट

यंदा अल निनो चे सावट आहे. त्यामुळे पाऊस काळ कमी होण्याची शक्यता आहे. जागतिक हवामान तज्ञानी ही शक्यता वर्तविली आहे. गेली सुमारे तीन चार वर्षे पाऊस सर्वसाधारण पणे भरपूर झाला. यंदा दुष्काळाचे सावट असल्यामुळे पाणी जपून वापर करणे आवश्यक आहे शेतीत सुहा सरकारने मार्गदर्शन करणे जरुरी आहे. आज तरी महाराष्ट्रातील सर्वच विभागातील धरणातील साठा समाधानकारक आहे. पाणी अत्यंत काटकसरीने वापराने जरुरीचे आहे. मोटारी किंवा इतर वाहने दररोज न धुता पाणी वाचवावे.तसेच घरगुती वापर करताना पाणी जपून वापरावे. अनेक वेळा पाणी वाहत असते त्याकडे कोणाचेही लक्ष नसते. अशा गोष्टी टाळल्या पाहिजेत.सरकार आपल्या परीने लक्ष देईल पण आपणही यात पाणी वाचविणे अत्यंत जरूर आहे.

**शांताराम वाघ**

## सोशल मीडियावरील बंदी:समाजहित महत्त्वाचे

कर्नाटक तसेच आंध्र प्रदेश राज्य सरकारने १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्याचा घेतलेला निर्णय हा आजच्या डिजिटल युगातील एक अत्यंत धाडसी आणि कौतुकास्पद निर्णय आहे. अर्थसंकल्पात केलेली ही घोषणा केवळ एका राज्यापुरती मर्यादित न राहता, संपूर्ण देशासाठी एक दिशादर्शक पाऊल ठरू शकते. आजच्या काळात सोशल मीडियाचा वाढता अतिरेक आणि त्यातून निर्माण होणारे गंभीर सामाजिक व मानसिक प्रश्न पाहता, अशी शिस्त लावणे ही काळाची गरज बनली आहे. परंतु, या निर्णयातून एक मोठा राजकीय विरोधाभास समोर येतो. दुर्दैवाने, भारतीय राजकारणात 'निर्णय काय आहे' यापेक्षा 'तो कोणी घेतला आहे' याला जास्त महत्त्व दिले जाते. हाच निर्णय जर केंद्र सरकारने किंवा एखाद्या भाजपशासित राज्याने प्रथम घेतला असता, तर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी कदाचित 'देशातील लोकशाही धोक्यात आली आहे' किंवा 'अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येत आहे' असा कांगावा केला असता. परदेशात जाऊन 'भारत हुकूमशाही कडे झुकत आहे' असे विधान करत देशाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्नही झाला असता. केवळ आपल्या स्वार्थी राजकारणासाठी कोणत्याही मुद्द्याचा 'पराचा कावळा' करून समाजात वैमनस्य पसरवण्याच्या या वृत्तीला आता कोठेतरी आळा बसणे आवश्यक आहे.

वास्तविक पाहता, हा प्रश्न आता केवळ राजकीय राहिलेला नसून तो पूर्णतः 'सामाजिक' झाला आहे. सोशल मीडिया चे दुष्परिणाम कोणत्याही एका पक्षाच्या समर्थकांना नव्हे, तर संपूर्ण समाजाला आणि येणाऱ्या पिढीला भोगावे लागत आहेत. मुलांचे मानसिक आरोग्य, सायबर सुरक्षितता आणि संस्कारांची जपणूक करण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे. अशा संवेदनशील विषयावर केवळ विरोधासाठी विरोध न करता, सर्व पक्षांनी मतभेद विसरून एकत्र येणे आणि पाठिंबा देणे हे लोकशाहीत क्रमप्राप्त आहे.

**अविनाश देशपांडे**

# अवैध वसुलीच्या दबावाला कंटाळून तरुणीचा आत्महत्येचा प्रयत्न

## पतसंस्थांच्या अरेरावीमुळे सामान्य नागरिकांचे जगणे कठीण; कर्ज वसुलीच्या पद्धतीवर प्रश्नचिन्हचा आरोप

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - सहकारी पतसंस्थांकडून कर्ज वसुलीसाठी वाढत चाललेल्या दबाव व अरेरावीमुळे एका तरुणीने टोकाचे पाऊल उचलत गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना यवतमाळ येथील परिसरात घडली असून संबंधित तरुणी सुदैवाने बचावली आहे. सध्या तिच्यावर श्री.वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, यवतमाळ येथील केशव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, वणी शाखा यवतमाळ येथून संबंधित तरुणीचे वडील गजानन नाणेकर यांनी सन २०१९ मध्ये सुमारे ३ लाख ५० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. या काळा कोरोना महामारीमुळे त्यांचा रोजगार हिरावला गेला. त्यामुळे कर्जाची परतफेड करणे कठीण झाले. दरम्यान, सन २०२३ मध्ये गजानन नाणेकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यानंतर कुटुंबाची सर्व जबाबदारी त्यांच्या मुलगी कुमारी अल्पशी(नाव बदलून) हिच्यावर आली. घरात आई व लहान भाऊ असल्याने ती खाजगी नोकरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होती. याच दरम्यान पतसंस्थेकडून वडिलांनी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी वारंवार तगादा लावण्यात येत असल्याचे संबंधित तरुणीने सांगितले आहे. नातेवाईकांकडून पैसे जुळवाजुळव करून काही रक्कम भरण्याची तयारी दाखवत वन टाइम सेटलमेंट द्वारे कर्ज निकाली काढण्याची विनंती तिने पतसंस्थेकडे केली होती. मात्र संस्थेच्या व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांनी ती विनंती नाकारत मूळ रक्कम व व्याजासह संपूर्ण कर्ज फेडण्याचा आग्रह धरला, असा आरोप तिने केला आहे. तसेच घराची जप्ती, घरातील साहित्य तसेच दुकान जप्त करण्याच्या धमक्या देण्यात आल्याचा आरोपही संबंधित तरुणीने केला आहे. या सततच्या दबावामुळे कुटुंबाचे होत असलेली अवहेलना त्यामुळे मानसिक ताण वाढल्याने तिने आपल्या घरी गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे सांगितले आहे. सुदैवाने कुटुंबीयांच्या लक्षात आल्याने तिला तात्काळ खाली उतरवून उपचारासाठी वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथे दाखल करण्यात आले. सध्या तिची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. सहकार क्षेत्रातील वसुली पद्धतीवर पुन्हा प्रश्न उपस्थित होत असून या घटनेमुळे सहकारी पतसंस्थांकडून कर्ज वसुलीसाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धतीवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जिल्ह्यात आधीच आर्थिक अडचणींमुळे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण चिंताजनक असताना आता काही पतसंस्थांच्या वसुलीमुळे सामान्य नागरिकांनाही मानसिक ताण सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. विशेषतः चक्रवाढ व्याज, दंडात्मक व्याज आणि जबरदस्तीची वसुली यामुळे अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती ढासळत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दुसरीकडे काही सहकारी पतसंस्था नागरिकांची ठेव रक्कम घेऊन फरार झाल्याच्या घटनाही जिल्ह्यात घडल्या आहेत. अशा संस्थांवर कठोर कारवाई होत नसताना कर्जदारांवर मात्र दबाव आणला जात असल्याचा आरोप केला जात आहे. या घटनेनंतर संबंधित पतसंस्थेच्या वसुली प्रक्रियेची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, तसेच आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना दिलासा देण्यासाठी शासनाने स्पष्ट धोरण ठरवावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांकडून केली जात आहे. दरम्यान, या प्रकरणात संबंधित पतसंस्थेची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नसून, ती मिळाल्यानंतरच संपूर्ण वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

## आयुष्मान कार्डचे मिशनमोडवर वितरण पूर्ण करा : जिल्हाधिकारी

यवतमाळ : जिल्ह्यातील नागरिकांना आरोग्य योजनांचा अधिकाधिक लाभ मिळावा यासाठी आयुष्मान भारत जन आरोग्य योजनेअंतर्गत आयुष्मान कार्डचे वितरण मिशनमोडवर पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी आरोग्य यंत्रणेला दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या अध्यक्षतेखाली एकत्रित महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत जन आरोग्य योजनेची आढावा बैठक गुरुवारी पार पडली. या बैठकीला जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा समन्वयक, तालुका आरोग्य अधिकारी तसेच आरोग्य विभागातील इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जिल्ह्यातील आयुष्मान भारत गोल्डन कार्ड व वंदना कार्ड वितरणाचा आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्ह्यात आतापर्यंत 12 लाखांहून अधिक आयुष्मान कार्डचे वितरण करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. उर्वरित पात्र लाभार्थ्यांपर्यंतही ही योजना पोहोचवून सर्वांचे ईकेवायसी करुन कार्ड तयार करण्याचे काम युद्धपातळीवर करावे. यासाठी नोडल अधिकारी नेमावे. तसेच या उपक्रमात चांगली कामगिरी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना पुरस्कार द्यावे, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.

# उजाड गावांत मतदानाची नोंद कशी ?

## अवैध मतदान यंत्रणेचा संशय, प्रशासनाला चौकशीचे आदेश

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - दिग्रस, दारव्हा आणि नेर तालुक्यातील काही गावे महसूल नोंदीनुसार उजाड (निर्जन) असल्याचे नमूद असतानाही त्या गावांमधून लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये मतदान झाल्याची नोंद आढळल्याने राजकीय व प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात अवैध मतदान यंत्रणा कार्यरत असल्याचा संशय व्यक्त केला जात असून प्रशासनाने याबाबत चौकशीचे आदेश दिले आहेत. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 चे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी विजय सूर्यवंशी यांनी तहसीलदार, दारव्हा यांना पत्र पाठवून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून तातडीने अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

राष्ट्रव्यापी मातृभूमी भेदभाव निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष भिमराव राठोड यांनी 5 मार्च 2026 रोजी याबाबत लेखी अर्ज सादर केला होता. संबंधित अर्ज 10 मार्च रोजी कार्यालयात प्राप्त झाला असून त्यामध्ये दिग्रस, दारव्हा आणि नेर तालुक्यातील काही गावे महसूल विभागाच्या नोंदीप्रमाणे उजाड असल्याचे नमूद असूनही त्या गावांमध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुकांसाठी मतदान झाल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. महसूल विभागाकडून नायब तहसीलदारांनी सादर केलेल्या यादीत दारव्हा तालुक्यातील इमामपूर, इश्रामपूर, औरंगपूर, कुंड, कजरा खुर्द, गणेशपूर, चोरोगी, तेलधरी, देवगिरी, डोमखंड-१, डोमखंड-२, नांदगव्हाण लाड, निंबाळा, पिंपरी बु., बागापूर, भिलेश्वर, महमदपूर, लिंगबोरी, सैदानी, हुस्त्रापूर आणि वाकी या गावांचा समावेश आहे. तसेच नेर तालुक्यातील बोरगाव, ब्राह्मणवाडा, भालकी, बाळापूर, टेंबी, उमरविहीर, वानरखेडा आणि महाजनपूर ही गावेही उजाड असल्याचे नमूद करण्यात आले आहे.मात्र आश्चर्याची बाब म्हणजे या गावांमध्ये सातबारा उतारे अस्तित्वात असून ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद तसेच विधानसभा व लोकसभा निवडणुकांमध्ये मतदान झाल्याच्या नोंदी दिसून येतात. प्रत्यक्षात वस्ती नसलेल्या गावांमध्ये मतदान कसे झाले, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

याशिवाय काही उजाड गावांमध्ये पोलीस पाटील पदेही अस्तित्वात असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे त्या पदांवरील व्यक्तींना मानधन कोणत्या निकषांवर दिले जाते, याबाबतही शंका उपस्थित करण्यात येत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर प्रशासनाने तहसीलदारांना संपूर्ण प्रकरणाची वस्तुनिष्ठ चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले असून अर्जदारालाही चौकशीबाबत माहिती देण्यास सांगितले आहे. दरम्यान, उजाड गावांत झालेल्या मतदानाच्या नोंदीमुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून या प्रकरणाचा सत्य अहवाल काय येतो याकडे राजकीय व सामाजिक वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## • वेचक

### जिजाऊ ब्रिगेड शाखा दिग्रसच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

दिग्रस - जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने, महिलांना व्यक्त होण्याकरिता, आपल्या कलागुणांना वाव देण्याकरिता, व इतर महिलांशी संपर्कात राहण्याकरिता. खास सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेली आहे. उघड पंख अन, घे भरारी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जिजाऊ ब्रिगेड शाखा दिग्रस च्या वतीने खास महिलांकरिता दिनांक 22 मार्च 2026 रोज रविवारला दुपारी तीन ते सात या वेळात आयोजित करण्यात आखलेल्या. स्पर्धा समूह नृत्य, एकल नृत्य आणि गीत गायन या स्पर्धेचे खास वैशिष्ट्य म्हणजे बक्षिसांचा वर्षाव आणिक. पैठणीचा मान त्वरा करा आणि लगेचच आपले नाव नोंदवा. नोंदणी अंतिम दिनांक 15 मार्च 20 26 प्रवेश शुल्क समूह नृत्य दोनशे रुपये एकल नृत्य शंभर रुपये गीत गायन पन्नास रुपये.नोंदणी केलेल्याच स्पर्धकांना स्पर्धेत सहभागी होता येणार असून वेळेवर येणाऱ्या स्पर्धकांना सहभागी होता येणार नाही याची क्रुपया नोंद घ्यावी जास्तीत जास्त महिलांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन जिजाऊ ब्रिगेडच्या तालुका अध्यक्ष शिवमती शुभदा ताई पाटील तथा संपूर्ण कार्यकारणी यांनी केलेली आहे.

# जागतिक महिला दिन साजरा

## महिलांचा विकास हेच माझे ध्येय: नगराध्यक्ष मोहिनीताई नाईक!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - नगर परिषद अंतर्गत महिला व बालकल्याण विभाग यांचेकडून आज जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सन्मान स्त्री शक्तीचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्याक्रमचे अध्यक्ष स्थानी सौ. अनिताताई मनोहरराव नाईक, माजी नगराध्यक्ष, नगर परिषद पुसद या होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून सौ. मोहिनीताई इंद्रनील नाईक, नगराध्यक्ष, नगर परिषद पुसद, हर्षवर्धन बी. जे. (भा.पो.से.) उपविभागीय पोलीस अधिकारी पसद, रेखा वाणी तहसीलदार पुसद,अभिजित पानपट्टे, सभापती बांधकाम विभाग, विठ्ठल खडसे सभापती शिक्षण विभाग, राजेश साळुंके, सभापती पाणी पुरवठा विभाग, मजहर ताहेर खान सभापती आरोग्य विभाग, सौ.अश्विनी जिल्हेवार, सभापती महिला व बालकल्याण, डॉ.मोहम्मद नदीम, गटनेता नगर परिषद पुसद,सौ. संगीता जाधव, राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला मंडळ सल्लागार, (अजित पवार गट) विनोद जिल्हेवार, विजय जाधव, कु.तेजश्री कडू यवतमाळ, सौ.माधवी गुल्हाने, माजी नगराध्यक्ष, रवींद्र राऊत मुख्याधिकारी नगर परिषद पुसद हे



प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात वंदे मातरम गीताने करण्यात आली. सर्व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्याक्रमचे प्रास्ताविक, सौ. अश्विनी विक्रांत जिल्हेवार यांनी केले. शासनाच्या महिला व बालकल्याण विभागकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ शहरातील महिलांना देण्यावर आमचा भर राहील असे त्यांनी आपल्या प्रास्ताविकात नमूद केले. यानंतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या कर्तुत्ववान महिलांचा सन्मान यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये, श्रीमती. मेघा शेंडे आरोग्य सेविका, श्रीमती. तेजस्विनी धेगावत आशा सेविका, श्रीमती आलोचना येरमलम, सहा. फौजदार, श्रीमती मंदाकिनी भगत,पो,हे कॉ. सौ.सुचिता एकनाथ चव्हाण वाहक, श्रीमती. शीतल सरके, कक्ष सेविका, प्रा.डॉ.अनुश्री पुरी, श्रीमती. मुमताज शेख, आटो चालक, श्रीमती प्रेमळ गोविंद पवार, अंगणवाडी सेविका, श्रीमती.अश्विनी अनिल वनेरकर, महिला पोलीस कॉन्स्टेबल यांचा शाल श्रीफळ व मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे हर्षवर्धन बी.जे. यांनी महिलांना पोलीस खात्यातील विविध विषयावर मार्गदर्शन केले.तर सौ. संगीता जाधव यांनी महिलांना विविध विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी कु. तेजश्री कडू, ग्रामीण स्वयं रोजगार प्रशिक्षण संस्था यवतमाळ यांनी महिलांना स्वयं रोजगार संबंधी माहिती दिली. यावेळी महिला बचत गटाच्या सौ.सुशीला तिलवंत व सौ. शोभा सरकटे, अध्यक्ष, जागृती शहर स्तर संघ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मोहिनीताई नाईक, नगराध्यक्ष यांनी महिलादिनाचे औचित्य साधून याप्रसंगी बचत गटांचे महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे दृष्टीने शहरामध्ये मोक्याचे ठिकाणी मॉल साठी इमारत उपलब्ध करून देण्याचे अश्वासन दिले तसेच शहरातील बचत गटांच्या महिलांसाठी ट्रेनिंग सेंटर सुरु करून जास्तीत जास्त महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याचेही यावेळी घोषित करून महिलांचा सर्वांगीण विकास हेच माझे ध्येय असल्याचे प्रतिपादन केले.

# "श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयाच्या मुकुटात अजून एक मानाचा तुरा"

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - स्थानिक श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालयात गेल्या पाच वर्षांपासून महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा हा उपक्रम अत्यंत यशस्वीपणे राबविला जात आहे. या उपक्रमात वर्षभरात होणाऱ्या विविध स्पर्धेत तसेच विद्यार्थिनींना नियमित स्वयंरोजगाराविषयी तसेच स्पर्धा परीक्षा विषयी होणाऱ्या विविध उपक्रमात महिला महाविद्यालय अतिशय यशस्वीपणे कार्य करीत आहे.

नुकताच अकोला येथील श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अमरावती विभागीय करिअर कट्टा पुरस्कार वितरण सोहळा अतिशय दिमागदार पद्धतीने संपन्न झाला. यामध्ये महिला महाविद्यालयाला चौथ्या वर्षी जिल्हास्तरीय उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून प्रथम क्रमांकाचे



पारितोषिक प्राप्त झाले.

तसेच "ए डब्ल्यू एस करिअर टूर "या उपक्रमात जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. "सोलर एनर्जी कॅम्पेन "या स्पर्धेत जिल्ह्यातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला. "मराठवाडा पूरग्रस्तांसाठी मदत करणारे महाविद्यालय म्हणून जिल्ह्यातून पहिले महाविद्यालयाचा पुरस्कार प्राप्त झाला" तसेच वैयक्तिक पुरस्कारात कुमारी "मनीषा वामन श्यामसुंदर " ही करिअर संसदेचे मुख्यमंत्री म्हणून तसेच करिअर कट्टा च्या सर्व ऑनलाईन कार्यक्रमास नियमित सहभागासाठीचे पारितोषिक मनीषा शामसुंदरला प्राप्त झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आर एम भिसे होते.

कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून अमरावती विभागीय प्राचार्य प्रवर्तक डॉ. धनंजय तळवणकर होते करिअर कट्टाचे अध्यक्ष यशवंत शितोळे यावेळी विचारपीठावर उपस्थित होते. अमरावती विभागीय समन्वयक डॉ दिनेश खेडकर सह विभागीय समन्वयक डॉ रंजना जीवने, प्रा सुरेश राऊत डॉ मिलिंद शिरभाते, डॉ तुषार देशमुख उपस्थित होते.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/३१/२०२५
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- ०९/०२/२०२६

## जाहीरनामा

उपरोक्त विषयाचे संदर्भीय शासन निर्णय व पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार **गुलाम दस्तगीर शेख चाँद रा. उमरखेड यांनी** त्यांचे मुलीचे नामे समिना बानो गुलाम दस्तगीर मौजा उमरखेड **ता. उमरखेड येथे दिनांक** ०५.०१.१९९१ रोजी झालेला आहे. जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **जन्मनोंद** आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक २५/०२/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कायालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**स्वा.**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**

## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार राजेश नामदेवराव भोयर यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणेप्रमाणे: मौजा राळेगांव, ता. राळेगांव जि. यवतमाळ, ग्राम पंचायत च्या हद्दितील शेत सर्वे कं. २०९/२ नविन, गट नं. ५९३ मधील प्लॉट कं. ३७ ज्याची एकुण आराजी २१०.०० चौ. मी. म्हणजेच २२६०.०० चौ. फुट इतकी असुन त्याची चतुःर्सिमा आहे. पुर्वेसः ले आउट मधील प्लॉट नं. ३१ व ३२, पश्चिमेसः लेआउट मधील रोड, उत्तरेसः ले आउट मधील प्लॉट नं. ३६, दक्षिणेसः ले आउट मधील प्लॉट नं. ३८. माझे पक्षकार राजेश नामदेवराव भोयर यांनी वर नमुद मालमत्ता दिवाकर विष्णुजी भोयर यांच्याकडून दि. ०४/०४/२०१२ रोजीच्या नोंदणीकृत विक्रिपत्राअन्वये ज्याचा दस्त क. ३३९ असा आहे त्याअन्वये विकत घेतली होती. सदर मालमत्ता विकत घेतेवेळी माझे पक्षकार यांनी वर नमुद मालमत्तेचे पुर्वीचे मालक महादेव शंकरराव लढे व्दारा उध्दव बाजीराव सातपुते यांचे दिनांक २७/०३/१९९८ रोजीचे नोंदणीकृत विक्रिपत्र ज्याचा दस्त कं. १५२ असा आहे.तसेच यापुर्वीचे मालक उध्दव बाजीराव सातपुते व्दारा १. कन्हैयालाल व्दारकादास जयस्वाल, २. अमरसिंह विजय बहादुरसिंह बैस तर्फे कुल मुख्यत्यार श्री. बिरबलसिंह मेहतासिंह चव्हाण यांचे दिनांक १७/०४/१९९६ रोजीचे नोंदणीकृत विक्री पत्र ज्याचा दस्त कं. २८५ असा आहे ते दोन्ही मुळ विक्री पत्र आपल्या ताब्यात घेतले होते. ते वर नमुद दोन्ही मुळ विक्रीपत्र माझे पक्षकार यांच्या ताब्यातुन गहाळ झालेले आहे.

माझे पक्षकार वर नमुद मालमत्ता गहाण ठेवून कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता तसेच गहाळ झालेले वर नमुद दोन्ही मुळ विक्रीपत्र कोणत्याही बँककडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क व अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह ७ दिवसांच्या आत लेखी उत्तर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही. तसेच गहाळ झालेले मुळ विक्रिपत्र सापडल्यास ते त्वरीत माझे पक्षकार यांना परत करावे.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**

# भाजपा सोशल मीडिया तालुका अध्यक्षपदी अरविंद जाधव यांची नियुक्ती

**जनमाध्यम प्रतिनिधी**



घाटंजी - तालुका भारतीय जनता पार्टी सोशल मीडिया आघाडीच्या तालुका अध्यक्षपदी श्री. अरविंद लक्ष्मणराव जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या संबंधिचे पत्र भाजपाचे तालुका अध्यक्ष श्री विजयसिह बैस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे. अरविंद जाधव हे मागील अनेक वर्षांपासून सोशल मीडियावर सक्रिय सहभाग घेऊन पक्षाची ध्येय व धोरणे भक्कमपणे मांडून जनतेची मन परिवर्तन करण्याचे काम करत असतात. त्यानी तालुक्यात केलेली सामाजिक कामे व त्यांचा असलेला जनसंपर्क याचा विचार करून आर्णी विधानसभेचे लोकप्रिय आमदार प्रा. श्री राजूभाऊ तोडसाम आणि अण्णासाहेब पारवेकर यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाने तालुका अध्यक्ष श्री विजयसिंह बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत अरविंद जाधव यांना नियुक्तीपत्र प्रदान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. अरविंद जाधव यांना सोशल मीडियांचा असलेल्या दांडगा अनुभवाने भारतीय जनता पार्टीची ध्येय व धोरण, पक्षाची विचारधारा अधिक मजबूत होतील आणिआपल्या कार्यक्षेत्रात पक्ष संघटन वाढविण्यासाठी चांगली मदत होणार असल्याचा विश्वास आ. राजूभाऊ तोडसाम, तालुका अध्यक्ष विजय बैस, यांनी दाखविला, आपल्या निवडीचे श्रेय आ. राजूभाऊ तोडसाम, विजय बैस,बंडूभाऊ तोडसाम,रमेशभाऊ धुर्वे, बाळूभाऊ जाधव,विनय जाधव यांना दिला आहे. नियुक्तीपत्र देतांना तालुका अध्यक्ष विजय बैस, रमेशभाऊ धुर्वे, बंडूभाऊ तोडसाम, रत्नाकर गावंडे, नरेश पेंदोर, अंबादास मेश्राम, लक्ष्मण कोवे,सह अनेक कार्यकर्ते उपस्थित राहून अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. अरविंद जाधव यांच्या निवडीने तालुक्यात आनंदाचे वातावरण असून सगळीकडून यांच्यावर अभिनंदनाचा व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# झीरपुरवाडी येथे ६० महिलांना साडीचोळी देऊन केले सन्मानित

**जनमाध्यम प्रतिनिधी**



दिग्रस - जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर झीरपुवाडी येथील विविध क्षेत्रात व दिव्यांग, विधवा तसेच शासकीय नोकरी करणाऱ्या महिलांना साडीचोळी वाटप कार्यक्रमाचे आयोजन रुपेश राठोड तसेच ग्रामपंचायत झिरपुरवाडी संयुक्तपणे केले होते.

गावातील विविध क्षेत्रातील ६० महिलांना सन्मानित करण्यात आले. सर्व प्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशासक पुरुषोत्तम कुडवे, प्रमुख पाहुणे डॉ. संजय कांबळे, रुपेश राठोड, प्रा. उमेश ठाकरे, कान्हुजी मिरासे, विलास डहाणे, रोजगार सेवक शंकर जुडे कारभारी हरी भाऊ राठोड, काजल दुर्गे, पो. पाटील वच्छला मिरासे, आशा सेविका सुनिता बोरचाटे, महानंदा टोगळे, मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय राठोड तर प्रास्ताविक काजल दुर्गे यांनी केले. आज महिलांचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल या पुरते मर्यादित राहिले नाही. महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून समाजकारण, राजकारण तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. ग्रामीण महिलांनाही आपण कुठेही कमी नाही हे लक्षात घेऊन समाजाला दिशा देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन डॉ. संजय कांबळे यांनी केले. महिलांनी स्वतःची क्षमता ओळखुन निवडलेल्या क्षेत्रात प्रगती करणे शक्य असल्याचे सांगितले. महिलांनी पुढे येत समाजात आपली वेगळी ओळख निर्माण करावी, असा संदेशही प्रशासक पुरुषोत्तम कुडवे यांनी यावेळी दिला.

# १४ मार्च रोजी पुसद येथे होणार जिल्हा कुस्ती चाचणीसाठी निवड

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - येथे तालीम कुस्तीगीर असोसिएशन जि.यवतमाळ च्या वतीने जिल्हा निवड चाचणी दिनांक 14/3/2026 रोजी शनिवार ला वेळ सकाळी: 9:30 ते 11:30 वाजेपर्यंत वजनगट घेण्यात येतील 12.00 वाजता कुस्त्यांना सुरुवात करण्यात येईल. ठिकाण: यशवंत रंगमंदिर बॅडमिंटन हॉल तहसील कार्यालयासमोर तालुका पुसद जि. यवतमाळ महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या व विदर्भ कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने महाराष्ट्र केसरी किताब 2025 -2026 रोजी 18 मार्च ते 22 मार्च 2026 रोजी या कालावधीत वाघोली ता.हवेली जि.पुणे येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी तालीम कुस्तीगीर असोसिएशन जि.यवतमाळ तालुका पुसदच्या वतीने तालीम संघ पाठविण्यासाठी जिल्हा निवड चाचणी स्पर्धा ही दिनांक 14/3/2026 रोजी शनिवारला घेण्यात येणार आहे.

खालील प्रमाने (वजन) गट:=57, 61, 65, 70, 74, 79, 86, 92, 97, महाराष्ट्र केसरी [ 86 ते 125 किलो ओपन] निवड चाचणी ठिकाण यशवंत रंगमंदिर बॅडमिंटन हॉल तहसील कार्यालयासमोर तालुका पुसद जि.यवतमाळ दिनांक 14 मार्च रोजी शनिवारला वेळ सकाळी:9.30 ते 11.30 वाजेपर्यंत वजनगट घेण्यात येतील.तसेच उशीरा आल्यास वजन घेण्यात येणार नाही.

सोबत येताना ओरिजिनल आधारकार्ड, दोन पासपोर्ट, मेडिकल सर्टीफिकेट,वडीलाचे संमतीपत्र सोबत आणावेत.असे आवाहन करण्यात आले आहे कुस्ती स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी प्रवेश शुल्क 100/रुपये ठेवण्यात आला आहे.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-४/कावि/०३/२०२५
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- ०६/०१/२०२६

## जाहीरनामा

उपरोक्त विषयाचे संदर्भीय शासन निर्णय व पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार **जकाउल्लाखान शमशेरखान पठान रा. उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी** त्यांचे स्वत:चे नामे **जकाउल्लाखान शमशेरखान पठान** मौजा उमरखेड **ता. उमरखेड येथे दिनांक** १५.०६.१९६६ रोजी झालेला आहे. जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **जन्मनोंद** आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक ३०/०१/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कायालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**स्वा.**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**


# प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा,वांजरी (पोड) येथे क्रांतीवीर बाबुराव शेडमाके यांची जयंती उत्साहात

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - महाकाली आदिवासी विकास संस्था द्वारा संचालित प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा,वांजरी येथे १८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामातील महान क्रांतीवीर वीर बाबुराव शेडमाके यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी वीर बाबुराव शेडमाके व महाकाली आदिवासी विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माध्य. मुख्याध्यापक वानखेडे सर होते.

तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राथ.मुख्याध्यापक वाय.आर. राऊत, वांजरी गावचे पोलिस पाटील अशोक कुमरे उपस्थित होते. वीर बाबुराव शेडमाके यांनी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी इंग्रजांविरूद्ध अठराव्या शतकात कठोर संघर्ष केला.त्यांचा संघर्ष समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे मत प्राथमिक मुख्याध्यापक वाय.आर.राऊत यांनी व्यक्त



केले.अध्यक्षीय वानखेडे सर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, बाबुराव शेडमाके यांच्यासारख्या क्रांतीकारकांच्या बलिदानाचे महत्त्व व कार्य समजाऊन सांगितले. तसेच पोलीस पाटील अशोक कुमरे यांनी वीर बाबुराव शेडमाके यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांनी ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्तीसाठी केलेला संघर्ष याविषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे संचालन भाटे सर यांनी केले तर आभारप्रदर्शन बोडेवार सर यांनी केले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक वृंद,शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# दिग्रस शहरात घरगुती गॅस सिलेंडरचा होत आहे अवैध वापर

**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस- जगात युध्दाचा उडालेला भडका त्यामुळे संपुर्ण जगात पेट्रोल,गॅस तसेच ईतर वस्तुचा पुरवठा होत नसल्यामुळे संपुर्ण जागामध्ये त्याचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यातुन आपल भारत देश सुध्दा सुटलेला नाही. त्यात आपल्या भारता मध्ये सिलेंडर हे घरचालविण्याचे प्रमुख साधन. सिलेंडर नसल्यास गृहिणी हतबल होतात. त्यामुळे वेळेवर जेवण न मिळाल्यामुळे ऑफीसला जाणारे माणसे,शाळेत जाणारे विद्यार्थी उपाशी पोटी जावे लागत आहे.

दिग्रस शहरामध्ये काही दिवसापासुन कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याचे दिसत आहे. सिलेंडर ब्लॅक मध्ये विकाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे चित्र दिसत आहे. घरगुती सिलेंडरचा वापर तिन चाकी, चार चाकी वाहनांमध्ये होत असल्याचे पहावसाय मिळत आहे. घरगुती सिलेंडर हॉटेल,ढाब्यामध्ये होत असल्याचे बोलले जात आहे. सिलेंडर वाटप करणारेच ब्लॅक करीत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे घरगुती सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण केल्या जात आहे. दिग्रस शहरामध्ये हॉटेल,ढाबे कीती आहे व त्यापैकी किती हॉटेल,ढाबे चालक व्यावसायीक सिलेंडर घेतात याची शहानिशा कधीच केल्या गेली नाही. व्यावसायीक सिलेंडर घेण्याचे प्रमाणखुपच कमी असुन त्या जागी घरगुती सिलेंडरचा वापर केल्या जातो त्यामुळे घरगुती सिलेंडर मिळणे दुरापस्त झाले आहे. व्यावसायीक सिलेंडरची खपत कमी असुन दिग्रस शहरात हॉटेल, ढाबे जास्त आहे. याचा अर्थ घरगुती गॅस सिलेंडरचा वापर हा व्यावसायीक कामा करीता होत असल्याचे दिसत आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

## संक्षिप्त

### शासकीय चना व तूर खरेदीचा शुभारंभ



**अचलपूर** - अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून स्थानिक टिएमसी यार्ड वर काल विधीवत शासकिय आधारभूत किंमतीने चना व तूर खरेदीचा शुभारंभ सभापती प्रतिभा ठाकरे व उपसभापती अतुल वाठ व संचालकांच्या उपस्थितीत करण्यात आला.शासनाने आधारभूत किंमतीवर सुरू केलेल्या चना व तूर खरेदीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळावा याकरीता चना व तूर खरेदीचे केंद्र शासनाच्या माध्यमातून प्रारंभ केले. चना ५८७५ तर तूर ८००० रूपये प्रतिक्विंटल या भावाने खरिदी केल्या जात आहे. या खरेदी केंद्रावर अमरावती जिल्ह्यातील कुठलाही शेतकरी चना व तूर विक्री करता आणू शकतो. त्याकरीता रितसर नोंदणी करणे आवश्यक आहे. याप्रसंगी बाजार समितीचे संचालक राजेंद्र गोरले, गोपाल लहाने, सतीश पाटील, पोपट घोडेराव, सचिव योगेश चव्हाण, मंगेश भेटाळू, धुर्वे व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी सभापती प्रतिभा प्रशांत ठाकरे यांनी शेतकऱ्यांना हरभरा व तूर विक्री करिता बाजार समिती येथे नोंदणी करण्याचे आवाहन केले.

### शिंगणापूर येथे गुढीपाडवा व श्रीराम- भरत भेट महोत्सव

**अमरावती**- दरवर्षीप्रमाणे श्री काळा मारोती महाराज संस्थान शिंगणापूर, ता. दर्यापूर येथे १ ते २० मार्च २०२६ पर्यंत गुढीपाडवा व श्रीराम-भरत भेट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हे या आयोजनाचे ३६ वे वर्ष आहे. यामध्ये आळंदी येथील ह.भ.प. श्री सोपान काका काळबांडे यांची श्रीराम कथा आयोजित केली असून ११ ते १९ मार्चपर्यंत सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत होईल. सोबतच हरिपाठ व हरीकिर्तने आयोजित केली आहेत. तसेच १९ रोजी दुपारी ३ ते ५.०० वाजेपर्यंत ढोल दिंड्या सह नगर प्रदक्षिणा आयोजित करण्यात आली आहे.सप्ताहात श्री ह.भ.प. शुभम महाराज काळे, ज्ञानेश्वर महाराज सखारामपुरकर व मारोती महाराज बावस्कर हे मृदंगावर साथ देतील व गायनाचार्य म्हणून श्री ह.भ.प. विष्णु महाराज रावणकार, हरिओम महाराज वाटोळे, अक्षय महाराज महल्ले व ज्ञानेश्वर महाराज गायनाची साथ देतील व कृष्ण महाराज वृंदावन धाम यांची साज सज्जा राहील. या सप्ताहाचे आयोजन प्रमुख ह.भ.प श्री भानुदास महाराज शेळके व पाटील महाराज खालखोनीकर आहेत.सप्ताहात दररोज सायंकाळी ७ ते ९.०० चे दरम्यान हरी कीर्तन होईल. यामध्ये ११ रोजी ह.भ.प.निलेश महाराज झावरे, १२ रोजी रोशन महाराज कळंबे १३रोजी रामेश्वर महाराज घागरे, १४ रोजी संतोष महाराज कोल्हे, १५रोजी सोपान महाराज काळबांडे, १६ रोजी ज्ञानेश्वर महाराज मिरगे, १७रोजी ज्ञानेश्वर महाराज वाघ, १८ रोजी विष्णु महाराज रावणकार, १९ रोजी हरिओम महाराज कोल्हे यांची हरी किर्तने होतील. २०रोजी ह.भ.प.श्री सारंग चैत्यनजी महाराज यांचे सकाळी ९ ते ११.०० वाजेपर्यंत काल्याचे कीर्तन होईल व त्यानंतर महा प्रसाद होऊन सप्ताहाचे समापन होईल.

# काँग्रेसतर्फे गॅस दर वाढीविरोधात तहसिलदारांना निवेदन



**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

केंद्रसरकारने गॅस दरवाढ केल्याबद्दल तसेच गॅस बुकिंग ची मुदत जास्त वाढविल्या बद्दल अंजनगाव सुर्जी शहर काँग्रेस कमिटी व ग्रामीण तर्फे निषेध नोंदविण्यात आला.प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व खासदार बळवंत वानखडे, व जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या सूचनेवरून अंजनगाव सुर्जी तालुका व शहर काँग्रेस तर्फे शासनाने केलेल्या गॅस सिलेंडरच्या दरवाढीचा निषेध नोंदविण्यात आला.

तहसील कार्यालय येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसतर्फे केंद्र सरकारने जी गॅस दरवाढ केली तसेच गॅस बुकिंगची मुदत वाढविली त्याबद्दल जनतेमध्ये नाराजी आहे .अगोदरच नापिकी तसेच शेतकऱ्याच्या मालाला अतिशय कमी भाव असल्यामुळे केंद्र सरकार बद्दल नाराजी आहे.सततच्या नापिकीमुळे शेतकऱ्यांचे अत्यंत नुकसान झाले त्यातच केंद्र सरकारने गॅस दरवाढीचा व गॅस बुकिंगची मर्यादा वाढवल्याबद्दल जनतेत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

भाववाढीमुळे प्रत्येक कुटुंबावर विपरीत परिणाम होणार आहे. 'अच्छे दिन' चे स्वप्न दाखवणाऱ्या शासनाने मोठ्या प्रमाणात गॅस दरवाढ करून जनतेचा विश्वासघात केला. याविरुद्ध काँग्रेस पक्षातर्फे आंदोलनात्मक कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

जर सरकारने या गोष्टीची दखल न घेता भाव वाढ कमी केली नाही तर काँग्रेस पक्षातर्फे यापेक्षा तीव्र आंदोलन पुकारण्यात येईल.

आंदोलनात अंजनगाव सुर्जी शहर काँग्रेसचे अध्यक्ष प्रदीप देशमुख, नगरसेवक शोएब खान ,रहीम शहा, अकबर शा ह ,आशिक अन्सारी ,तसेच विकास घोगरे ,विदर्भकुमार बोबडे ,शिवदास आवले ,कैलास शिरसाट, निलेश ढगे ,विनोद हाडोळे ,विजय दामले ,स्वराज वानखडे, अमजत का, विलास हाडोळे, अनिल जुनगरे, बापूराव बाळापुरे ,अशोकराव इंगळे, उमेश चौखंडे ,राजीव सोनटक्के, रोशन चौधरी, देवानंद टाक ,गजानन आठवले ,असे अनेक काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी सदर घटनेच्या विरोधात घोषणा देवुन व नारेबाजी करून निषेध नोंदवला व माननीय तहसीलदार अंजनगाव सुर्जी यांना निवेदन देऊन आपल्या भावना शासन दरबारी कळविण्याची विनंती केला.

### 'उन्नत भारत अभियान' विषयावर आज कार्यशाळा

**अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील 'प्रादेशिक समन्वय संस्था' आणि 'उन्नत भारत अभियान' यांच्या संयुक्त विद्यमाने व रसायन तंत्रज्ञान विभाग, भूविज्ञान विभाग आणि सहभागी संस्थांच्या सहकार्याने 'विकसित भारता साठी उन्नत भारत अभियान: सामुदायिक उपक्रम' या विषयावर उद्या १३ मार्च रोजी विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्र सभागृह येथे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. समारंभाचे अध्यक्ष स्थान कुलगुरू डॉ.बारहाते भूषविणार आहेत.

## विद्यापीठात दर तीन महिन्यांनी प्रमुखांची बैठक

**अमरावती/ का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या कामकाजात समन्वय राहावा म्हणून सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभाग प्रमुखांची बैठक आता दर तीन महिन्याने होणार आहे. अशी बैठक घेण्यासंदर्भातील प्रस्ताव अधिसभा सदस्य गिरीश शेरेकर यांनी मांडला होता. तो मंजूर करण्यात आला.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची अधिसभा बुधवारी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली झाली. विद्यापीठातील सर्व प्रशासकीय अधिकारी, शैक्षणिक विभागप्रमुख, सर्व अध्यासन व अभ्यासकेंद्र प्रमुख, समन्वयक यांची स्वतंत्र बैठक कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली दर महिन्याचा एक दिवस निश्चित करुन आयेजित करण्यात यावी. या बैठकीमध्ये प्रशासकीय विभागप्रमुखांनी त्यांच्या विभागामध्ये कुठली प्रशासकीय कामे महिन्याभरात केलीत तसेच शैक्षणिक विभाग प्रमुखांनी मागील महिन्यात कोणती शैक्षणिक कामे केलीत आणि अध्यासन व अभ्यासकेंद्रप्रमुख, समन्वयकांनी मागील महिन्यामध्ये केलेल्या कार्याचा आढावा दर महिन्यामध्ये घेण्यात यावा.



**अधिसभेत गिरीश शेरेकर यांचा प्रस्ताव मंजूर**

याशीवाय पुढील महिन्यात कुठले कामे करणार आहोत, याचे सादरीकरण सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख तसेच अध्यासन व अभ्यासकेंद्रप्रमुखांनी करावे. झालेल्या बैठाकांचे कार्यवृत्तांत तयार करावे. यानिमित्ताने प्रशासकीय कामकाजात गती येईल. वेळेवर कामे पुर्ण होतील, असा प्रस्ताव गिरीश शेरेकर यांनी मांडला होता. या प्रस्तावावर चर्चा झाली. कुलगुरूंनी दर महिन्या ऐवजी तर तीन महिन्यात अशी बैठक घेऊ असे निर्देश देऊन हा प्रस्ताव मंजूर केला. या प्रस्तावाचे सर्व सदस्यांनी समर्थन केले.

### शनिवारी भारतीय बौद्ध महासभा पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा

**अमरावती**-भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा अमरावती पूर्व अमरावती पश्चिम ,अमरावती महानगर, समता सैनिक दल व अंतर्गत असलेले सर्व तालुका शाखा द्वारा शनिवार १४ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळात अमरावती येथील संघमित्रा मुलींचे वस्तीगृह त्रिवेणी कॉलनी,काँग्रेस नगर रोड येथे भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा ,तालुका, शहर ,ग्राम शाखा पदाधिकारी समता सैनिक दलाचे पदाधिकारी महिला व पुरुष शाखा तसेच केंद्रीय शिक्षक, केंद्रीय शिक्षिका,बौद्धाचार्य माजी श्रामनेर व आजीवन सभासद या सर्वांची एकत्रित कार्यशाळा आयोजित केली आहे.

कार्यशाळेला मार्गदर्शन करण्यासाठी मुंबईहून संस्थेचे ट्रस्टी व राष्ट्रीय उपाध्यक्ष, मुंबई स्थित केंद्रीय कार्यालयाचे प्रमुख, ॲड.भंडारे,राज्यबोराडे, स्वाती शिंदे , ह्या उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

## मेळघाट संघर्ष महापदयात्रेमुळे अन्यायग्रस्त अखंडे कुटुंबाला न्याय

### पोलिसांकडून ट्रॅक्टरसह ५० हजार रुपये परत

**चिखलदरा/ वार्ताहर**

मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या प्रश्नांसाठी निघाले ल्या बच्चू कडू यांच्या मेळघाट संघर्ष महापदयात्रेमुळे अन्यायग्रस्त कुटुंबाला अखेर न्याय मिळाल्याची घटना बोरूगव्हाण गावात घडली आहे. या घटनेमुळे मेळघाटातील सर्वसामान्यांना आपला हक्काचा आवाज मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

मेळघाटातील बोरूगव्हाण येथील राजेश अखंडे यांनी काही महीन्यांपुर्वी नव्याने ट्रॅक्टर खरेदी केला होता. शेतीच्या कामासाठी ट्रॅक्टर शेतात घेऊन जात असताना गावातील खराब आणि खड्डेमय रस्त्यांमुळे ट्रॅक्टरचा अपघात झाला. या दुर्दैवी अपघातात राजेश अखंडे यांचा जागीच मृत्यू झाला. कुटुंबासाठी आधार असलेल्या राजेश यांच्या मृत्यूमुळे अखंडे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला.



अपघातानंतर पंचनामा करण्यासाठी पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी ट्रॅक्टर जप्त केला. मात्र ट्रॅक्टर परत मिळवण्यासाठी राजेश यांच्या कुटुंबीयांकडून तब्बल ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला. कुटुंबीयांनी मोठ्या कष्टाने ही रक्कम दिली, तरीही त्यांना ट्रॅक्टर परत मिळाला नाही. त्यामुळे आधीच संकटात सापडलेल्या या कुटुंबाची अडचण आणखी वाढली.

या अन्यायाविरोधात अखंडे कुटुंबाने अनेक ठिकाणी मदतीची याचना केली, मात्र कुठूनही त्यांना न्याय मिळाला नाही. अखेर बच्चू कडू यांच्या नेतृत्वात सुरू असलेली मेळघाट संघर्ष महापदयात्रा बोरूगव्हाण गावात पोहोचली असताना राजेश अखंडे यांच्या आईने ही संपूर्ण घटना बच्चू कडू यांच्या कानावर घातली.

ही बाब समजताच बच्चू कडूंनी ती गंभीरतेने घेतली. ९ तारखेला झालेल्या सभेत त्यांनी सर्वांसमोर प्रशासनाला स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, अखंडे कुटुंबाचा ट्रॅक्टर आणि ५० हजार रुपयांची रक्कम तात्काळ परत देण्यात आली नाही, तर चिखलदरा पोलीस स्टेशनवर मोठा मोर्चा काढण्यात येईल. बच्चू कडूंच्या या इशाऱ्यानंतर प्रशासनात खळबळ उडाली. अखेर प्रशासनाने तातडीने कारवाई करत अखंडे कुटुंबाला ट्रॅक्टर परत दिला तसेच घेतलेली ५० हजार रुपयांची रक्कमही परत केली. यावेळी अखंडे कुटुंबीयांनी बच्चू कडू यांचे मनापासून आभार मानले.

## राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धेत राम रोडेला प्रथम क्रमांक



### इन्क्युबेशन सेंटरच्या कार्याचा गौरव

**अमरावती/ का.प्र.**

छत्रपती संभाजीनगर येथील एमआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकत्याच पार पडलेल्या डिपेक्स-२०२६ या राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धेत अमरावती जिल्ह्यातील विद्यार्थी राम रोडे याने उल्लेखनीय यश संपादन करत सेफ्टी थीममध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. त्याच्या या यशामुळे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरचे नाव राज्यभरात उज्ज्वल झाले आहे.

या स्पर्धेची निवड प्रक्रिया तीन टप्प्यांत पार पडली. पहिल्या टप्प्यात विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करून आपल्या प्रकल्पाची माहिती सादर केली. दुस-या टप्प्यात विविध भागांमध्ये प्रादेशिक फेरी घेण्यात आली. त्यानंतर अंतिम फेरीमध्ये सेफ्टी थीम अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रातून राम रोडे व चमूची निवड करण्यात आली. हा प्रकल्प जीपीएस आणि जीएसएम तंत्रज्ञानावर आधारित महिला सुरक्षा उपकरण असून आजच्या युगामध्ये महिला सुरक्षेतेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे यंत्र ठरेल. या उपकरणामध्ये आपात्कालीन परिस्थितीत महिलांना त्वरित मदत मिळावी, यासाठी जीपीएस च्या माध्यमातून अचूक स्थान शोधणे आणि जीएसएम द्वारे कुटुंबीय किंवा पोलिसांना संदेश पाठवण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच स्वसंरक्षणासाठी इलेक्ट्रीक शॉक फिचर देखील या उपकरणामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. या प्रकल्पाची कल्पकता, तांत्रिक रचना आणि समाजोपयोगी स्वरुप लक्षात घेऊन परीक्षकांनी त्यांना सेफ्टी थीममध्ये प्रथम क्रमांक देऊन गौरविले.मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव, बीआयएम अमोल हिरुळकर यांनी प्रकल्पाच्या निर्मितीत तांत्रिक मार्गदर्शन करून सहकार्य केले.

डिपेक्स-२०२६ अंतर्गत शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नवोपक्रम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा वर्मा, आय-हब गुजरातचे मुख्य कार्यकारी अधिकारी हिरण्या महंता यांनी इन्क्युबेशन सेंटरद्वारे विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम, स्टार्टअप्स व उद्योजकता वाढीसाठी केलेल्या कार्याचे विशेष कौतुक केले. या योगदानाबद्दल आनंद यादव व नरेश मोवळे यांनी सन्मानचिन्ह स्वीकारले.

## महिला दिनानिमित्त विद्यार्थिनीसाठी विशेष त्रिसूत्री मार्गदर्शन सत्र

**अमरावती/ का.प्र.**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ अमरावती, नूतन विदर्भ शिक्षण संस्था द्वारा संचालित महिला महाविद्यालय अमरावती तसेच प्रादेशीक परिवहन कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने महिला महाविद्यालय येथे विद्यार्थिनींक रीता वाहतुक नियम व रस्ता सुरक्षा, कार्डियोपल्मोनरी पुनर्जीवन (सीपीआर) तसेच भौतिकोपचार व निसर्गोपचार या विषयांवर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नुतन विदर्भ शिक्षण संस्थेचे सचिव हितेश व्यास तर प्रमुख अतिथी म्हणुन महिला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अंकुश गिरी, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ विदर्भ संपर्कप्रमुख राजेंद्र टाकळकर, मोटार वाहन निरीक्षक, प्रादेशीक परिवहन कार्यालय अमरावती प्रमोद गोटे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक, प्रादेशीक परिवहन कार्यालय अमरावती कांचन जाधव, बाधिकीकरण तज्ञ डॉ. राधा सावदेकर तसेच भौतिकोपचार तज्ञ व संच डॉ. सागर धनोडकर उपस्थित होते.



महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अंकुश गिरी यांनी जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देत कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.सावध रस्ता, सुरक्षित हृदय, सेंद्रिय जीवन या त्रिसूत्री मार्गदर्शन कार्यक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थीनींना बाधिकीकरण तज्ञ डॉ. राधा सावदेकर यांनी हृदय वाचवा, जीव वाचवा (सेव लाईफ, सेव हार्ट) चा संदेश देत कार्डियोपल्मोनरी पुनर्जीवन (सीपीआर) हे कशापद्धतीने जीवन वाचवण्यासाठी महत्त्वाचे माध्यम ठरू शकते हे प्रात्यक्षीक मार्फत प्रस्तुत केले तसेच पॉवर पॉईंट सादरकीरण मार्फत या विषयी उपस्थितांना अवगत केले.

त्यानंतर भौतिकोपचार तज्ञ व संच डॉ. सागर धनोडकर यांनी भौतिकोपचार व निसर्गोपचार या विषयावर बोलतांना आपल्या आरोग्याची काळजी घेणे ही प्रत्येक व्यक्तीची स्वतःची जबाबदारी आहे या गोष्टीवर भर दिला.

कार्यक्रमाच्या दुस-या सत्रात प्रमोद गोटे तसेच कांचन जाधव यांनी रस्ता सुरक्षा व वाहतुक नियम या विषयांवर पॉवर पॉईंट सादरकीरण करून सखोल व सविस्तर मार्गदर्शन केले.रस्ता सुरक्षा व वाहतुक नियम या विषयी प्रश्नमंजुषा स्पर्धा देखील या प्रसंगी घेण्यात आली. सदर स्पर्धेमध्ये अचुक उत्तरे देणा-या विद्यार्थीनींना हेलमेटचे वितरण करण्यात आले. सदर हेलमेट सुरेश भांडारकर यांच्याकडुन मोफत प्राप्त झाले. नूतन विदर्भ शिक्षण संस्था, अमरावती सचिव हितेश व्यास यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात रस्ता सुरक्षा व वाहतुक नियमांचे प्रत्येक नागरिकाने पालन करणे आवश्यक आहे.संचालन महिला महाविद्यालय येथील प्राध्यापिका सोनाली पांडे यांनी केले. अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ अमरावती शहर जिल्हा युवती अध्यक्ष निकीता आदित्य शुक्ला यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.कार्यक्रमात अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ जिल्हा अध्यक्ष डॉ. शशांक दुबे, जिल्हा रेवती देशपांडे, राजेश व्यास, गणेश जोशी गुरूजी, ज्योती शर्मा, शहर कार्यकारी डॉ.एड. नमिता तिवारी, निकीता शुक्ला, शहर मिलींद देशपांडे, शहर दिपक गोगरकर, अंजली पाठक, उपाध्यक्ष स्वाती परांजपे व मीना उपाध्याय, महासचिव सुनिता शर्मा व बबिता शर्मा, संपर्क प्रमुख दिपाली काळे, युवा सचिव राज दुबे, कार्यकारिणी सदस्य राजकुमार तिवारी, श्याम शर्मा, जितेंद्र शर्मा तसेच महिला महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### गॅस सिलेंडर तुटवड्याचा

## एकवीरा देवी महाप्रसादाच्या व्यवस्थेसमोरही आव्हान

**अमरावती/ का.प्र.**

आखाती भागातील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या गॅस तुटवड्याचा परिणाम आता धार्मिक ठिकाणांवरही दिसून येऊ लागला आहे.शहरातील श्री एकवीरा देवी मंदिर संस्थानच्या अन्नछत्रावर या संकटाची छाया पडली असून भक्तांसाठी दिल्या जाणाऱ्या महाप्रसादाच्या व्यवस्थेसमोर आव्हान उभे राहिले आहे.

श्री अंबादेवी आणि श्री एकवीरा देवी मंदिरात दररोज मोठ्या संख्येनं भाविक दर्शनासाठी येतात. दर्शनानंतर अनेक भक्त श्री एकवीरा देवी मंदिर संस्थानच्या अन्नछत्रात महाप्रसाद ग्रहण करतात. या अन्नछत्रात दररोज साधारण हजार ते बाराशे भाविकांना प्रसाद दिला जातो. त्यामुळे स्वयंपाकासाठी मोठ्या प्रमाणावर गॅस सिलेंडरची गरज भासते. महिन्याला साधारण दीडशे ते दोनशे गॅस सिलेंडर लागतात. मात्र, सध्या गॅसचा पुरवठा कमी झाल्यामुळे मंदिर प्रशासनासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.श्री एकवीरा देवी मंदिरात अन्नक्षेत्रात भाविकांना साधं पण पौष्टिक जेवण दिले जाते. या महाप्रसादात डाळभाजी, एक आणखी भाजीसोबतच वरण, भात, पोळी आणि एखादा गोड पदार्थ असा समावेश असतो. अनेक भाविकांसाठी हा प्रसाद केवळ भोजन नसून श्रद्धेचा भाग असतो मोठ्या प्रमाणावर स्वयंपाक होत असल्यानं गॅसचा वापरही मोठ्या प्रमाणात केला जातो.

सिलेंडरचा पुरवठा पूर्वीसारखा होणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यामुळे अन्नछत्रात रोजच्या प्रमाणात स्वयंपाक करणे कठीण होत आहे.

# विद्यार्थ्यांनी अनुभवला तब्बल ८ किलोमीटरचा ॲडव्हेंचर ट्रॅक

## राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अमरावती/ का.प्र.**

महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने दि. ७ ते ११ मार्च दरम्यान चिखलदरा येथील वन प्रशिक्षण संस्था येथे राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराच्या तिसऱ्या दिवशी आयोजित केलेल्या गाविलगड ॲडव्हेंचर ट्रॅक ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला.डॉ. जयंत वडतकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी गाविलगडावर चढाई सुरु केली. यादव काळातील असलेला गाविलगड किल्ल्याबद्दलची माहित्ती जाणून घेण्यात विद्यार्थ्यांमध्ये कमालीची उत्सुकता दिसून आली.साहसिक क्रीडा शिबिराचा एक भाग म्हणून ट्रेकिंग चा समावेश शिबिरात करण्यात येतो.



गाविलगड किल्याचा मछली दरवाज्यातून विद्यार्थ्यांनी प्रवेश केला,त्यांनतर वीरभान द्वारातून प्रवेश करताना त्यांनी अचलपूर येथील नवाब याच्या राजचिन्ह असलेल्या दगडी शिल्पाची पाहणी केली. किल्ल्याच्या शार्दूल दरवाजाव रील कोरीव नक्षीकाम, प्रवेश द्वारावरील टेहळणी बुरुजे पाहून त्या काळातील सुरक्षा व्यवस्थेची माहिती डॉ.जयंत वडतकर यांनी विद्यार्थ्यांना सांगितली.

शिबिरामध्ये राज्यभरातील १९ विद्यापीठातील ९८ विद्यार्थी व १५ संघ व्यवस्थापक सहभागी झाले होते. त्याचबरोबर भारत सरकार युवा व खेल मंत्रालय पुणे रा.से.यो. चे क्षेत्रीय संचालक डॉ. अजय शिंदे यांनी सदर शिबिराला प्रत्यक्ष भेट दिली . आणि ॲडव्हेंचर कॅम्प मध्ये सहभागी होऊन त्यांनी विद्यार्थ्यांचा उत्साह आणखीनच वाढविला. या यासोबतच विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. निलेश कडू,डॉ. जयंत वडतकर,विद्यापीठाचे सोशल मीडिया समन्वयक अनिकेत ठाकरे तसेच पाचही जिल्हांचे रा.से.यो.चे जिल्हा समन्वयक उपस्थित होते.

# अस्थिर होत चाललेले जग आणि भारतासमोरील आव्हाने .....

आजचे जग एका नव्या अस्थिरतेच्या टप्प्यावर उभे आहे. युद्धाचे ढग एका प्रदेशापुरते मर्यादित न राहता जगाच्या विविध भागांत दाटताना दिसत आहेत. युरोपपासून मध्यपूर्वेपर्यंत आणि आशिया–प्रशांत प्रदेशापर्यंत वाढत चाललेले तणाव हे केवळ आंतरराष्ट्रीय राजकारणाचे विषय राहिलेले नाहीत, त्यांचे परिणाम थेट जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा बाजार आणि सामान्य नागरिकांच्या जीवनावरही उमटताना दिसत आहेत.

गेल्या काही वर्षांत जागतिक राजकारण आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीत मोठे बदल झाले आहेत. युद्ध, प्रादेशिक संघर्ष, आर्थिक स्पर्धा आणि राजनैतिक तणाव यामुळे जग अधिक अस्थिर होत चालल्याचे चित्र स्पष्ट दिसू लागले आहे. एका देशातील तणाव किंवा संघर्ष केवळ त्या देशापुरता मर्यादित राहत नाही, त्याचे परिणाम जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा पुरवठा, व्यापार आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षेवरही उमटलेले आपण बघू शकतो. त्यामुळे आजच्या परस्परावलंबी जगात नागरिकांनीही जागतिक घडामोडींचे भान ठेवणे आणि त्यांच्या परिणामांचा व्यापक संदर्भ समजून घेणे अत्यावश्यक झाले आहे.

युरोपमध्ये सुरू असलेला रशिया–युक्रेन संघर्ष हे याचे ठळक उदाहरण आहे. या युद्धामुळे केवळ त्या प्रदेशात मानवी संकट निर्माण झालेले नाही, तर जागतिक अन्नधान्य पुरवठा, ऊर्जा बाजार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवस्थेवरही त्याचे दूरगामी परिणाम झाले आहेत. रशिया आणि युक्रेन हे दोन्ही देश जागतिक धान्य बाजारात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे या युद्धाचा परिणाम अनेक विकसनशील देशांपर्यंत पोहोचला आहे. ऊर्जा पुरवठा आणि धान्य निर्यातीत आलेल्या अडचणींमुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता निर्माण झाली असून अनेक देशांना महागाई आणि पुरवठ्याच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे.

मध्यपूर्वेत देखील इराणवर अमेरिका आणि इस्त्रायलने केलेल्या लष्करी कारवायांमुळे तणाव वाढला असून त्याचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या घटनांमुळे संपूर्ण खाडी प्रदेशातील सुरक्षा परिस्थिती अधिक संवेदनशील झाली आहे. मध्यपूर्व हा जगातील सर्वात महत्त्वाचा तेल उत्पादक प्रदेश असल्याने तेथील कोणतीही अस्थिरता जागतिक ऊर्जा बाजारावर त्वरित परिणाम करते. त्यामुळे या संघर्षामुळे तेलाच्या किमतींमध्ये चढउतार होण्याची शक्यता वाढली असून त्याचा परिणाम भारतासारख्या ऊर्जा आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या देशांवर होऊ शकतो. खाडी प्रदेशातील तणाव वाढल्यास केवळ ऊर्जा बाजारच नव्हे तर आंतरराष्ट्रीय व्यापारमार्ग आणि प्रादेशिक सुरक्षेवरही त्याचे परिणाम होऊ शकतात.

या पार्श्वभूमीवर जागतिक भू-राजकारणातही मोठे बदल घडताना दिसत आहेत. अमेरिका,



चीन, रशिया आणि युरोपियन देशांमधील धोरणात्मक स्पर्धेमुळे जागतिक शक्तिसंतुलन नव्याने आकार घेत आहे. व्यापार, तंत्रज्ञान, संरक्षण आणि सामरिक भागीदारी या क्षेत्रांत वाढती स्पर्धा दिसून येते. या बदलांचा परिणाम आंतरराष्ट्रीय संस्थांवर, व्यापार करारांवर आणि सुरक्षाविषयक धोरणांवर होत आहे.

आशिया-प्रशांत प्रदेशातही सामरिक स्पर्धा अधिक तीव्र होत आहे. समुद्री मार्गांवर नियंत्रण, व्यापार मार्गांचे संरक्षण आणि तांत्रिक तसेच आर्थिक वर्चस्व मिळवण्याच्या प्रयत्नांमुळे या प्रदेशातील आंतरराष्ट्रीय संबंध अधिक संवेदनशील झाले आहेत. परिणामी जागतिक पातळीवरील राजकीय समीकरणे अधिक गुंतागुंतीची होत चालली आहेत. संघर्ष आणि युद्धाचा सर्वाधिक परिणाम अर्थव्यवस्थेवर होतो. युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होते, उत्पादनावर परिणाम होतो आणि जागतिक बाजारपेठेत अनिश्चितता वाढते. ऊर्जा, अन्नधान्य आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील अस्थिरतेमुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांना फटका बसतो. युद्धकाळात संरक्षण खर्च वाढतो, तर विकासासाठी लागणाऱ्या संसाधनांवर मर्यादा येतात. परिणामी जागतिक आर्थिक वाढीचा वेग कमी होण्याची शक्यता निर्माण होते.

या अस्थिर जागतिक परिस्थितीत भारताने संतुलित आणि व्यावहारिक परराष्ट्र धोरण अवलंबण्याचा प्रयत्न केला आहे. विविध देशांशी मैत्रीपूर्ण संबंध राखत असतानाच स्वतःचे राष्ट्रीय हित जपणे हा भारताच्या धोरणाचा महत्त्वाचा आधार आहे. बहुपक्षीय सहकार्य, राजनैतिक संवाद आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये सक्रिय सहभाग यांद्वारे भारत जागतिक पातळीवर आपली भूमिका अधिक प्रभावीपणे मांडत आहे. ऊर्जा सुरक्षा, अन्नसुरक्षा आणि आर्थिक स्थैर्य यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करत भारताने जागतिक बदलांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच जागतिक संघर्षांबाबत संवाद, संयम आणि शांततापूर्ण तोडगा यांवर भर देण्याची भूमिका भारत सातत्याने मांडत आला आहे.

जागतिक परिस्थिती कितीही अस्थिर असली तरी कोणत्याही देशासाठी अंतर्गत स्थैर्य अत्यंत महत्त्वाचे असते. सामाजिक ऐक्य, आर्थिक विकास, मजबूत संस्था आणि लोकशाही मूल्ये या घटकांमुळे देशाला दीर्घकालीन स्थैर्य प्राप्त होते. भारतासारख्या मोठ्या लोकशाही देशात विविधता आणि मतभिन्नता ही स्वाभाविक बाब आहे. लोकशाहीत चर्चा, टीका आणि मतभेद यांना स्थान असते. मात्र त्याचवेळी राष्ट्रीय हित, सामाजिक समन्वय आणि परस्पर आदर या मूल्यांची जाणीव ठेवणे तेवढेच आवश्यक आहे.

या संदर्भात नागरिकांची भूमिकाही महत्त्वाची ठरते. आजच्या डिजिटल युगात माहितीचा प्रसार अत्यंत वेगाने होत आहे. सोशल मीडियामुळे जगातील घटना काही क्षणांत आपल्या मोबाईलपर्यंत पोहोचतात. परंतु याच माध्यमातून अपूर्ण, दिशाभूल करणारी किंवा अफवांवर आधारित माहितीही वाऱ्याच्या वेगाने पसरते. अनेकदा अशा अफवांमुळे समाजात संभ्रम, भीती आणि अनावश्यक तणाव निर्माण होतो. त्यामुळे कोणतीही माहिती पुढे पाठवण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. विश्वसनीय स्रोतांमधून माहिती घेणे आणि घटनांकडे वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून पाहणे हे आजच्या काळातील सजग नागरिकत्वाचे लक्षण ठरते.

आजचे जग वेगाने बदलत आहे आणि अनेक गुंतागुंतीच्या आव्हानांना सामोरे जात आहे. युद्ध, आर्थिक स्पर्धा आणि भू-राजकीय तणाव यामुळे जागतिक परिस्थिती अधिक संवेदनशील बनली आहे. अशा वेळी भारतासाठी आर्थिक स्थैर्य, सामाजिक एकात्मता आणि संतुलित परराष्ट्र धोरण टिकवून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु यासोबतच जागरूक, माहितीपूर्ण आणि जबाबदार नागरिकत्व हीदेखील तितकीच महत्त्वाची गोष्ट आहे. कारण बदलत्या जागतिक परिस्थितीत राष्ट्राची ताकद केवळ त्याच्या अर्थव्यवस्थेत किंवा लष्करी सामर्थ्यात नसते, ती त्या समाजाच्या जागरूकतेत, संयमात आणि विवेकबुद्धीतही दडलेली असते.

**श्रीपाद टेंबे**
मो. ९१५८०८८०४२
shripad.tembe@gmail.com

# क्रिकेट आणि सट्टा

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात टी-२० विश्वचषकाचा अंतिम सामना अहमदाबाद गुजरात येथे झाला. भारत विश्वविजेता ठरला ही अभिमानाची गोष्ट आहे. या सामन्यात विजेता, उपविजेता संघाला, खेळाडूंना आणि क्रिकेट बोर्डाला हजारो रुपये मिळाले पण त्याचवेळी अनेक जणांना आर्थिक फटका बसला. या सामन्यासाठी अंदाजे दहा हजार कोटी रुपयांचा सट्टा लावला गेल्याचे एका प्रथितयश दैनिकाने प्रसिद्ध केले आहे.



सट्टा लावण्यास भारतात बंदी आहे पण भारताबाहेर सट्टा लावणारे बुक्की सट्टा लावून पैशाचा व्यवहार करतात. भारतीय क्रिकेटच्या विश्वात यापूर्वीही सट्टेबाजी ची अनेक प्रकरणे उघडकीस आली आहेत याचे कारण म्हणजे सर्व वयोगटांमध्ये असलेले क्रिकेटचे वेड. महिला संघ निर्माण झाल्यामुळे तरुणी - महिला यांच्यातही हे वेड वाढल्याचे दिसून येते. भारतीय संघाचा कोणताही सामना हा मैदानावर जाऊन, टीव्ही, मोबाईलवर पाहिला जातो. या वेड्याचा अपलाभ सट्टा लावणारे बुक्की घेतात आणि मोठ्या रकमांची अमिषे दाखवून सर्वांना या गैरप्रकारात ओढतात.

प्रत्यक्ष प्रक्षेपण आणि टीव्ही, मोबाईलवर ते दिसणे यात असलेल्या काही सेकंदांचा फरक हेरला जातो आणि त्यानुसार सट्टा लावला जातो. या गैरप्रकाराची रचनाच अशी केलेली असते की अधिकाधिक लोक हरतात, लाखो रुपये काही सेकंदांमध्येच गमवतात. हा सट्टेबाजीचा भुलभूल्लेया व्यसनाप्रमाणे लोकांना पछाडतो आणि पोखरतो परिणामी कर्जबाजारीपणा, निराशा आणि आत्महत्या पर्यंत याचा परिणाम दिसतो. सट्टेबाज आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेत 'क्लोज सर्किट ॲप्स' 'पासवर्ड प्रोटेक्टेड' संकेतस्थळे आणि 'पीच स्लाइडिंग' यासारख्या क्लुप्त्या वापरून सर्वसामान्यांची लूट करतात.व्यवहारांसाठी हवाला आणि क्रिप्टो करन्सीचा चलनाचा वापर होत असल्याने अन्वेषण यंत्रणानाही चकवा देणे सहज सोपे झाले आहे.आणखीन महत्त्वाचे म्हणजे येणारे आणि जाणारे पैसे विविध खात्यात खोटी खाती उघडून त्याद्वारे व्यवहार केला जात असल्याने तेही पकडले जात नाही. क्रिकेट हा आवडीचा आणि जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे सहज अनुमान वर्तवू शकतो आणि एक मोठी रक्कम पदरात पाडून घेऊ शकतो असा आशावाद असल्याने लोक पैसे लावतात आणि फसतात.

क्रिकेटच्या नावाखाली चालणाऱ्या या डिजिटल जुगारमुळे किती जणांचे आयुष्य आणि भविष्य उध्वस्त होत आहे . सट्टेबाजीचा हा भयानक प्रकार,होणाऱ्या व्यवहारांचे डोळे दीपवणारी आकडेवार,आर्थिक उलाढाल,वाढता सहभाग त्यातून मन:स्वास्थ्या वर होणारा विपरीत परिणाम, असुरक्षितता,असहाय्यता यासाठी कठोर पावले उचलणे गरजेचे आहे. ह्यात सहभागी होणारे खेळाडू,बुक्की ह्यांच्यावर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. क्रिकेटच्या जगतातील सट्टा बाजार केवळ व्यसनच नाहीतर तो खेळ आणि देश यांना अपकीर्त करणारा आहे.

**लीना गाडगीळ**

# मुज्तबा खामेनी यांच्यासमोरील आव्हाने !

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा अमेरिका-इस्त्रायल यांनी संयुक्तपणे केलेल्या बॉम्ब हल्ल्यात मृत्यू झाल्यानंतर, त्यांच्याजागी त्यांचे सुपुत्र मुज्तबा खामेनी यांची निवड करण्यात आली आहे.इराणच्या ॲसेंब्ली ऑफ एक्सपर्ट्सने मुज्तबा खामेनी यांची सुप्रीम लिडर पदावर नियुक्ती केली आहे.ॲसेंब्ली ऑफ एक्सपर्ट्स म्हणजे तज्ञांची सभा, ही इराणमधील एक अतिशय महत्त्वाची घटनात्मक संस्था आहे.ही ८८ सदस्यांची संस्था असून यामध्ये उच्च दर्जाच्या धार्मिक विद्वानांचा समावेश आहे.या सभेचे मुख्य काम इराणच्या सर्वोच्च नेत्याची निवड करणे हे आहे.सर्वोच्च नेता आपल काम योग्य रितीने करत आहे की नाही यावर ही सभा लक्ष ठेवते.या सभेचे सदस्य इराणच्या जनतेद्वारे थेट मतदानाने निवडले जातात.१९७९ साली इराणच्या शहाची सत्ता उलथवून, त्याजागी अयातुल्ला रुहोल्लाह खोमेनी यांच्या नेतृत्वाखालील इस्लामिक क्रांतीकारी राजवट अस्तित्वात आली.या राजवटीचे सुप्रीम लिडर,अयातुल्ला रुहोल्लाह खोमेनी यांचे १९८९ साली निधन झाल्यानंतर, त्यांच्याजागी,अली खामेनी यांची निवड करण्यात आली.अयातुल्ला अली खामेनी यांनी गेली ३६ वर्षे इराणवर निर्धोकपणे राज्य केले.त्या दरम्यान खामेनी राजवटीच्या दडपशाही विरोधात, इराणमध्ये जी जनआंदोलने झाली,ती पाशवी बळाचा वापर करून चिरडण्यात आली.



वयाच्या सतराव्या वर्षी,मुज्तबा खामेनी हे सैन्यात भरती झाले.सैन्यातील हबीब बटालियनमध्ये त्यांचा समावेश करण्यात आला.इराण- इराक युद्धात, त्यांनी भाग घेतला.त्यानंतर ते आपले वडील,अयातुल्ला अली खामेनी यांच्या कार्यालयात काम करु लागले.मात्र त्यांनी कोणतेही राजकीय पद स्वीकारले नाही.ते सार्वजनिक ठिकाणी फारसे न दिसल्याने, इराणमधील जनतेला ते तितकेसे माहीत नव्हते.मात्र पडद्याआडून ते प्रशासनाची सर्व सूत्रे हलवत असल्याचे, त्यावेळी बोलले जात होते.इस्लामीक रिव्हॉल्युशनरी गार्डस कॉर्प्स (आयआरजीसी ) या सर्वशक्तिमान संघटनेशी त्यांचे निकटचे संबंध होते.ही संघटना इराणी लष्कराला समांतर असल्याने या संघटनेचा इराणमध्ये सर्वत्र दबदबा आहे.इराणमधील लोकशाहीवाद्यांची आंदोलने निर्दयपणे चिरडून टाकण्यात या संघटनेचा प्रमुख सहभाग राहिला आहे.अयातुल्ला अली खामेनी यांचा बॉम्ब हल्ल्यात मृत्यू झाल्यानंतर,त्यांच्या जागी,मुज्तबा खामेनी यांची वर्णी लावण्यासाठी इस्लामीक रिव्हॉल्युशनरी गार्डस कॉर्प्स या संघटनेने दबाव आणल्याची चर्चा आहे.

मुज्तबा खामेनी हे विशेष चर्चेत आले ते २००५ साली इराणमध्ये झालेल्या अध्यक्षीय निवडणुकीत.या निवडणुकीत महमूद अहमदिनेजाद हे इराणच्या अध्यक्षपदी निवडून आले होते.अहमदिनेजाद यांना निवडून आणण्यासाठी मुज्तबा खामेनी यांनी मतदारांना पैसे वाटल्याचा आरोप तेंव्हा करण्यात आला होता.२००९ मध्ये अहमदिनेजाद हे पुन्हा एकदा इराणच्या अध्यक्षपदी निवडून आले.त्यावेळीही मुज्तबा खामेनी यांनी निवडणुकीत गैरप्रकार केल्याचा आरोप त्यावेळी करण्यात आला होता.त्याचा निषेध म्हणून इराणमध्ये तिव्र जनआंदोलन करण्यात आले होते.मात्र ते आंदोलन पाशवी बळाचा वापर करून चिरडण्यात आले होते. मुज्तबा खामेनी हे इराणचे तिसरे सर्वोच्च नेते आहेत.त्यांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर, त्याजागी मुज्तबा खामेनी यांची निवड करण्यात आल्याने त्यांच्यावर घराणेशाहीचा आरोप करण्यात येत आहे.सर्वोच्च नेतेपदी मुज्तबा खामेनी यांची निवड झाल्यानंतर ते कुठेही सार्वजनिक ठिकाणी दिसलेले नाहीत.त्यांनी इराणच्या जनतेला उद्देशून भाषण केलेले नाही.त्यांनी कुणालाही मुलाखत दिलेली नाही.त्यांनी पत्रकार परिषद घेतलेली नाही, त्यामुळे त्यांच्या बाबत संशयास्पद वातावरण निर्माण झाले आहे.सध्या इराण विरुद्ध सुरू असलेल्या युद्धात ते जखमी झाल्याचे बोलले जात आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी त्यांच्या संमतीशिवाय इराणच्या सर्वोच्च नेत्याची निवड केल्याबद्दल आक्षेप घेतला आहे.मुज्तबा खामेनी यांची सर्वोच्चपदी केलेली निवड आपल्याला मान्य नसल्याचे विधान डोनाल्ड ट्रंप यांनी केले आहे.तर हा आमचा अंतर्गत मामला असून, त्यासाठी डोनाल्ड ट्रंप यांच्या संमतीची गरज नाही,असे इराणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.इराणचे सर्वोच्च नेते म्हणून मुज्तबा खामेनी यांच्या समोर बरीच आव्हाने आहेत.अमेरिका आणि इस्त्रायल यांच्या बॉंब हल्ल्यांमुळे इराणचे अपरिमित नुकसान झाले आहे.महागाईने उच्चांक गाठला आहे.मुज्तबा खामेनी यांच्या निवडीचे इराणमधील जनतेने सर्वसाधारणपणे स्वागत केले असले तरी त्यांना विरोध करणाऱ्या लोकांची संख्या कमी नाही.इराणने कतार,बहारीन,सौदी अरेबिया इत्यादी ठिकाणी असलेल्या अमेरिकन तळांवर हल्ले केल्यामुळे हे देश,इराणवर नाराज आहेत.युध्द लवकरात लवकर थांबले नाही तर त्याची सर्वात मोठी झळ इराणलाच बसणार आहे.अशा कठीण परिस्थितीत मुज्तबा खामेनी हे आपल्या समोरील आव्हानांचा कसा सामना करतात ते पहावे लागेल.

**अभय गोखले**

# 'द व्हलचर अँड लिटिल गर्ल'

**एक टक नाटक**

**समीक्षण**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत ७१ वा. प्राथमिक नाट्यमहोत्सव स्व. भाऊसाहेब लिमये सभागृह सिपना कॉलेज, अमरावती येथे गणेश बन्सी वानखेडे लिखित 'द व्हलचर अँड लिटिल गर्ल' या नाटकाचा प्रयोग झाला.

विस्कटलेल्या पुस्तकांच्या पसाऱ्यात बंगाली सदरा परीधान केलेला, प्रथमदर्शि भूमिकेतील गजबजलेल्या आवाजाने त्रस्त थांबवा!थांबवा!! करीत संवादाचे प्रसारण करणारा, तो एक मनोरुग्ण असावा; अशा अंदाजात नाटकाची सुरुवात होते.सोबतीला दुसरे पात्र सेम पोशाखात संवादाची देवाण घेवाण करायला सुरुवात झाली. अकल्पित घटनांच्या आणि काही घटित प्रसंगाच्या उजळणीने नाटकाची दिशा ठरवत हिंदी जुनाट गीतांचा पार्श्वसंगीत म्हणून प्यासा चित्रपटाचे गीत ऐकवत दुसरे डॉक्टरची चारित्र्य रेखा उमटवत मेंदू विक्रीपासून तर त्यामेंदुतील विचार,व्यक्तींच्या परिचयातून गुणधर्मापर्यंत संवाद उकलत जातात.

नेपथ्यात काळ्या पडद्यावर न्यायमूर्ती लिहून प्रस्थापित न्यायदेवतेचे चित्र आणि



अवतीभोवती दैनिक वृत्तपत्रे चिटकवलेले होते.पुस्तकाचे आडवे-तिडवे पडलेले चित्र मंचावर दाखवत नाटकाचे सर्व अंग उजेडात आणि पार्श्वध्वनीत सादर होत असल्याचे दिसले. सूर्यपहिलेला माणूस!या नाटकाचे स्मरण नाटकात असलेल्या संवादातील आशयाने जाणवत होते. कल्पनेच्या शृंखालेला उजाळ करण्याच्या थाटात ह्या नाटकाचा प्रवास उत्तम पाठांतर आणि संवाद फेक दोन पात्र खेळत होते. गिधाडांची नजर, रक्तशोषीत जमातीचे प्रतीक. कधी लेखक, कधी डॉक्टर,कधी द्रौपदीची स्त्री भूमिका साकारणारा पुरुष,मनविभ्रम विकार झालेला मनोरुग्ण, डबल आचार्य असलेला प्राध्यापक, वशिलाची बाजू घेणारा वकील(ज्येष्ठ), अर्धनारी नटेश्वर,अपराधी. अशा विविध भूमिकांचा संच मंचावर दोन व्यक्ती मांडणाऱ्या होत्या.

लेखनाला या नाटकात कल्पना विस्तार करताना भारतीय इतिहास सोबत पुराणातील महाभारत आणि त्यातील द्रौपदीची भूमिका आणि रामायणातील बिभीषणचे चारित्र सांगताना त्यांच्याकडून घडलेल्या घटना ह्या कुठल्या मूल्यांवर मोजायचे अशा प्रश्नांकीत संवादाने नाटकाचा प्रवास सुरू.

कल्पनांच्या जोडीला ॲब्स्ट्रॅक्ट सोबत इझम मांडत लेखक नाटकाची दिशा ठरवताना, त्याने दिलेले शीर्षक संपूर्ण नाटक बघताना प्रेक्षकांना शोधावे लागले.दक्षिण आफ्रिकतेतील भूकबळी आणि दुष्काळाचे चित्र दाखवणाऱ्या, फोटोग्राफरचे (केविन कार्टर) नामोल्लेख नाटकात झाल्यावर, त्याची रहस्यफोड कथानकात करताना आत्महत्या ते उपोषण. अशा विविध संदर्भात 'मन की बात' पर्यंत आणि संविधानातील 'फ्रीडम ऑफ स्पीच' पर्यंत लेखक संवाद उमटवत असताना, नाटका चा शीर्षकासोबत संबंध जोडताना साफसेल फेल तर नाही ठरला! असा भास झाल्यावर नाटकातील बारकावे उजेड आणि संगीत यांनी सांभाळले. तसेच दोन्ही पात्र एकमेकांच्या अभिनयाची जुगलबंदी दाखवत हे नाटक ॲब्स्ट्रॅक्ट आहे,याची जाणीव करावी लागली.त्यानंतर या नाटकाला बघताना लेखकाने दिग्दर्शकाचे काम सोपे केले.मात्र संहितेला घडवताना लेखकाचे अध्ययन माहितीपर होते, एवढेच दिसून आल्यावर,त्यात दिग्दर्शकाला अभिनय,मंच व संवाद बसवायला पुरेसे(कमी)होतें.कारण हे दोन अंकी नाटक वेळेच्या आत संपणारे होते. त्यामुळे विस्तारण्याचे प्रयोग खोलीतील स्क्रीझोफिनिया पेशंटचेवतीने करता आले असते.या जागेत 'हॉरर सीन' उभा करण्याची जागा होती.पेशंटचा चेहरा आणि त्याचे हाताची बोटे हावभाव दाखवणारी होती. दोन्ही पात्र समान गतीने असताना दुसरा कलावंत प्रत्येक भूमिकेला स्पर्श करून अभिनयात घुसण्याचा पूर्ण प्रयत्न करताना या नाटकाचा ताण कमी झालेला दिसला.

युद्ध, दुष्काळ, हिंसाचाराची भयाण दृश्य आपल्या कॅमेरात काढणारा केविन कार्टर मनावर मोठा ताण येऊन वयाच्या तेहतिसव्या वयात मानवी संवेदनशीलतेच्या भावनेत स्वतःला संपतो.कारण त्याने काढलेल्या भूक बळीच्या चित्रात मुलगी ऐवजी ते मूल असत असे संशोधनात व्यक्त होते.पुरस्कार मिळवणारा फोटोग्राफर केविन आणि फोटोतील गिधाडे यांच्या संवेदनाची माणसात माणुसकी शोधणारे नाटक मांडण्याच्या प्रयत्नात लेखकाला तोडीचे कलावंत मिळाले.

माणसाच्या शोधात असलेले कथानक ॲब्स्ट्रॅक्ट जातीचे नाटक म्हणून कुठे तरी ओढून ताणून वेळ जुळवण्याचा प्रयत्न ही टिपल्या गेला.संगीतात शंख नाद हा रेल्वे सायरन तर नगरे हे रेल्वे ट्रॅक्ट चा भास करून देत घंट्या मात्र गंगा आरती ची चुणूक दर्शवत होते.या नाटकाला शिखर बिंदू निश्चित करताना क[…] आधारातून वास्तवतेचे […] त्यात वादाचा दुर्वास[…] होता.

नेपथ्य स्वयं लेखक[…] बन्सी वानखेडे यांचे होते[…] तुषार सोरगिवकर यांनी […] तर उजेडपाडे सौरभ […] होते.एकाच सदरा व ना[…] च्या कॉस्टुम मध्ये […] रामदास काळे अभिनय[…] होते.तर सत्यम किरकिटे […] पूर्ण करून थोडे लवचि[…] नाही अशा अभिनयात[…] होते.नाटक बघायला



दर्शक स्तब्ध बसवून ठेवल्याचे दिग्दर्शक अरविंद वानखेडे यांनी ऑब्झर्व केले असले तरी कुठे तरी ताण कमी करण्याचा प्रयत्न राहून गेल्याची एक टक नाटक बघताना सूचना समीक्षककर्मी बाकी आहे.

**कबीर फादर**
मो.७७९८६४४५६५

# रोहित्राची तोड फोड करून विद्युत साहित्य चोरी

## टाकळी–खेट्री परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ; शेतकऱ्यांमध्ये संताप

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील चान्नी पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या टाकळी–खेट्री परिसरात अज्ञात चोरट्यांनी रोहित्राची तोडफोड करून लाखो रुपयांचे विद्युत साहित्य लंपास केल्याची घटना गुरुवारी (१२ मार्च) सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, टाकळी–खेट्री परिसरातील शेतकऱ्यांना वीजपुरवठा करणाऱ्या रोहित्रावर अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास धाड टाकली. रोहित्राची तोडफोड करून त्यातील महत्त्वाचे विद्युत साहित्य चोरी करून चोरटे पसार झाले. या घटनेत लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, या परिसरात यापूर्वीही कृषी मोटार पंप, विद्युत वायर आदी साहित्य चोरीच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे एकाच टोळीचा



या चोरींमध्ये हात असण्याची शक्यता शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. रोहित्रामध्ये विद्युत शॉकचा धोका असतानाही चोरी करण्यात आली असल्याने विद्युत यंत्रणेची माहिती असलेल्या व्यक्तींनीच ही चोरी केल्याचा संशयही व्यक्त होत आहे.

या प्रकरणी महावितरण विभागाच्या कनिष्ठ अभियंत्यांकडून चान्नी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पोलिसांनी या चोरीमागील टोळीचा तातडीने शोध घेऊन आरोपींना जेरबंद करावे, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

**विद्युत पुरवठा खंडित; शेतकरी अडचणीत**

रोहित्राची तोडफोड करून विद्युत साहित्य चोरी केल्यामुळे परिसरातील वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे. परिणामी शेतकऱ्यांना पिकांना पाणी देणे कठीण झाले असून शेतीकामांवर त्याचा परिणाम होत आहे. महावितरण विभागाने तातडीने नवीन रोहित्र बसवून वीजपुरवठा सुरळीत करावा, तसेच पोलिसांनी आरोपींना लवकरात लवकर अटक करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# जन्म–मृत्यू दाखल्यांमध्ये विलंब

## मनपाच्या तीन कर्मचा–यांच्या निलंबनाचे आदेश



**- स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांचा संताप**
**- गैरवापर, टाळाटाळीवर प्रशासनाला फटकार**

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यू विभागातील ढिसाळ कारभारावर स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी गुरुवारी जोरदार नाराजी व्यक्त करत तीन कर्मचाऱ्यांच्या निलंबनाची कारवाई करण्याचे आदेश प्रशासनाला दिले. नागरिकांना जन्म-मृत्यू दाखले मिळण्यासाठी होत असलेला विलंब, टाळाटाळ व गैरव्यवहाराच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई सुचविण्यात आली.

नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत असल्याने मनपात गुरुवारी विशेष आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस महापौर शारदा रणजीत खेडकर, आयुक्त डॉ. सुनिल लहाने, उपमहापौर अमोल गोगे, सभागृहनेते पवन महल्ले यांच्यासह पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत जन्म-मृत्यू विभागातील कामकाजाचा सविस्तर आढावा घेताना अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. सीआरएस पोर्टलवर नोंदी उपलब्ध असतानाही नागरिकांना तातडीने दाखले देण्याऐवजी महिनाभराची मुदत दिली जात असल्याचे उघड झाले. तसेच काही प्रकरणांत संबंधित नोंदी रजिस्टरमध्ये उपलब्ध नसतानाही त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले असतानाही कर्मचारी त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास आले.

यावेळी सभापती अग्रवाल यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना जाब विचारला असता समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. त्यामुळे विभागातील निष्काळजीपणा स्पष्ट झाल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, काही महिन्यांपूर्वी निबंधक म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. मनीषा बोरेकर यांच्या नावाचे व स्वाक्षरीचे टोकन नागरिकांना देण्यात येत असल्याचेही उघड झाले. त्या सध्या कार्यरत नसतानाही त्यांच्या नावाचा वापर होत असल्याने गंभीर प्रकार समोर आला असून त्याची चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले.

या पार्श्वभूमीवर जन्म-मृत्यू विभागातील देवानंद तायडे, श्रीमती जामनीक आणि शरद डोंगरे यांच्यावर तातडीने प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करून त्यांना निलंबित करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश देण्यात आले.

तसेच डॉ. फवाज खान (कंत्राटी वैद्यकीय अधिकारी) व शेख सरफराज (लिपीक) यांच्याविरोधात नागरिक व नगरसेवकांकडून उध्दट वागणुकीच्या वारंवार तक्रारी येत असल्याने त्यांची चौकशी करून त्यांची बदली डम्पिंग ग्राऊंड किंवा कोंडवाडा विभागात करण्याचे निर्देशही सभापती अग्रवाल यांनी प्रशासनाला दिले.

बैठकीला नगरसेवक सिद्धार्थ उपरवट, संदीप शेगोकार, उपायुक्त विजय पारतवार, सामाजिक कार्यकर्ते रणजीत खेडकर, अफसर कुरेशी, संदीप गावंडे, किशोर वरोकार, मोहम्मद इलियास, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. रुची पहूरकर तसेच जन्म-मृत्यू विभागातील कर्मचारी उपस्थित होते. नागरिकांना अत्यावश्यक असलेल्या जन्म-मृत्यू दाखल्यांच्या प्रक्रियेत कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही, असा इशाराही यावेळी स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी दिला.

# लोकसेवा हक्क अधिनियमाबाबत अकोला पोलीस दलाची कार्यशाळा

## राज्य आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी केले मार्गदर्शन



■ प्रतिनिधी | अकोला ■

नागरिकांना शासकीय सेवा निश्चित कालावधीत उपलब्ध व्हाव्यात आणि प्रशासन अधिक पारदर्शक व उत्तरदायी व्हावे या उद्देशाने अकोला पोलीस दलाच्या वतीने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ विषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा गुरुवारी (दि. १२) पोलीस अधीक्षक कार्यालयातील विजय सभागृहात उत्साहात पार पडली.

कार्यशाळेला प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी त्यांनी प्रास्ताविकातून अकोला पोलीस दलाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रोजेक्ट रक्षा अंतर्गत आतापर्यंत ८८०२ नागरिकांनी अभिप्राय नोंदविल्याचे सांगत, नागरिकांशी संवाद वाढविण्यासाठी व सेवा सुलभ करण्यासाठी पोलीस विभागाकडून चॅटबॉटसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ऑनलाईन पद्धतीने विविध सेवा व माहिती एका क्लिकवर उपलब्ध होत असल्याची माहितीही त्यांनी पीपीटीच्या माध्यमातून सादर केली.

कार्यशाळेत राज्य लोकसेवा हक्क आयोग, अमरावती विभागाचे राज्य आयुक्त डॉ. किरण जाधव (भा.पो.से. सेनि.) यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. ई-सेवा प्रणालीमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल अकोला जिल्ह्याची निवड झाल्याने त्यांनी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांचे विशेष अभिनंदन केले तसेच अकोला पोलीस दलाच्या कार्यपद्धतीचे कौतुकही व्यक्त केले.

मार्गदर्शन करताना डॉ. जाधव यांनी सांगितले की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ हा कायदा नागरिकांना विविध शासकीय सेवा निश्चित कालावधीत मिळाव्यात यासाठी तयार करण्यात आला आहे. या कायद्यामुळे शासकीय कार्यालयांना वेळेत सेवा देण्याची कायदेशीर जबाबदारी येते. प्रशासनातील विलंब कमी करणे, पारदर्शकता वाढविणे आणि भ्रष्टाचाराला आळा घालणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच सेवा वेळेत न मिळाल्यास नागरिकांना तक्रार दाखल करण्याचा व अपील करण्याचा अधिकारही या कायद्याने प्रदान केला आहे, असेही त्यांनी सांगितले.

नागरिकांना विविध शासकीय सेवांसाठी आपले सरकार सेवा केंद्र (CSC), संबंधित शासकीय कार्यालय किंवा 'आपले सरकार' पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाईन अर्ज करता येतो. या कायद्यामुळे नागरिकांचे हक्क अधिक बळकट होत असून प्रशासनात पारदर्शकता वाढण्यास मदत होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यानंतर उपस्थित मान्यवरांनी पोलीस अधीक्षक कार्यालयातील विविध शाखांची पाहणी करून कामकाजाबाबत माहिती घेतली. कार्यशाळेस राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे उपसचिव डॉ. देवेंद्र चव्हाण, अकोला जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, विविध शाखांचे अधिकारी तसेच सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मार्गदर्शन कार्यशाळेमुळे पोलीस विभागातील अधिकाऱ्यांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाबाबत सखोल माहिती मिळाली असून प्रशासन अधिक पारदर्शक व नागरिकाभिमुख करण्यास या उपक्रमाची महत्त्वपूर्ण मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पोलीस निरीक्षक गजानन धंदर यांनी केले.

# मुरूमाची अवैध वाहतूक उघड; ट्रॅक्टर जप्त



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील दिग्रस बु. परिसरात सुरू असलेल्या मुरूमाच्या अवैध वाहतुकीवर महसूल विभागाने कारवाई करत एक ट्रॅक्टर जप्त केला. एक ब्रास मुरूमाने भरलेला ट्रॅक्टर पकडून तो चान्नी पोलीस ठाण्यात जमा करण्यात आला. ही कारवाई १२ मार्च रोजी करण्यात आली.

दिग्रस बु. परिसरात ट्रॅक्टरद्वारे अवैधरीत्या मुरूमाची वाहतूक होत असल्याची माहिती महसूल पथकाला मिळाली होती. त्यानुसार पातूर महसूल विभागाने तपासणी मोहीम राबविली असता एक ट्रॅक्टर मुरूमाने भरलेला आढळून आला. संबंधित वाहनाकडे कोणतेही अधिकृत परवाने नसल्याचे निदर्शनास आल्याने महसूल पथकाने ट्रॅक्टर जप्त केला. सदर कारवाई पातूरचे तहसीलदार राहुल वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. नायब तहसीलदार खंदारे, सस्ती मंडळ अधिकारी एन. आर. बडेरे, ग्राम महसूल अधिकारी डी. के. देशमुख, धम्मपाल नकाशे, अमित सबनीस तसेच महसूल सेवक कपिल ताले व सचिन गवळी यांच्या पथकाने ही संयुक्त कारवाई केली. दंडात्मक कारवाई पूर्ण होईपर्यंत जप्त करण्यात आलेला मुरूमाने भरलेला ट्रॅक्टर चान्नी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला असून, संबंधितांवर लवकरच महसूल विभागाकडून दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार राहुल वानखेडे यांनी दिली.

**Change In Name**

Passport no F6754355I have change my name MOHD JILANI MOHD HANIF
TO
MOHAMMAD JILANI MOHAMMAD HANIF
My Residential Address is Behind khatri traders kagdipura subhash road Akola 444001

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २४/२०२६ — प्रोसेस नं.२२४/२०२६
चौ.ता. ३०/०३/२०२६ — दिनांक : १६/०२/२०२६

**अर्जदार :** १. आशा प्रकाश इंगळे वय ४६ वर्ष धंदा-घरकाम २. संस्कृती प्रकाश इंगळे वय १८ वर्ष धंदा-शिक्षण ३- मोहित प्रकाश इंगळे वय २२ वर्ष धंदा-शिक्षण नं. १ ते ३ रा. गुरुवार पेठ आठवडी बाजार पातुर ता. पातुर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रकाश श्रीराम इंगळे
**पत्ता :-** रा. पातुर ता. पातुर जि. अकोला

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. त्यांनी अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मयत प्रकाश श्रीराम इंगळे यांचे दिनांक ०२/०३/२०२५ रोजी पातुर ता. पातुर जि.अकोला येथे निधन झाले.

अर्जामध्ये पुढे असेही नमुद आहे की, सद मयत प्रकाश श्रीराम इंगळे यांचे नावे पातुर येथील पोष्टा मध्ये Postal account no. येथे बचत खाते क्रमांक २३१९८२३६९१ या क्रमांकाचे खाते असून सदर खात्यामध्ये रु. १०,९१,०००/- व त्यावरील व्याज जमा आहे. सद रकमेचा लाभ मिळण्याकरीता उपरोक्त अर्जदाराने उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळणेसाठी उपरलिखित अर्ज केला आहे. अर्जामध्ये पुढे असेही नमुद केले आहे की, वरील अर्जदार यांचे शिवाय मयतास कोणीही उत्तराधिकारी नाही. सबब, उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे करीता अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक:- १६/०२/२०२६
पातुर

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार १) सौ. मोनिका पंकज सातपुते, २) श्री. पंकज श्रीराम सातपुते दोन्ही रा. साई सदन प्रसाद कॉलनी, जठारपेठ, अकोला, ता. जि. अकोला यांनी फ्लॅट विकत घेण्याचा सौदा केलेला आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे :

मौजे मलकापूर, जि.प. पं.स. र.स.डी. र.डी. अकोला महानगर पालिका अकोला (पुर्वीचे ग्रामपंचायत मलकापूर) चे हद्दीतील शेत सर्व्हे नं. १२ च्या जमिनीचे वि.एस.डि.ओ. साहेब, अकोला यांचे फाईलवरील रे.के.नं.८/२/१९६४-६५ आदेश पारीत दि.३०.१०.१९६५ मंजूर झालेल्या लेआउट मधील लेआउट प्लॉट नं. ५३ चे एकूण क्षेत्रफळ ५५३.९० चौ.मीटर त्याचे मोजमाप, पुर्वेस पश्चिम ८० फुट (२४.३९ मीटर), उत्तर दक्षिण ७५ फुट (२२.८६ मीटर), ज्याचे एकूण क्षेत्रफळ ५९६० चौ. फु. (५५३.९० चौ.मी.) त्यास चतु:सिमा : पुर्वेस सर्व्हिस लाईन, पश्चिमेस : ३० फुट सरकारी रोड, उत्तरेस : सरकारी रोड, दक्षिणेस प्लॉट नं. ५२. येणेप्रमाणे वरील चर्तु:सिमेतील वरील वर्णनाचा लेआऊट प्लॉट क्र. ५३ वर म.न.पा. अकोला ची विकास परवानगी आदेश प्रकरण क्र. १४/९९/२००२-०३ दि. २९.०७.२००३ नुसार बाधकांम परवानगी घेवून 'महाराजा विहार' या नावाने बांधलेल्या इमारतीमधील तळ माळ्यावरील फ्लॅट नं. जी - ३ ज्याचे एकूण क्षेत्रफळ ४६.४६ चौ.मी. (५००.०० चौ.फुट) असून, प्लॉट जागेत प्रमाणित अविभाजित हिस्यासह त्याच चर्तु:सिमा पुर्वेस सर्व्हिस लाईन, पश्चिमेस : पार्किग, उत्तरेस : फ्लॅट क. जी- २, दक्षिणेस खाली जागा.

वरील स्थावर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, गहाण, ताबा व ईसार व इतर कोणत्याही प्रकारचा अधिकार असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन पाच (५) दिवसाच्या आंत आमच्याकडे, लेखी कागदपत्रासंह, कागदोपत्री पुराव्यासह हरकत नोंदवावी जर कोणाचीही कसल्याच प्रकारची हरकत वेळेत आली नाही तर, माझे पक्षकार वरील स्थावरचे मिळकतीबाबतचे रजि. खरेदीखत नोंदवून घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर किंवा हरकत व कुठल्याही प्रकारचा वाद किंवा न्यायालयीन प्रकरण चालणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

अकोला
दि. ०३.२०२६

**(पक्षकारांतर्फे अधिवक्ता)**
**ॲड. अमर ओ. तिवारी**
रा. भारती कॉम्प्लेक्स, एफ-६,
किल्ला चौक, अकोला, ता. जि. अकोला

# सैनिक शेतकरी वेल्फेअर फाउंडेशनमध्ये नाशेहा अंजुम यांची केंद्र प्रमुखपदी नियुक्ती

**महिला सक्षमीकरणासाठी स्वयंसंचित महिला उत्कर्ष अभियान**

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

सैनिक शेतकरी वेल्फेअर फाउंडेशन, मुर्तिजापूरच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त महिला सक्षमीकरणासाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात समाजसेविका नाशेहा अंजुम जफर खान यांची केंद्र प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली.

श्री संत गजानन महाराज मंदिराच्या सभागृहात १० मार्च रोजी सायंकाळी हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतींना अभिवादन करून करण्यात आली. मध्यमवर्गीय महिलांचा आर्थिक स्तर



उंचावण्यासाठी आणि स्वावलंबन वाढविण्यासाठी विविध लघुउद्योगांची माहिती देण्यासोबतच समाजसेवा व जनजागृतीसंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सैनिक शेतकरी वेल्फेअर फाउंडेशनच्या महिला तालुका अध्यक्षा सौ. सुनिताताई दांदळे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून बार्शीटाकळी तालुकाध्यक्ष प्रल्हाद शेलोकर, तर विशेष मार्गदर्शक म्हणून संस्थेचे जिल्हाध्यक्ष दीपक दांदळे उपस्थित होते. यावेळी तालुका कोर कमिटीचे सचिव महेंद्र नागलकर आणि प्रभू पाचडे यांचीही उपस्थिती होती.

या कार्यक्रमात गजानन महाराज मंदिर संस्थान टांकवाडी येथील प्रशिता गावंडे यांची विभाग प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. तसेच पवित्र रमजानचे रोजे सुरू असतानाही समाजसेवेला प्राधान्य देणाऱ्या नाशेहा अंजुम जफर खान यांची केंद्र प्रमुख म्हणून निवड जाहीर करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका अध्यक्ष अनिल डाहेलकर यांनी केले. प्रास्ताविक प्रल्हाद शेलोकर यांनी मांडले, तर आभार प्रदर्शन सौ. प्रशिता गावंडे यांनी केले. कार्यक्रमास सौ. शिल्पा नागलकर, सौ. संध्या डाहेलकर यांच्यासह टांकवाडी, माळीपुरा, बालाजी चौक, वकीलपुरा परिसरातील अनेक महिला उपस्थित होत्या.

## जाहीर सुचना

सर्व जनतेस व वित्तीय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, श्री प्रमोद मधुकर कुलकर्णी रा. बुलढाणा ता. जि. बुलढाणा, यांनी खालील वर्णनाची मालमत्ता आय. सि. आय. सि. आय. होम फायनान्स कंपनी लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे ग्रा. पं. माळविहीर ता. जि. बुलढाणा च्या हद्दीतील गट क्र. २११ चे वि. उप-विभागीय अधिकारी, बुलढाणा यांच्या फाईल वरील मह. प्र. क्र. एन. ए.ए.-३४ / मेहकर / ३३/२००३-०४ आदेश दि. ०१/०७/२००४ नुसार पारित ले-आउट नकाशातील प्लॉट १६-अ ज्याचे क्षेत्रफळ १२३.५० चौ. मी. असून, ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस : प्लॉट क्र. १९-ब, पश्चिमेस : रस्ता, ऊत्तरेस : प्लॉट क्र. १६-ब व दक्षिणेस : प्लॉट क्र. १५-ब.

येणे प्रमाणे वरील मालमत्तेचे दस्त क्र. ३१५ दि १५/०१/२०१९, ३१६ दि १५/०१/२०१९, २९११ दि ०८/०४/२०२१, २९८३ दि ०९/०४/२०२१ व ८३०१ दि ०७/१२/२०२१ रोजीचे मुळ खरेदीखत जे मालमत्तेचे साखळी दस्त आहे ते हरविले/गहाळ झाले आहे. त्याकरीता पोलीस स्टेशन बुलढाणा येथे दि. ०८/०३/२०२६ रोजी तक्रार दाखल केली आहे.

त्याअर्थी जर वरील मालमत्तेवर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार अथवा ताबा असल्यास त्यांनी सदर सुचना प्रकाशीत झाल्या पासुन ७ (सात) दिवसात खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानीशी आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही कसल्याही स्वरुपाचा आक्षेप नाही असे समजुन आय. सि. आय. सि. आय. होम फायनान्स कंपनी लि. हे वरील मालमत्ता गहाण ठेवुन कर्जाची रक्कम वितरीत करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत वा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. १२/०३/२०२६

**अधिवक्ता : संजीव रा. बोचरे,**
संतोष नगर, आगाशे गुरुकुल,
मलकापुर रोड, अकोला - ४४४००४
मोबा. ९८९०४४४८२४

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २६३/२०२६ — प्रोसेस नं.२८४९/२०२६
चौ.ता. ३०/०३/२०२६ — दिनांक : ०२/०३/२०२६

**अर्जदार :** १. शिला सतीश यंगल २. विक्रम सतीश यंगल ३. धरम सतीश यंगल क. १ ते ३ रा. अरविंद घोष मार्ग, रामदास पेठ, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सतीश यशवंतराव यंगल
**पत्ता :-** रा. अरविंद घोष मार्ग, रामदास पेठ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सतीश यशवंतराव यंगल यांचे दि. १८/१०/२०२५ रोजी राहते घरी रामदास पेठ, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १००**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या नोटीसव्दारे कळविण्यात येते की, आमचे माझे पक्षकार पारस हरिचंद्र बोदडे वय ३७ वर्षे, रा. आनंद नगर, बाजोरीया नगरी, अकोला ता.जि. अकोला येथील रहिवाशी असून येथील खाली नमुद केलेली मालमत्ता श्री. सागर मुरलीधर पखाले वय ३६ वर्षे, रा. आनंद नगर, कौलखेड रोड, हिंगणा फाटा, अकोला यांच्याकडून इसार करून खरेदी करण्याच्या विचारात आहेत. मालमत्तेचे वर्णन :- जि.प. पं.स. र. स. डी. र. डी. अकोला ता. जि. अकोला येथील ग्रा.पं. मौजे कौलखेड प्र. ता. जि. अकोला येथील शेत जमीन :

भु.क्र., ६ + ७/१ वर्ग१, हे.आर. ७.१५, यातील हिस्सा ० हेक्टर ०६ आर (६०० वर्ग मीटर. ) १४.८२ गुंठे नुसार ज्याची चर्तुः सिमा :- पुर्वेस रोड, पश्चिमेस - सिंधी यांची खाली जागा, उत्तरेस - रोड, दक्षिणेस खाली जागा. सदर मालमत्तेबाबत कोणाचाही काहीही हक्क, अधिकार, मालकी हक्क, ताबा, गहाण, वचन, वादग्रस्त हक्क, मॉर्गेज किंवा इतर कुठल्याही प्रकारचा दावा असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३ (तीन) दिवसाच्या आत आवश्यक कागदपत्रासह लेखी स्वरूपात संपर्क साधावा. तसे न केल्यास आमचे पक्षकार व्यवहार पूर्ण करतील नंतर कोणाचाही कसलाही इ. उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी. करीता जाहीर नोटीस.

ठिकाण : अकोला
दिनांक :- १२.०३.२०२६

**ॲड. एच. एम. शिरसाट**
अकोला बार असोसिएशन, जिल्हा व सत्र न्यायालय, अकोला मो.नं. ९८८११९९४१५
पक्षकारा तर्फे अधिवक्ता.

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २९४/२०२६ — प्रोसेस नं.३०४२/२०२६
चौ.ता. २५/०३/२०२६ — दिनांक : ०६/०३/२०२६

**अर्जदार :** १. सतिष पांडुरंग डोंगरे २. संजय पांडुरंग खंडारे रा. रो. हाउस नं. १४, सरस्वती नगर, पंचाक, नाशिक, ता. जि. नाशिक. ३. सौ. रेवती श्रीकृष्णा आष्टीकर रा. केशवराज वेताळ, अकोट, ता. अकोट जि. अकोला. ४. नारायण पांडुरंग डोंगरे अर्जदार क. १ ते ४ रा. परिवार कॉलनी नं. ३, केशव नगर, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. पांडुरंग गोविंदराव डोंगरे २. कुमूद पांडूरंग डोंगरे
**पत्ता :-** रा. परिवार कॉलनी नं. ३, केशव नगर, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत पांडुरंग गोविंदराव डोंगरे यांचे दि.०५/०६/२००९ रोजी व तसेच मयत कुमूद पांडूरंग डोंगरे यांचे दि. २१/०१/२०२३ रोजी राहते घरी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ३२९/२०२६ — प्रोसेस नं.३०४८/२०२६
चौ.ता. १०/०४/२०२६ — दिनांक : ०६/०३/२०२६

**अर्जदार :** १. लक्ष्मीबाई किसन घावडे रा. व्दारा किसन घावडे, राजेश किराणा जवळ, कृषी नगर, लेबर कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला. २. दुर्गा रमेश घावडे रा. राजेश किराणा जवळ, कृषी नगर, लेबर कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला. ३. ममता रमेश घावडे रा. लेबर कॉलनी, कृषी नगर, अकोला. ता. जि. अकोला. ४. चैतन्य रमेश घावडे रा. राजेश्वर किराणा शॉप, कृषी नगर, लेवर कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रमेश किसन घावडे
**पत्ता :-** रा. लेबर कॉलनी, कृषी नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रमेश किसन घावडे यांचे दि. १५/०४/२०२५ रोजी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## संक्षिप्त

### कबीर वॉर्डातून दुचाकी लंपास

**हिंगणघाट-** शहरातील संत कबीर वॉर्ड परिसरातून अज्ञात चोरट्याने दुचाकी लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून तपास सुरू आहे.तक्रारकर्ता हरिष सातारकर (रा. कवडघाट, ता. हिंगणघाट) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या मालकीची एमएच ३२ एडब्ल्यू ९३४९ क्रमांकाची दुचाकी अज्ञात व्यक्तीने चोरून नेली. ही घटना लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांत धाव घेत तक्रार नोंदविली. या चोरीमुळे सातारकर यांचे सुमारे ३५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जाते. शहरात अलीकडे दुचाकी चोरीच्या घटनांत वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. संबंधित प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून चोरट्याचा शोध सुरू केला आहे.

### गिरीपेठ भागात मंगळसूत्र स्नेचिंग

**वर्धा-** शहरातील गिरीपेठ परिसरात दुचाकीस्वारांनी वृद्ध महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून नेल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.नंदा चौधरी (वय ७२, रा. गिरीपेठ) या पायी घराकडे जात असताना दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना पत्ता विचारला. त्यावेळी मागे बसलेल्या इसमाने संधी साधत त्यांच्या गळ्यातील सुमारे १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून घेतले आणि दोघांनी घटनास्थळावरून पळ काढला. या प्रकारात चौधरी यांचे सुमारे ३० हजार रुपयांचे नुकसान झाले. घटनेनंतर त्यांनी पोलिसांत तक्रार दिली. या प्रकरणी रामनगर पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपींचा शोध सुरू केला आहे.

### रेहकी शिवारातून शेतीउपयोगी साहित्य चोरी

**सेलू-** तालुक्यातील रेहकी शिवारात शेतातील बंड्याचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने शेती उपयोगी साहित्य चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.अक्षय झाडे (वय ३०) यांचे रेहकी शिवारात शेत असून तेथे त्यांनी शेती साहित्य ठेवण्यासाठी बंडा बांधला आहे. शेतात कोणी नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने बंड्याचे कुलूप तोडले व आत ठेवलेले रोटावेटर, लोखंडी चाक, सहा फासे, विळे तसेच पितळी नोजल असा एकूण ११ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. ही बाब लक्षात आल्यानंतर झाडे यांनी पोलिसांत तक्रार नोंदविली. या प्रकरणी सेलू पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून चोरट्याचा शोध सुरू केला आहे.

### मद्यधुंद अवस्थेत हार्पिक प्राशन; व्यक्तीचा मृत्यू

**वर्धा-** मद्यधुंद अवस्थेत एका व्यक्तीने हार्पिक प्राशन केल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.आनंद गायकवाड (वय ४०, रा. हिंदनगर, सिंदी मेघे) यांना दारूचे व्यसन असल्याची माहिती समोर आली आहे. मद्यधुंद अवस्थेत त्यांनी घरात असलेले हार्पिक प्राशन केले. त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले; मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. या प्रकरणी रामनगर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेत पुढील तपास सुरू केला आहे.


### नापिकी कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

**वर्धा-** नापिकी, कर्जाचा बोजा आणि आजारपणाच्या विवंचनेत अडकलेल्या शेतकऱ्याने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे.गजानन उगेमुगे (वय ४५, रा. भूगाव) हे वडिलोपार्जित शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. मात्र त्यांना अर्धांगवायूचा त्रास होता. त्यातच नापिकीमुळे उत्पन्न घटले आणि कर्जाची परतफेड कशी करावी, याची चिंता वाढत गेली. या विवंचनेत त्यांनी शेतातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याचे समोर आले. ही घटना लक्षात आल्यानंतर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी सावंगी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेत पुढील तपास सुरू केला आहे.

### पोकलेन मशिनवरून पडून चालकाचा मृत्यू

**पुलगाव-** पोकलेन मशिनवर काम करताना खाली पडून चालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. बोलेड्डुला प्रवीण कुमार (वय २८, रा. वडाळा) हे सोमेश्वर कंपनीजवळ पोकलेन मशिन चालवत होते. काम सुरू असताना अचानक तोल जाऊन ते मशिनवरून खाली पडले. सहकाऱ्यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

### प्रा. दिगंबर साबळे यांचे निधन



**वर्धा-** विदर्भ साहित्य संघ, वर्धा शाखेचे सल्लागार तथा वाङ्मयीन व ग्रंथालय चळवळीतील ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा. दिगंबर बापूराव साबळे (८४ वर्षे), रा. सुयोग कॉलनी, कारला रोड यांचे दि. १२ रोजी सकाळी ७.३० वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी माधवी (सिंधू) आणि मोठा आप्तपरिवार आहे.

# गॅस टंचाईचा फटका कष्टकऱ्यांना

## बांधकाम कामगारांसाठी इंडक्शन चूल योजनेची मागणी; उमेश अग्निहोत्री यांचे मुख्यमंत्री व कामगार मंत्र्यांना निवेदन

**वर्धा/जनमाध्यम**

राज्यात निर्माण झालेल्या घरगुती गॅस सिलेंडरच्या टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिकांसह कष्टकरी बांधकाम कामगारांच्या अडचणीत मोठी भर पडली आहे. वाढते दर आणि गॅस सिलेंडरची अपुरी उपलब्धता यामुळे रोजंदारीवर उदरनिर्वाह करणाऱ्या कामगारांच्या चुली पेटविण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर नोंदणीकृत बांधकाम कामगारांना पर्यायी स्वयंपाक साधन म्हणून इंडक्शन चुल उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र योजना सुरू करण्याची मागणी स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उमेश अग्निहोत्री यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच कामगार मंत्री आकाश फुंडकर यांना निवेदन सादर केले आहे. सध्या देशात व राज्यात इंधनाच्या पुरवठ्यावर परिणाम होत असून अनेक भागांत घरगुती गॅस सिलेंडर सहज उपलब्ध होत नाही. त्यामुळे हॉटेल, ढाबे आणि कॅटरिंगसारखे व्यवसायही अडचणीत आले आहेत.अशा परिस्थितीत आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या बांधकाम कामगारांना गॅस सिलेंडर खरेदी करणे आणि त्याचे वाढते दर पेलणे अधिकच कठीण बनले आहे. राज्यातील लाखो कामगार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात नोंदणीकृत असून त्यांचे उत्पन्न मर्यादित आहे. त्यामुळे त्यांच्या कुटुंबांपुढे दैनंदिन स्वयंपाकाचा प्रश्न निर्माण होत आहे.मंडळाने कामगारांच्या हिताचा विचार करून नोंदणीकृत कामगारांना इलेक्ट्रिक किंवा सोलर ऊर्जेवर चालणाऱ्या इंडक्शन चुल उपलब्ध करून देण्यासाठी विशेष योजना सुरू करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. अशी योजना राबविल्यास कामगार कुटुंबांना मोठा दिलासा मिळेल, गॅसवरील अवलंबित्व कमी होईल तसेच पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापर वाढण्यास मदत होईल, असे अग्निहोत्री यांनी नमूद केले आहे.



# खड्ड्यांच्या खाईत गाडेगाव-चाणकी-कोसूर्ला मार्ग

## पूल, डांबरीकरणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष; तातडीने काम सुरू करण्याची ताकसांडे यांची मागणी

**मोझरी (शेकापूर)/जनमाध्यम**

हिंगणघाट तालुक्यातील गाडेगाव-चाणकी-कोसूर्ला मार्गाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे नागरिकांचे हाल होत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे हा १२ किलोमीटरचा मार्ग अक्षरशः खड्ड्यांच्या खाईत गेला असून तातडीने मजबुतीकरण व डांबरीकरण करावे, अशी मागणी गाडेगावचे माजी सरपंच शालिकराव ताकसांडे यांनी केली आहे.

गेल्या दोन दशकांपूर्वी गाडेगाव ते चाणकी या मार्गाचे मजबूत डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र कालांतराने रस्त्यावरील गिट्टी उखडून मोठे



खड्डे पडले आहेत. परिणामी वाहनचालकांना या मार्गाने प्रवास करताना जीव मुठीत धरावा लागत आहे. पाच वर्षांपूर्वी या मार्गावरून एसटी बससेवा सुरू होती; परंतु रस्त्याची दुरवस्था वाढल्याने तीही बंद पडली आहे.याच मार्गावर चाणकी गावाजवळ पूल उभारणे अत्यंत आवश्यक असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. पावसाळ्यात येथे पाण्याचा अडथळा निर्माण होत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. तसेच रस्त्याच्या कडेला वाढलेल्या झाडाझुडपांच्या फांद्या रस्त्यावर येत असल्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. सदर मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असतानाही त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रस्त्याच्या खराब स्थितीमुळे बस वाहतूक ठप्प झाली असून इतर वाहनेही चालवणे अवघड झाले आहे.या मार्गाचे तातडीने मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी माजी आमदार जयप्रकाश छाजेड तसेच एसटी वर्कर्स संघटनेचे प्रदेश संघटक सहसचिव आणि गाडेगावचे माजी सरपंच शालिकराव ताकसांडे यांनी केली आहे. लोकप्रतिनिधींनी या मागणीची दखल घेतल्यास येत्या अर्थसंकल्पात या रस्त्यासाठी निधीची तरतूद होईल, अशी जनभावना परिसरात व्यक्त होत आहे.

# अंतोरा येथे १४ मार्च रोजी महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

**वर्धा/जनमाध्यम**

तहसील कार्यालय आष्टीच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा एक अंतर्गत तालुक्यातील अंतोरा येथे दि.१४ मार्च रोजी मंडळस्तरीय समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अंतोरा मंडळातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन आष्टी तहसीलदार यांनी केले आहे.

या शिबिरात नागरिकांना विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यात प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती हेल्पडेस्क, लोकसेवा हक्क कायदा-तत्काळ संपा, अकृषक तरतुदीसंदर्भातील सुधारणाबाबत मार्गदर्शन, भूसंपादन केलेल्या व अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमी-जास्त पत्रके तयार करुन गाव दप्तर अद्ययावत करणे, नागरी सुविधा, एक खिडकी व्यवस्था, ई-मोजणी, ॲग्रीस्टॅक, पीएम किसान निधी, सर्वांसाठी घरे अंतर्गत पट्टे वाटप करणे, तुकडेबंदी कायद्याबाबतची प्रकरणे निकाली काढणे व इतर विभागाशी निगडीत कामे केली जाणार आहे.शिबिरामध्ये विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन, अर्ज स्वीकृती, तक्रारीचे निवारण आणि प्रलंबित प्रकरणांवर तात्काळ कार्यवाही करण्यात येणार आहे. अंतोरा मंडळातील नागरिकांनी शिबिराचा लाभ घेण्यासाठी आवश्यक सर्व कागदपत्रांसह शिबिरास उपस्थित रहावे व शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आष्टी तहसीलदार ऐश्वर्या गिरी यांनी केले आहे.

# गर्भलिंग तपासणी व स्त्रीभ्रुणहत्या रोखण्यासाठी नागरिकांनी सजग राहावे

## जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा शल्यचिकित्सकांचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

गर्भलिंग तपासणी व स्त्रीभ्रुणहत्या रोखण्यासाठी नागरिकांनी सजग राहावे, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक सुमंत वाघ यांनी ८ मार्च जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर स्त्री- पुरुष समानतेचा संदेश देतांना केले. भारतामध्ये गर्भधारणपुर्व व प्रसुतीपुर्व निदान तंत्र कायदा १९९४ लागू असून गर्भातील बाळाचे लिंग सांगणे, विचारणे किंवा त्यासाठी तपासणी करणे हा कायद्याने दंडनिय गुन्हा आहे. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या डॉक्टर, आरोग्य संस्था किंवा संबंधित व्यक्तीवर दंड व परवाना रद्द करणे, तसेच तुरुंगवासाची तरतूद आहे. स्त्रीभ्रुणहत्या ही समाजाची अत्यंत गंभीर समस्या असून त्यामुळे स्त्री-पुरुष प्रमाणात असमतोल निर्माण होतो. मुलगा- मुलगी असा भेदभाव न करता प्रत्येक बालकांना जन्माचा व जगण्याचा समान हक्क आहे. त्यामुळे समाजातील सर्व नागरिकांनी गर्भलिंग तपासणीस नकार देऊन मुलींच्या जन्माचे स्वागत करावे, असेही आवाहन डॉ.सुमंत वाघ यांनी केले.पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत कलम २३ नुसार गर्भलिंग निदान करणाऱ्या डॉक्टरला ३ वर्ष सक्तमजूरी व १० हजार रुपये दंडाच्या शिक्षेची तरतुद आहे. तसेच ५ वर्षासाठी संबंधित डॉक्टरांची नोंदणी रद्द करण्यात येते. व्यक्ती पुन्हा हा गुन्हा करतांना आढळल्यास ५ वर्षे सक्तमजुरी व ५० हजार रुपये दंड व वैद्यकिय परवाना कायमचा रद्द करण्यात येतो. गर्भलिंग निदानाची सेवा मागणारे गर्भवती महिलेचे नातेवाईक, मध्यस्थ व इतर संबंधित व्यक्तीस ५ वर्षे सक्तमजुरी व १० हजार रुपये दंडाच्या शिक्षेची तरतुद आहे. सामान्य रुग्णालय येथे पीसीपीएनडीटी कायद्यानुसार बेटी बचाव बेटी पढाओ मोहिमेंतर्गत जिल्ह्यामध्ये कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. गर्भलिंग निदान करुन गर्भपात करण्याकरीता प्रवृत्त करणाऱ्या दोषींवर कार्यवाही करण्याकरीता www. amchimulgimaha.in या संकेतस्थळावर किंवा १८००२३३४४७५/१०४ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.गर्भलिंग होत असल्याचे माहिती देणाऱ्यास शासनाकडून १ लाख रुपयाचे बाक्षिस न्यायालयात प्रकरण दाखल झाल्यानंतर देण्यात येते, असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुमंत वाघ यांनी कळविले आहे.

# चार वर्षे कागदावर अडकलेले आरोग्य केंद्र; कांढळी-शेकापूर प्रस्तावाला मंत्रालयात गती

## आ.समीर कुणावार यांची मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासमोर मागणी

**समुद्रपूर/जनमाध्यम**

हिंगणघाट विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागात आरोग्य सुविधा मजबूत करण्याच्या दृष्टीने कांढळी व शेकापूर (बाई) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रस्तावांबाबत मुंबई येथील मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाशजी आबिटकर यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत आमदार समीर कुणावार यांनी हा मुद्दा ठामपणे मांडत तातडीने मंजुरी देण्याची मागणी केली.

समुद्रपूर तालुक्यातील मौजा कांढळी तसेच हिंगणघाट तालुक्यातील शेकापूर (बाई) येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्याचा प्रस्ताव तयार करून आवश्यक सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. जिल्हा नियोजन समितीकडूनही हे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आले आहेत. मात्र चार वर्षे उलटूनही अंतिम मंजुरी मिळालेली नसल्याने या परिसरातील नागरिकांना अद्याप आरोग्य सुविधांसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना साध्या उपचारांसाठीही दूरवरच्या रुग्णालयांमध्ये जावे लागते. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि आपत्कालीन रुग्णांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची बाब आमदार कुणावार यांनी बैठकीत



अधोरेखित केली. त्यामुळे कांढळी व शेकापूर (बाई) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.बैठकीदरम्यान संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रस्तावांचा सविस्तर आढावा घेतला. प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या मंजुरीसाठी आवश्यक पुढील कार्यवाही तातडीने करण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त करण्यात आल्याची माहिती आमदार समीर कुणावार यांनी दिली. या बैठकीमुळे चार वर्षांपासून रखडलेला प्रस्ताव मार्गी लागण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

# समुद्रपूर बाजार समितीत शुभारंभ तुरीची हमीभावाने खरेदी

**समुद्रपूर/जनमाध्यम**

हंगाम २०२५-२६ मधील तूर व हरभरा पिकांच्या हमीभाव खरेदी प्रक्रियेला चालना देण्यासाठी केंद्र शासनाने नाफेडमार्फत महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या माध्यमातून समुद्रपूर कृषी उत्पन्न बाजार समितीला खरेदी केंद्राची मंजुरी दिली आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समिती समुद्रपूर येथे रविवारी (१५ मार्च) सकाळी ११ वाजता तूर व चना खरेदीचा अधिकृत शुभारंभ होणार आहे.

समितीचे सभापती हिम्मतराव चतुर यांच्या हस्ते वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज बाजार आवारात काटा पूजन करून खरेदी प्रक्रियेला प्रारंभ करण्यात येणार आहे. या केंद्रावर तुरीला प्रतिक्विंटल ८,००० रुपये तर चना (हरभरा) पिकाला प्रतिक्विंटल ५,८७५ रुपये हमीभाव देण्यात येणार आहे.

शासकीय हमीभावाने खरेदीसाठी तुरीची ऑनलाइन नोंदणी २४ मार्च २०२६ पर्यंत, तर चना खरेदीसाठी नोंदणी ३१ मार्च २०२६ पर्यंत बाजार समिती कार्यालयात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) सुरू राहणार आहे. नोंदणी करताना शेतकऱ्यांनी अद्यावत डिजिटल सातबारा, आधारकार्ड, आधार लिंक असलेल्या बँक खात्याच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत, तसेच आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक सोबत आणणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी स्वतः उपस्थित राहून बायोमेट्रिक फिंगरप्रिंट प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक राहील. नाफेडच्या निकषांनुसार शेतीमाल खरेदी केली जाणार असून शेतकऱ्यांनी आपला माल स्वच्छ करून वाळवून विक्रीसाठी आणावा, असे आवाहन करण्यात आले आहे. कृषी विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार तुरीसाठी हेक्टरी १६.५५ क्विंटल तर हरभऱ्यासाठी हेक्टरी १७ क्विंटल मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

एका दिवशी एका शेतकऱ्याकडून जास्तीत जास्त ४० क्विंटलपर्यंत शेतीमाल स्वीकारला जाणार आहे.

# हातात झाडू, मनात संतांचे विचार; पारडीची 'स्वच्छता दूत'

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

कारंजा (घा.) तालुक्यातील पारडी या गावात एक साधी, निरागस पण प्रेरणादायी कहाणी दररोज पहाटे घडताना दिसते. गाव अजून झोपेत असताना हातात झाडू घेऊन रस्ते, चौक आणि गल्ल्या स्वच्छ करणारी महिला म्हणजे कमलाबाई कैलुके (वय ५६). गेल्या तब्बल २५ वर्षांपासून त्या कोणताही मोबदला न घेता गाव स्वच्छ ठेवण्याचे काम निस्वार्थ भावनेने करत आहेत.

पाच हजार लोकसंख्या असलेल्या पारडी गावाला संत परंपरेचा वारसा लाभला आहे. संत भाकरे महाराजांची जन्मभूमी म्हणून गावाची ओळख आहे. त्या संतांच्या विचारातून प्रेरणा घेत कमलाबाई कैलुके यांनी गाव स्वच्छ ठेवण्याचा संकल्प केला. पहाटे उठून त्या मुख्य चौक, वर्दळीच्या गल्ल्या आणि सार्वजनिक ठिकाणे झाडून स्वच्छ करतात.कमलाबाई या भूमिहीन शेतमजूर कुटुंबातील आहेत. कधी शेतमजुरी तर कधी आठवडी बाजारात मुरमुरे-फुटाणे विक्री करून त्या आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. शिक्षण पहिल्या वर्गापर्यंतही नसले तरी भजन-कीर्तनातील ओव्या त्यांना पाठ आहेत. त्या म्हणतात, मला पैसे नकोत, सन्मान नको. पण माझं गाव स्वच्छ आणि सुंदर दिसलं पाहिजे, यातच मला समाधान आहे.सुरुवातीला काही लोकांनी त्यांची टिंगलटवाळी केली. तुला वेड लागलं का? असेही प्रश्न विचारले गेले. मात्र कमलाबाई आपल्या ध्यासावर ठाम राहिल्या. कालांतराने गावकऱ्यांनाही त्यांच्या कार्याची जाणीव झाली आणि आज अनेक जण त्यांचे कौतुक करतात.

पारडी येथील पोलीस पाटील अरविंद चाफले यांनीही त्यांच्या कार्याची दखल घेतली आहे. तळेगाव पोलिसांनी देखील भल्या पहाटे त्या स्वच्छता करतानाचा प्रसंग कॅमेऱ्यात टिपला. गावकऱ्यांच्या मते, कमलाबाईंच्या निस्वार्थ सेवेला शासनाने किमान एकदा तरी सन्मानित करावे, अशी मागणी होत आहे. कमलाबाईंची मात्र एकच अपेक्षा आहे,गावातील प्रत्येकाने दिवसातून फक्त पंधरा मिनिटे स्वच्छतेसाठी दिली, तर आपलं गाव नेहमी सुंदर राहील.संतांच्या विचारांनी प्रेरित झालेली ही साधी महिला आज पारडी गावाची खरी 'स्वच्छता दूत' ठरली आहे.



कमलाबाईंची २५ वर्षांची निस्वार्थ सेवा

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष- १४ अंक १०५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## संक्षिप्त

### शनिवारी स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघाची बैठक

**अमरावती-** स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ (महाराष्ट्र राज्य) यांच्या अमरावती विभागाच्या वतीने १४ मार्च २०२६ रोजी जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक दर्यापूर तालुक्यातील घडासावंगा धरण परिसरात सकाळी १०.३० वाजता होणार आहे. या बैठकीत अमरावती जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, तालुकाप्रमुख व सदस्य उपस्थित राहणार आहे. बैठकीदरम्यान नवीन सदस्य व पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात येणार असून आगामी चार महिन्यांत आयोजित करण्यात येणाऱ्या पत्रकारिता विषयक कार्यशाळांची माहिती देखील देण्यात येणार आहे.या बैठकीस दर्यापूर तालुकाध्यक्ष विजय हरणे पाटील अध्यक्षस्थानी राहणार असून संघटनेचे वरिष्ठ पदाधिकारी व मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. दरम्यान, संघटनेत सहभागी होण्याची इच्छा असलेल्या इच्छुकांनीही या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. नवीन सभासदांनी सोबत आधार कार्ड व दोन पासपोर्ट फोटो आणावेत, असेही कळविण्यात आले आहे. तसेच सर्व तालुकाप्रमुखांनी त्यांच्या सोबत येणाऱ्या व्यक्तींची संख्या पूर्वकल्पना म्हणून कळवावी, जेणेकरून भोजन व्यवस्था सुरळीत करता येईल. बैठकीच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष संजय सरवटकर यांनी केले.

### आष्टी बस स्टँड परिसरात चिंच बोर विक्रीचा हंगाम

**टाकरखेडा संभू-** आष्टी बस स्टँड परिसरात सध्या चिंच विक्रीचा



हंगाम सुरू झाला असून रस्त्यालगत चिंचणी-बोरीचे छोटे स्टॉल लावलेले दिसत आहेत. परिसरातील अनेक कष्टकरी महिलांसह पुरुष भर उन्हात चिंचा गोळा करून त्या बस स्टँडजवळ विक्रीसाठी बसतात. प्रवासी व नागरिक या आंबट-गोड चिंचा व बोरी खरेदी करत असल्याने स्टॉलवर दिवसभर वर्दळ पाहायला मिळते. कडक उन्हाची पर्वा न करता कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी हे विक्रेते मेहनत घेताना दिसत आहेत. अल्प उत्पन्नावर कुटुंबाची गुजराण करण्यासाठी त्यांची सुरू असलेली ही धडपड अनेकांचे लक्ष वेधून घेत आहे.

### विभागीय आयुक्तालयात यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

**अमरावती-** आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि राज्याचे पहिले



मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.राज्याच्या प्रगतीसाठी यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या कार्याची आठवण करुन देत, त्यांच्या आदर्शांवर चालण्याचा संकल्प उपस्थितांनी यावेळी व्यक्त केला.वनसंरक्षक आदर्श रेड्डी, अपर आयुक्त सुरज वाघमारे, उपायुक्त रविंद्र जाधव, संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते. उपस्थितांनीही दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.



### डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात जागतिक महिला दिन साजरा

**अमरावती-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, फ्रेजरपुरा, अमरावती येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षा खरबडे मुख्याध्यापिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय, अमरावती, मुख्याध्यापक घोंगडे प्रमुख पाहुणे बोज्जे सामाजिक सेविका, पालक प्रतिनिधी रामटेवे उपस्थित होत्या. महिला दिनानिमित्त प्रमुख पाहुण्यांनी भाषणातून सर्वांना मार्गदर्शन केले. ञ्श्ए शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पास झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला विद्यार्थी, महिला पालकवर्ग यांचा भरपूर प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## निधन

### चंद्रकला इंगळे

**काटपूर-** चंद्रकला ऊत्तमरावजी इंगळे (६८) रा. राहुलनगर,अमरावती



यांचे ११मार्च २०२६ ला रात्री ११ वाजता हृदयविकाराच्या तिव्र धक्याने अकस्मात निधन झाले. त्याचे पच्छात पती, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार असुन संपूर्ण इंगळे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.त्यांचा अंतविधी राहुल नगर अमरावती येथुन हिन्दु स्मशान भूमीत करण्यात आला. यावेळी बहुसंख्यने आप्त-स्वकिय उपस्थित राहून चंद्रकला इंगळे यांना शोकाकुल वातावरणात श्रद्धांजली देण्यात आली.

### शकुंतला फुटाणे



**तिवसा-** येथील शिक्षक कॉलनी स्थित सुनील फुटाणे यांच्या आई शकुंतलाबाई बळीराम फुटाणे यांचे ९मार्च २०२६ला रात्री १० वाजताच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८२ वर्षाच्या होत्या.त्यांच्या मृत्यूपश्चात बराच मोठा आप्त परिवार आहे.

# तहसील कार्यालयात दिव्यांगांनी युडीआयडी व आधार कार्ड जमा करा

## तहसीलदार पुष्पा सोळंके यांचे दिव्यांगाना आव्हान

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग लाभार्थ्यांनी आपले वैश्विक दिव्यांग ओळखपत्र (UDID) काढून घेऊन ते आधार कार्डशी संलग्न करणे आवश्यक करण्यात आले आहे. संबंधित कागदपत्रे वेळेत ग्राम महसूल अधिकारी किंवा महसूल सेवकाकडे जमा करावीत, असे आवाहन अंजनगाव सुर्जीच्या तहसीलदार पुष्पा सोळंके यांनी केले आहे.




सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार विशेष सहाय्य योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांचे आधार कार्ड योजनांशी तीन महिन्यांच्या आत संलग्न करणे बंधनकारक करण्यात आले आहे. दरम्यान, १५ सप्टेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार विशेष सहाय्य योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांना मिळणारे मासिक अर्थसहाय्य १५०० रुपयांवरून वाढवून २५०० रुपये करण्यात आले आहे. हे अर्थसहाय्य डीबीटी (Direct Benefit Transfer) प्रणालीद्वारे थेट लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा केले जात आहे. दिव्यांगांसाठी उपलब्ध असलेल्या विविध योजना, सवलती आणि शासकीय लाभांचा लाभ मिळण्यासाठी UDID कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी आपले UDID कार्ड व आधार कार्ड अद्ययावत करून २५ मार्चपूर्वी संबंधित ग्राम महसूल अधिकारी किंवा महसूल सेवकाकडे जमा करावे, असे तहसीलदार पुष्पा सोळंके यांनी स्पष्ट केले आहे.

निर्धारित मुदतीत कागदपत्रे जमा न केल्यास पात्र लाभार्थ्यांचे अनुदान बंद होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, असा इशाराही प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे. त्यामुळे भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी आपली कागदपत्रे वेळेत जमा करावीत, असे आवाहन तहसीलदार पुष्पा सोळंके यांनी केले आहे.

## यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

**अमरावती -** आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आणि राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी गोविंद दानेज यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, अधीक्षक निलेश खटके यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते. उपस्थितांनीही दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.

## विद्यापीठामध्ये महिला दिनानिमित्त 'महिला स्टार्टअप्स'चा सत्कार

**अमरावती/ का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रिसर्च अॅन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन, रसायनशास्त्र विभाग व इंटरनॅशनल ह्युमन राईटस् वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला स्टार्टअप्सचा सत्कार सोहळा इन्क्युबेशन सेंटर येथे झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून जाधव लेलँड प्रा. लि. च्या सीईओ कश्मिरा जाधव, विद्यापीठ व्यवस्थापन परिषध सदस्य डॉ. मनिषा कोडापे, इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते महिला-नेतृत्वाखालील स्टार्टअप्स एन.के. बायोब्लेंड प्रा. लि. च्या संचालक साक्षी बंड, लॉक युवर आयडिया प्रा.लि. च्या संचालक योगिता पवार, मोरया अॅग्रो रिसर्च नॅनो बायोटेक प्रा.लि. च्या संचालक सुनिता बनसोड, प्लेऊरोटस् फुड इंडस्ट्रिज प्रा. लि. च्या संचालक कुमुदिनी इंगळे, बायो निर्मित प्रा. लि. च्या संचालक देवयानी गोळे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे यांचे विद्यापीठातील योगदान व कार्याचा याप्रसंगी गौरव करण्यात आला.



प्रमुख अतिथी व जाधव लेलँड प्रा. लि. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी कश्मिरा जाधव मार्गदर्शन करतांना महिला उद्योजकांनी नेटवर्किंग, मार्केटिंग यावर भर द्यावा आणि एकमेकांच्या संयोगाने मार्गक्रमण करावे, असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणातून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी महिला उद्योजकतेचे महत्त्व अधोरेखित करतांना नव्या पिढीतील महिलांनी स्टार्टअप व नवोपक्रम क्षेत्रात पुढे आले पाहिजे असे आवाहन केले. यावेळी डॉ. मनिषा कोडापे यांनीही आपले विचार व्यक्त केले. महिला उद्योजिकांनी आपापल्या स्टार्टअपबद्दल माहिती देत आपले अनुभव कथन केले. वुमेन अॅन्ड चाईल्ड वेल्फेअर सेल, अमरावतीच्या अध्यक्ष डॉ. सुयोग अव्दैत पानट यांनी इंटरनॅशनल ह्युमन राईटस् वेल्फेअर असोसिएशन विषयी माहिती दिली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या आगमन व पुष्पगुच्छ देऊन स्वागताने झाली. इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख प्रा. स्वाती शेरकर यांनी स्वागतपर भाषणातून इन्क्युबेशन सेंटरच्या कार्याचा आढावा मांडला. संचालन अमोल हिरुळकर, आभार सेंटरचे सीईओ आनंद यादव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता नरेश मोवळे, रवी ढेंगळे, प्रशिक्षणार्थी भावेश वारके, प्रज्वल वानखडे, इंटरनॅशनल ह्युमन राईट्स वेल्फेअर असोसिएशनचे राजेश इजवे यांनी अथक परिश्रम घेतले.

## प्रशांत कांबळे यांच्या समर्थनार्थ पत्रकार एकवटले

### उपोषण सोडवा अन्यथा लेखनीबंद आंदोलन करू प्रशासनाला ईशारा

**तिवसा/ वार्ताहर**

शिरजगाव मोझरी ते जळका या रस्त्याच्या नूतनीकरण व रुंदीकरणासह विविध मागण्यांसाठी धोत्रा येथे आमरण उपोषणाला बसलेल्या पत्रकार प्रशांत कांबळे यांच्या समर्थनार्थ तिवसा तालुक्यातील पत्रकारांनी एकजूट दाखवली आहे. उपोषणाचा आज तिसरा दिवस असून अद्यापही शासन-प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेण्यात आलेली नसल्याने पत्रकारांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, काही पत्रकारांनी उपोषण मंडपाला भेट देऊन प्रशांत कांबळे यांची भेट घेत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली



व त्यांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविला. समाजहिताच्या प्रश्नासाठी पत्रकाराला आमरण उपोषण करावे लागणे ही दुर्दैवी बाब असून प्रशासनाने तातडीने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.या पार्श्वभूमीवर बुधवारी दुपारी ५ वाजता तिवसा तहसीलदार यांना निवेदन देऊन पत्रकारांच्या भावना व्यक्त करण्यात आल्या. तसेच प्रशासनाने आंदोलनावर तात्काळ तोडगा काढला नाही, तर तालुक्यातील सर्व पत्रकार एकदिवसीय लेखणीबंद आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.यावेळी जेष्ठ पत्रकार जानराव मनोहर,पत्रकार हेमंत निखाडे, प्रशिक मकेश्वर, संदीप दहाट, प्रफुल मनेश्वर, सुनील घोरमाडे,नंदू मते यांच्यासह तालुक्यातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## म.फुले महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीचे आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंध

**अमरावती/ का.प्र.**

स्थानिक, अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती येथील मानसशास्त्र विभागाच्या एम. ए. भाग दोन ची विद्यार्थिनी मनस्वी सुधीर रोहणकर हिने, सरदार पटेल विद्यापीठ,आनंद, गुजरात येथे झालेल्या Applied Psychology: Current Challenges and Envisioning Future Possibilities या आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदेत, The Relationship Between Childhood Trauma and Psychological Well-being Among Young Adults या विषयावर यशस्वीरीत्या शोधनिबंध सादरीकरण केले. यापूर्वी देखील मनस्वी रोहणकर हिने हैदराबाद येथे झालेल्या राष्ट्रीय परिषदेत तसेच जयपूर, राजस्थान येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत यशस्वी शोधनिबंध सादरीकरण केले आहे. मानसशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर



पोहोचवण्याकरिता भरीव कामगिरी केलेली आहे, त्यामुळे संशोधनाच्या क्षेत्रात महाविद्यालयाचे नाव उंचावण्यासाठी मानसशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग दर्शविल्याबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांनी मनस्वी रोहणकर हिचे तसेच तिला शोधनिबंध सादरीकरणास सहकार्य करणारे मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गजानन रत्नपारखी, प्रा. शुभम शेरेकर, प्रा. कीर्तीसुधा राजपूत, प्रा. उज्वला गोडबोले, प्रा. विद्या अंभोरे यांचे अभिनंदन केले तसेच विद्यार्थी गटातून संशोधनाच्या क्षेत्रात प्रथमतःच महाविद्यालयाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचल्याबद्दल मनस्वी रोहणकर हिचे विशेष कौतुक केले.

## स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांना नवी उर्मी देणारे-प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर

**परतवाडा/ वार्ताहर**

स्थानिक भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात सत्र २०२५-२६ च्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. विद्यार्थ्यांमधील दडलेले विविध कलागुण उजागर करण्यासाठी आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून स्नेहसंमेलनाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. या वेळी विचारपीठावर सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख प्रा. डॉ. प्रमोद गारोडे, क्रीडा व खेळ स्पर्धा




प्रमुख प्रा. डॉ. सतीश भागवत, प्रा. सुनील खांडेकर, प्रा. रवींद्र खंडेराव, प्रा. डॉ. दयाश्री कोकाटे तसेच प्रा. डॉ. अंकुश तुरखडे उपस्थित होते.यावेळी सांस्कृतिक समिती प्रमुख प्रा. डॉ. प्रमोद गारोडे यांनी आपल्या मनोगतात स्नेहसंमेलनाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, महाविद्यालयीन जीवन केवळ अभ्यासापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध सांस्कृतिक उपक्रमांची आवश्यकता असते. स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या अंगी असलेले विविध कलागुण सादर करण्याची उत्तम संधी मिळते.स्नेहसंमेलन हा केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे. प्रा. डॉ. गारोडे यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, त्यांनी केवळ प्रेक्षक म्हणून न राहता मोठ्या संख्येने विविध स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात सांगितले की, स्नेहसंमेलन हे महाविद्यालयीन जीवनातील एक महत्त्वपूर्ण पर्व असते.प्राचार्य खांडेकर यांनी सांगितले की, आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकांपुरते मर्यादित न राहता विविध क्षेत्रांमध्ये आपली प्रतिभा सिद्ध केली पाहिजे. या स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोटे पाटील शिक्षण महाविद्यालयामध्ये सराव चाचणीचे आयोजन



**अमरावती/ का.प्र.**

पी. आर पोटे पाटील ग्रुप ऑफ एज्युकेशन इन्स्टिट्यूट द्वारा संचालित पी आर पोटे पाटील शिक्षण महाविद्यालय येथे Educare Classes चे संचालक तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथील पदव्युत्तर विभागाचे कार्यरत प्रा.डॉ.घनश्याम वाघमारे यांचे शैक्षणिक व्याख्यान या उपक्रमात अंतर्गत बी.एड.प्रथम आणि द्वितीय वर्ष विद्यार्थ्यांना CTET, TET,TAIT आणि विविध स्पर्धा परीक्षा चे सखोल मार्गदर्शन करण्यात आले. तसेच वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना चाचणी पेपर देऊन त्यांना स्पर्धा परीक्षा चे पेपर कसे सोडायचे, मार्गदर्शन केले आणि चाचणी परीक्षा घेऊन त्यामध्ये प्रथम आणि द्वितीय विद्यार्थ्यांना प्रथम वर्षचे विशाल लोंढे आणिस्वाती बनसोड, या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. त्याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ अनुप्रिता देशमुख,डॉ.विजया कंकाळे, प्राध्यापिका सविता ठाकरे व बी.एड.प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. कार्यक्रमचे संचालन आकांक्षा अंबडकर हिने केले. प्रास्ताविक अनुजा धोंगडी यांनी केले. विध्यार्थी; खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री.स्वामी विवेकानंद वाचनालयाचे उद्घाटन; नव निर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

**अमरावती/ का.प्र.**

अमरावती शहरातील म्हाडा कॉलनी येथील गुरव समाज भवन येथे श्री स्वामी विवेकानंद वाचनालय व अभ्यासिकेचे उदेंघाटन नुकतेच करण्यात आले. यावेळी उपमहापौर सचिन भेंडे उपस्थित होते. समाजाच्या विविध उपक्रमांमध्ये पुढेही सक्रिय सहभाग राहील, अशी ग्वाही देत गुरव समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक प्रगतीसाठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. यावेळी नगरसेविका मंजुषा जाधव, लता देशमुख, डॉ. मधुरा कहाळे यांचा समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरव हितकारीणी मंडळाचे अध्यक्ष शरद देवरणकर हे होते. कार्यक्रमात डॉ. मधुरा मिलिंद



कहाळे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी उभारण्यात येणाऱ्या अभ्यासिकेसाठी आपल्या निधीतून ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली. माजी कौशल्य विकास अधिकारी श्रीकांत येते, पत्रकार त्रिदीप वानखडे आणि मिलिंद कहाळे यांनी सुध्दा मार्गदर्शन केले. हितकारीणी मंडळाचे अध्यक्ष शरद देवरणकर व त्यांच्या संपूर्ण कार्यकारिणीच्या कार्याचे कौतुक केले. अध्यक्षीय भाषणात अध्यक्ष शरद देवरणकर यांनी सांगितले की, या समाज भवनाच्या उभारणीत समाज बांधव आणि भगिनींचा सिंहाचा वाटा आहे. यावेळी प्रा. शरद पुसतकर,जयंत वानखडे, वैशाली आरोकर, दिलीप बेलबागकर, प्रमोद वाठोडकर, श्रीमती वानखडे अकोला, श्रीकांत येते यांनी पुस्तक उपलब्ध करून दिली. यावेळी रामभाऊ देवरणकर, अजय दळवी (वर्धा) यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. राजेंद्र बाळापूरे यांनी केले, तर प्रास्ताविक प्रा. जयंत पुसतकर यांनी मांडले. व आभार सचिव दिलीप बेलबागकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष दिनकर अंबुलकर सहसचिव मनोज तायडे, कोषाध्यक्ष जयंत पुसतकर, सह कोषाध्यक्ष दिपक पिंजरकर मुकुंद पुसतकर, राजेश पुसतकर, शशीकांत बाळापुरे, अनिल चिखलकर, दिलीप पैठणकर, मनोज अंबुलकर, राजेंद्र पंढरपूरकर, डॉ. संजय कथलकर, गोविंद रोहणकर, महेश येते, अनंत पुसतकर, तृप्ती व्यवहारे, दिपा बेलबागकर, संजीवनी मारोटकर, डॉ. माधुरी बाळापुरे, माधुरी तायडे, मेघा देवरणकर, बाळासाहेब पंढरपुरकर, प्रमोद वाठोडकर, शशिकांत बालापुरे, खुशाल निहाटकर, अशोक तायडे, सुनिल अंबुलकर, राहुल खंडारे, निरंजन मोरे, गजानन सपकाल, आकाश सपकाल, आनिल चिखलकर, रवि अंबुलकर, श्रीकांत कहाळे, राजेंद्र कथलकर, विष्णु लोखंडे, गोपाल वाठोडकर, संजय मालेकर, धर्मेंद्र चौधरी, प्रकाश पुसदकर, अविनाश मारोटकर, मेहरा येते, राजेश देवरणकर, राजेंद्र तायडे, अर्चना मालेकर, माधुरी ससाणे, सायली वर्धे, नाना वर्धे, सुवर्णा वर्धे, त्रिशा ससाणे, जय मोरे, संध्या सपकाल, शैलजा वानखडे, शुभांगी पुसदकर, अॅड. हितैष्णी देवरणकर, भारती तायडे, अर्चना तायडे, माधुरी तायडे, सुवर्णा डांगे, मेघा देवरणकर, राजेंद्र कुरहेकर, शुभांगी पुसतकर, संजय वानखडे उपस्थित होते.

GHARKUL Masale
पाहिजेत
ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.
: संपर्क :
घरकुल मसाले फॅक्टरी,
एमआयडीसी. अमरावती

# अचलपूर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयास मान्यता

## -पाच तालुक्यांना लाभ होणार- आ. प्रविण तायडे

**अचलपूर/प्रतिनिधीः-** राज्यातील महसूल प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून अचलपूरसह राज्यात ११ अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयांना मंजुरी देण्यात आली आहे. अचलपूरचे आमदार प्रविण तायडे यांनी अचलपूर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्याची मागणी केली होती. त्यांच्या मागणीला यश आले असुन नुकतींच सरकारने त्याला मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे अचलपूर उपविभागासह परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. महसूल विभागावर वाढत असलेला कामाचा ताण लक्षात घेऊन महसूल विभागाच्या वतीने सादर केलेला प्रस्ताव राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सभागृहात सादर केला. मंत्रिमंडळाने त्याला मंजुरात दिली.अमरावती जिल्हयातील चिखलदरा, धारणी तालुक्यातील नागरिकांना १०० ते १५० किमी अंतरावरुन जिल्हा मुख्यालय गाठावे लागते. या अडचणी लक्षात घेता आ.प्रविण तायडे यांनी ही मागणी केली होती. त्यामुळे नागरिकांना सातबारा, फेरफार, नामांतरण, दाखले यांसारख्या कामांसाठी वारंवार जिल्हा ठिकाणी जावे लागणार नाही. अचलपूर येथेच अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय सुरू झाल्यानंतर महसूल संबंधित कामे स्थानिक स्तरावरच होणार असून नागरिकांची गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना याचा मोठा फायदा होणार आहे. महसूल कार्यालयांवरील गर्दी कमी होऊन प्रलंबित कामे जलद मार्गी लागण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नवीन कार्यालये स्थापन करताना लोकसंख्या☞(पान २ वर)



### नवीन पदभरती होणार-

प्रति कार्यालय १३ याप्रमाणे एकूण १४३ नवीन पदे, अपर जिल्हाधिकारी संवर्गातील एस २५ वेतनश्रेणीतील ११ नवीन पदे निर्माण करण्यास अंतिमतः मान्यता देण्यात आली.

# दर्यापूर आगाराच्या हिरकणी बसने घेतला अचानक पेट

## सुदैवाने अनर्थ टळला

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर बसस्थानकाच्या हिरकणी बस ने बस्थानकाजवळीलच रेल्वे गेट जवळ अचानक पेट घेतला. नागरिकांच्या सर्तकतेमुळे व नगर परिषदच्या अग्निशमन बंब लवकर पोहोचल्याने आग आटोक्यात आली व पुढील अनर्थ टळला. ही घटना आज गुरुवारी (दि.१२) दुपारी अडीच वाजता दरम्यान घडली आहे.



दर्यापूर आगाराची हिरकणी बस क्र. एम एच ०९ ई एम २२६० ही बस परतवाडा येथून दर्यापूर बस स्थानकात येत होती. दरम्यान दर्यापूर शहरात येताच रेल्वे गेट जवळ अचानक बसच्या इंजिन मधून धूर निघायला सुरुवात झाली. यावेळी चालकाने प्रसंगावधान राखून मुख्य रस्त्यांवरच बस थांबवली आरडाओरडा करून रस्त्यावरील नागरिकांना मदतीची हाक मारली. रस्त्यावरील नागरिकांनी सुद्धा धाव घेत बस मधिल आग आटोक्यात आणण्यास मदत केली. बसच्या घटनास्थळाच्या बाजूलाच असलेल्या वसू यांचे गॅरेज व वाशिंग सेंटर असल्याने लगेच त्यांनी पाईपने पाणी मारून मदत केली. त्यानंतर☞(पान २ वर)

# नगरसेवकाच्या भावाने केली महिलेला मारहाण

## बॅंकेत पैसे भरण्यावरुन झाला वाद

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव शहरातील काठीपुरा भागातील सेंट्रल बॅंक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये पैसे भरण्याच्या रांगेत उभे राहण्यावरून झालेल्या वादात पालीकेतील नगरसेवकाचे उर्मट भावाने आशा वर्कर तथा बचत गट शहर अध्यक्षाला अश्लील शिवीगाळ करत मारहाण केल्याची धक्कादायक घटना ११ मार्च रोजी घडली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी उषा अ. बोडखे (वय ५३), रा. गुलजारपुरा, या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र सुर्जी येथे आशा वर्कर म्हणून कार्यरत आहेत, तसेच त्या बचत गट शहर अध्यक्षही आहेत. ११ मार्च रोजी दुपारी १.४५ वाजेच्या सुमारास त्या सेंट्रल बॅंक ऑफ इंडियाच्या काठीपुरा शाखेत बचत गटाचे पैसे भरण्यासाठी गेल्या होत्या.बॅंकेत 'यशदा महिला बचत गटा'चे पैसे भरल्यानंतर, त्या 'श्रीनाथ महिला बचत गटा'चे पैसे मोजत





असताना, त्यांच्या मागे उभे असलेला पालीकेतील नगरसेवकाचे भाऊ मो. इकबाल मो. साबीर (वय ३६) यांने त्यांना मागून धक्का दिला. उषा बोडखे यांना डावलून आरोपीने स्वतःचे पासबुक आणि पैसे कॅशियरकडे दिले. जेव्हा उषा बोडखे यांनी 'माझा नंबर आहे, माझ्या नंतर तुम्ही पैसे भरा' असे सांगून अडविण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आरोपीने त्यांना मोठ्या आवाजात धमकावण्यास सुरुवात केली. 'तुमको मालुम है क्या मै कौन हूं? तेरे कितने लोग है उनको लेके आ,'आशी पालीकेतभाऊ निवडुन आल्याची व तो राजकीय पक्षाशी निगडीत असल्याचे गुर्मीत अश्लील भाषेत ☞(पान २ वर)

# मेळघाटातील ३६ आदिवासी मुलींसाठी विद्येचे व्दार उघडले

## 'श्री दत्ताजी डिडोळकर विद्यार्थी विकास निधी सेवा सहयोग'चा उल्लेखनीय प्रयत्न

**अमरावती/प्रतिनिधीः-** 'अन्नदान महादान विद्यादान महत्तर' उपरोक्त श्लोकाचा अर्थ असा आहे की, अन्नदान हे महादान आहे, परंतु विद्यादान हे त्यापेक्षाही श्रेष्ठ दान आहे; कारण विद्यादानामुळेच मनुष्याचा सर्वांगीण विकास होतो.

'श्री दत्ताजी डिडोळकर विद्यार्थी विकास निधी' अंतर्गत सिपना महाविद्यालय, चिखलदरा येथील ३६ विद्यार्थ्यांना दरमहा ३५००/- रुपये अनुदान दिले जाते. या निधीच्या आधारावर, सिपना महाविद्यालयाच्या 'जिजाऊ महिला वसतिगृहात' विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात आला आहे.





सिपना शिक्षण प्रसारक मंडळ, अमरावती द्वारे संचालित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा या महाविद्यालयाची सुरुवात शैक्षणिक सेवा, समाजसेवा या उद्देशाने करण्यात आली कारण चिखलदरा ☞(पान २ वर)

# पेपरफुटी प्रकरणातील मुख्य आरोपी अजुनही फरार

## पोलीस प्रशासनाच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह

अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः- संपुर्ण महाराष्ट्रात गाजलेल्या अंजनगाव सुर्जी येथील पेपरफुटी प्रकरणात अटक गटशिक्षणाधीकारी सुधीर खोडे सह चार आरोपींना काल दि.११ ला जामीन मिळाला असला तरी या प्रकरणातील मुख्य सुत्रधार विस्तार अधिकारी सुशील अंभ्यंकर अजूनही फरार असल्याने पोलीस प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.



सविस्तर वृत्त असे की तालूक्यातील गाजलेल्या दहावी च्या उत्तर पत्रीका चोरी प्रकरणात पोलीस प्रशासनाचा तपास अजूनही सुरु असुन काल आणि आज दि.११ आणि १२ मार्च ला कस्टडी रुम मध्ये असलेल्या कर्मचा-यासह काही शिक्षकांना पोलीसांनी चौकशीसाठी पोलीस स्टेशनमध्ये बोलावले होते.दिवसभर चाललेल्या याचौकशीतून काय निघाले हे अजूनही गुपित असले तरी या चौकशीच्य फे-यामुळे मात्र तालूक्यातील जिल्हापारिषद शिक्षकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.उत्तर पत्रीका चोरी☞(पान २ वर)

# होस्टेलमधील लैंगिक अत्याचार प्रकरणात दोषींना कठोर शिक्षा

## जिल्हा व सत्र न्यायालयाचा कठोर निर्णय

**अमरावती/प्रतिनिधीः-** अल्पवयीन मुलीवर होस्टेलमध्ये घडलेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायालयाने गुरुवारी (दि. १२) ठोस निर्णय दिला. शिवाजीनगर येथील एका वसतीगृहाच्या चौकीदार गणेश विठ्ठलराव इंगोले (रा. चांदूरबाजार) आणि अधिक्षिका अल्का हरिभाऊ डीके (रा. अमरावती) यांना शिक्षा ठोकली.



विधी सुत्रानुसार, १३ डिसेंबर २०१२ रोजी मुलीला आईला फोन लावायचा होता. त्यावेळी आरोपी चौकीदार गणेश इंगोलेने मुलीच्या हातातील फोन हिसकावून घेऊन तोंड दाबले, धमकी दिली आणि अश्लील कृत्य केले. प्रकरणाची माहिती मुलीच्या आईला मिळाल्यानंतर होस्टेल प्रशासनासही कळवण्यात आले. पिडित मुलीने तक्रार पोलिस ठाण्यात केली. त्यानंतर हे प्रकरण☞(पान २ वर)

# शिक्षक आमदार निवडणुकीत पुन्हा पैठणी बाजी मारणार का?

## पैठणी साडींची शिक्षकांमध्ये चांगलीच चर्चा

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** आमदार म्हटले की त्याचा लवाजमा आणि अधिकार यांना सर्वच घाबरुन असतात आणि त्यातही शिक्षक आमदार म्हटले की विभागातील शिक्षकांमध्ये त्याची वेगळीच पोच असते.परंतू या आमदारकी पर्यंत जाण्यासाठी एखाद्या शिक्षक आमदाराला पैठणी साडीचा आधार घ्यावा लागत असेल आणि त्यातही तो गुलाल उधळत




असेल तर विद्यार्थांना संविधानाचे आणि लोकशाहीचे धडे देणा-या शिक्षकांना काय म्हणावे. एका पैठाणी साडीसाठी आपली संपुर्ण बुद्धिच गहान टाकल्याची चर्चा तालुक्यात असुन या पैठणीने पुन्हा मकर संक्रांतीला आपले सक्रमण केल्याचे बोलले जात आहे.

सविस्तर वृत्त असे की गेल्या सहा वर्षा अगोदर २०२० ला अमरावती शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीच्या धामधूमित अनेक उमेदवारांनी आपआपला प्रचार केला.परंतू एका उमेदवाराने निवडणुकीत आधी एक वर्षापुर्वीच छुप्या तंत्राने☞(पान २ वर)

# १५ व १६ मार्चला विभागात अवकाळी पावसाची शक्यता

## शेतकऱ्यांना सतर्कतेचा इशारा

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या प्रादेशिक हवामान केंद्र, कुलाबा (मुंबई) यांच्या अंदाजानुसार अमरावती विभागातील काही जिल्ह्यांमध्ये १५ व १६ मार्च दरम्यान अवकाळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार अमरावती विभागातील अमरावती, वाशीम आणि यवतमाळ या जिल्ह्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी वारे आणि हलका ते मध्यम स्वरूपाच्या




पावसाची शक्यता वर्तवलेली आहे. तसेच बुलढाणा व अकोला जिल्ह्यांमध्येही हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे, अशी माहिती☞(पान २ वर)

# गॅस दरवाढीविरोधात कॉंग्रेसचे अचलपूर तहसील कार्यालयावर आंदोलन

**अचलपूर/प्रतिनिधीः-** केंद्र शासनाने घरगुती गॅस सिलेंडरच्या दरामध्ये केलेल्या वाढीच्या निषेधार्थ कॉंग्रेस पक्षाच्या वतीने अचलपूर तहसील कार्यालयावर आंदोलन छेडण्यात आले. यावेळी तहसीलदार सुदर्शन शहारे यांना निवेदन देत गॅस दरवाढ तात्काळ मागे घेण्याची मागणी करण्यात आली.

जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू देशमुख यांच्या आदेशाने व पक्षाच्या निर्देशानुसार हा आंदोलनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अचलपूर तहसील कार्यालय परिसरात झालेल्या या आंदोलनात कॉंग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.यावेळी अचलपूर शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीकांत झोडपे, ☞(पान २ वर)




# मनपात अस्वच्छता निर्मूलन समिती

## महापौर, उपमहापौरांसह १३ सदस्यांचा समावेश

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेच्या विशेष आमसभेमध्ये सदस्यांनी स्वच्छतेच्या मुद्द्यावर आक्रमक भावना व्यक्त केली होती. नगरसेवकांच्या भावना पाहून महापौर श्रीचंद तेजवानी यांनी बुधवारी सायंकाळी सर्वपक्षीय समिती बनविली आहे. या समिती मध्ये महापौर, उपमहापौर ,स्थायी समिती अध्यक्ष, गटनेता सह १३ सदस्यांना घेण्यात आले आहे. शहरातील साफसफाईवर या लोकांची करडी नजर राहणार आहे. या समितीने शहरातून अस्वच्छतेला हद्दपार करण्याचा निर्णय घेतलेला आहे. राजकीय मतभेद विसरून शहरातील स्वच्छतेसाठी समिती एकत्रित कार्य करणार आहे. जेथे कुठेही घाण दिसणार तेथील घाण नष्ट करण्याचे कार्य हे समिती करणार आहे. या समिती मध्ये महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती ☞(पान २ वर)

# देवगाव जलशुद्धीकरण केंद्राला नगर परिषद उपाध्यक्ष खुर्शीदा बानो यांनी दिली भेट

## केंद्रातील उणिवा उघड, कर्मचाऱ्यांची उडाली तारांबळ

**अचलपूर/प्रतिनिधीः-** जुळया शहरवासियांना पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये तसेच नागरिकांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा व्हावा यासाठी अचलपूर नगर परिषदेच्या उपाध्यक्ष तथा पाणीपुरवठा समितीच्या सभापती खुर्शिदा बानो अताशाह यांनी देवगाव येथील जलशुद्धीकरण केंद्राला अचानक भेट देऊन पाहणी केली. पाहणीदरम्यान केंद्रात अनेक गंभीर उणिवा आढळून आल्याने त्यांनी संबंधितांवर नाराजी व्यक्त केली. यावेळी नगरसेविका सुमय्या बख्तियार रऊफ खान या देखील उपस्थित होत्या. पाहणीदरम्यान ☞(पान २ वर)



# इलेक्ट्रिक केबल चोरणारे चोविस तासात गजाआड

## फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनच्या हद्दीतून इलेक्ट्रिक केबल चोरणाऱ्या आरोपींना पोलिसांनी गजाआड केले आहे. या कारवाईत एकूण २,६५,००० रुपये किमतीचे केबल जप्त करण्यात आले. पोलिस सुत्रानुसार, ७ मार्च रोजी वडाळी येथील हितेश महेंद्र तायवाडे यांच्या गोदामासमोर ठेवलेले एबी व एलटी केबल गायब झाले. ८ व ९ मार्च रोजी तपासणी केली असता☞(पान २ वर)



# सण-उत्सव काळात पाणी व विजपुरवठ्यात अडचण नको



### - मनपा व विद्युत विभागाला निर्देश
### -रमजान व ईदच्या पार्श्वभूमीवर पोलिस अलर्ट

**अमरावती/प्रतिनिधीः-** रमजान मास १९ फेब्रुवारीपासून सुरु झाला असून २१ मार्च रोजी चंद्रदर्शनानुसार रमजान ईद साजरी होणार आहे. शहरातील शांतता राखणे आणि कायदा सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस आयुक्तालयात मुस्लीम समाजाचे मौलवी, प्रतिष्ठित नागरिक, शांतता समिती सदस्य, महानगरपालिका व विद्युत विभागाचे अधिकारी आणि पोलीस उपस्थित बैठक झाली. बैठकीत उपस्थित सदस्यांनी रमजान मास आणि ईद साजरी करताना शहरात कोणताही कायदा सुव्यवस्थेचा ☞(पान २ वर)